# मस्तानीचा बाजीराव

मुरलीधर जावडेकर




मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

मुरलीधर जावडेकर

# मस्तानीचा बाजीराव

(नाटक प्रयोगासाठी प्रत)

मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

www.esahity.com

© सर्व हक्क
**मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे**
(क्र. ई. ५६४८ पुणे दिनांक २१.१.२०११)
यांच्या स्वाधीन

लेखक
**डॉ. मुरलीधर जावडेकर**
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ
उच्च उत्पन्न गट वसाहत,
इमारत क्र.१, गाळा क्र.९,
संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११०१८.
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३
मोबाईल : ९८९०१६९१५६

**प्रथमावृत्ती** : १९६७
**द्वितीयावृत्ती** : २०१२

**मुखपृष्ठ**
लक्ष्मीकांत तोष्णीवाल
९४२२३०७४५३

**अक्षरजुळणी**
व्यंकटेश टाईप
सुजाता तोष्णीवाल, पुणे
९४२०४८०५३६

**मुद्रक**
लकी प्रेस, पुणे ३०

**देणगी मूल्य ₹ ८०=००**

www.esahity.com

ई पुस्तक “मस्तानीचा बाजीराव”

ई साहित्य प्रतिष्ठान

फ़ोन : 9869674820

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

www.esahity.com

www.ednyaneshwari.com

http://etyarth.blogspot.in/

http://esahityapratishthan.blogspot.in/

www.marathiriyasat.com

ई साहित्य प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून अनेक लेखक वाचकांनी एकत्र येऊन सुरू केली. संस्थेतर्फ़े दर आठवड्याला एक मराठी ई पुस्तक चाळीस देशांतील सुमारे दीड लाख वाचकांना विनामूल्य वितरित केले जाते. त्याशिवाय ई साहित्यच्या विविध वेबसाईट्सना लाखो लोक व्हिजिट करतात.

# ई पुस्तक “मस्तानीचा बाजीराव”

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

डॉ. ग. बा. घाणेकर
सौ. विद्याबाई घाणेकर

श्री. मधुकर बरवे
सौ. सुमति बरवे

यांस
निःशब्द होवून
सप्रेम सादर अर्पण
मुरलीधर जावडेकर
सौ. ललिता जावडेकर

www.esahity.com

श्रीमंत सकलगुणालंकरण
सदा यशवंत धर्मपरायण
राजश्री पंतप्रधान
.................
साहेब पेशवेसरकार
स्वामींचे सेवेसी

www.esahity.com

# हे उजेडात आलेच पाहिजे!

'मस्तानीचा बाजीराव' हे नाटक मी १९६७ साली प्रकाशित केले. त्याचे आतापर्यंत काय झाले, असा प्रश्न कुणाच्याही मनात येईल. म्हणून हे विवेचन.

'ऐतिहासिक मराठी नाटके' हा डॉ. भीमराव कुलकर्णी यांचा प्रबंध १९७१ मध्ये प्रसिद्ध झाला. आतमध्ये या ग्रंथाचे नाव प्रत्येक पृष्ठावर 'मराठी ऐतिहासिक नाटके' असे छापले आहे! यात पृ. २६५ वर ते लिहितात, 'शिरवाडकरांच्या 'दुसरा पेशवा' नंतर उल्हास यांचे 'पहिला बाजीराव' (१९६३) व मुरलीधर जावडेकर यांचे 'मस्तानीचा बाजीराव' (१९६७) ही दोन्ही नाटके नाट्यमयतेच्या अभावामुळे परिणामकारक ठरत नाहीत... जावडेकरांनी 'बाजीराव-मस्तानी' संबंधांच्या धर्मांतराची चर्चा केली आहे आणि त्यालाच उद्देशून 'इतिहासाच्या गडद अंधारातून आजवर रंगभूमीच्या झगझगीत प्रकाशात कधीही न आलेले एक विलक्षण रहस्यमय कारस्थान या नाटकात नव्यानेच दृष्टीस पडेल' अशी आपली प्रामाणिक समजूत व्यक्त केली आहे! उल्हास व जावडेकर यांच्या कृती हौसेपोटी उद्भवल्या आहेत.'

'मस्तानीचा बाजीराव' नाटकातील रहस्यमय कारस्थान, मस्तानी नानासाहेबावर प्रेम करते असे बाजीरावांच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा डाव, हे आहे. चर्चा म्हणजे कारस्थान नव्हे, हे कुणालाही कळेल. 'माझ्या नाटकावर लिहिण्यापूर्वी माझे नाटक आपण वाचले होते काय?' असे पत्र मी त्यांना टाकले. त्याचे त्यांनी उत्तर दिले नाही! नाटक लिहिण्यापूर्वी मी पुण्यात राहून बाजीरावांवरील मिळणे शक्य ती पुस्तके विकत घेतली आणि भारत इतिहास संशोधक मंडळात बसून शक्य तेवढे वाचन केले.

डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी प्रस्तावनेत उपरोक्त ग्रंथाची भलावण 'सर्वांगपरिपूर्ण ग्रंथ', 'मार्गदर्शन करीत राहील', आणि 'समीक्षेमध्ये फार मोलाची भर' इत्यादी

शब्दांत केली आहे. डॉ. वाळिंबे यांना मी स्वतः माझ्या नाटकाची प्रत भेट दिली होती. त्यांनी मला एका शब्दानेही काही कळविले नाही. त्यांची इच्छा! मान्य. पण या नाटकासंबंधी लिहिलेला मजकूर खरा की खोटा हे त्यांना तपासता आले असते, असे मला वाटते.

डॉ. कुलकर्णी यांचे माझ्या नाटकावरील शब्द चुकीचे आणि गैरसमज उत्पन्न करणारे आहेत. जो ग्रंथ संदर्भग्रंथ म्हणून वापरला जाणार आहे त्यातील नोंदी अचूक नकोत काय? या शितावरून त्यांच्या भाताची कल्पना येते, असे का म्हणू नये?

बाजीरावांचा मोंगल, निजाम, छत्रपती, घरातील व्यक्ती, प्रतिष्ठित माणसे, धर्मरूढी, नियती इत्यादींशी पदोपदी होणारा संघर्ष म्हणजे काय नाट्यमयतेचा अभाव?

आणि या संघर्षात त्यांचा गेलेला बळी पाहून वाईट वाटून दुसऱ्या कशाचीही काळजी न करता लिहिलेले लेखन काय 'हौसेपोटी?'

न वाचता लिहून भीमराव कुलकर्णी यांनी हा माझ्यावर मोठा अन्याय केलेला असून मराठी समाजाची दिशाभूल केलेली आहे.

अशा पंडित लोकांना कळू नये पण सरल हृदयी रसिकांना मात्र हृदयस्पर्शी वाटावे, असा अनुभव मला सतत आला.

१९६७ साली हे नाटक हिरा खाणीत जसा सापडला तशा स्वरूपातच प्रगट केले. आज त्याला पैलू पाडलेल्या म्हणजे प्रयोगक्षम स्वरूपात प्रगट करीत आहे. नाटक तेच, तसेच; फक्त काही मजकूर कमी केला आहे.

केशवसुत स्मृतिदिन ७-११-२०००. लेखक

<u>सूचना</u>

या नाटकातील सर्व पात्रे आणि सर्व प्रसंग संपूर्णपणे काल्पनिक असून वास्तवात कोणास, कोठे साम्य वाटल्यास तो निव्वळ योगायोग आहे, असे समजावे. (मुख्य पात्रे आणि मुख्य प्रसंग वास्तव जरूर असतात आणि नाटकात सत्य शोधण्याचा प्रयत्न जरूर असतो. तशीच ती लेखकाची कलानिर्मितीही जरूर असते.)

www.esahity.com

# मस्तानीचा बाजीराव

## अंक पहिला

(सन १७२९ चा सुमार. पन्ना, बुंदेलखंडाची राजधानी, या ठिकाणी छत्रसाल महाराज यांच्या राजवाड्यातील सर्वोच्च महाल. संध्याकाळ. एक तरुण स्त्री हातात तबक आणि त्यात लावलेला दिवा घेऊन येते. हळूहळू महालातील दिवे उजळते. त्रितल महालाला पुढील भागात समोरासमोर दारे आहेत. महालाचा मागील भाग उंच आहे. या भागाला दारांशी समांतर अशा दोन खिडक्या समोरासमोर आहेत पुरुषभर उंच आणि खाली गुडघ्याइतक्या उंचीचे कठडे अशा. दिवे लावून झाल्यावर ती नवयौवना वस्तू नीट मांडून ठेवू लागते. पण तिला एकदम काहीतरी भास होतो आणि ती धावतच डाव्या खिडकीकडे जाते. ती परत फिरते. पलंगाकडे साभिप्राय पाहत राहते. कुणीतरी पाहील या कल्पनेने दचकून इकडेतिकडे पाहते तोच...)

**राणी** : (आतून) मस्तानी, ए मस्तानीऽ

**मस्तानी** : आले, राणीसरकार.

**राणी** : नको येऊस.

(उजवीकडील दारातून राणी लगबगीने येते. वय सत्तरीच्या पुढेच. मागाहून एक दासी चवरी घेऊन घाईने येऊन 'बुंदेलखंडकी राणीसरकार' अशी ललकारी देते. बरोबर काही सुवासिनी आणि तरुण कुमारिका आहेत. आल्याबरोबर डावीकडील खिडकीकडे जाऊन त्या बारकाईने बाहेर पाहू लागतात.)

**राणी** : मस्तानी, कुठे नाहीशी झालीस ग?

**मस्तानी** : राणीसरकार, आपणच सांगितलंत ना इकडे यायला?

**राणी** : पण का?

**मस्तानी** : बडे पाहुणे येणार, त्यांची पुरीपुरी व्यवस्था झाली की नाही, हे पहायला.

**राणी** : मग, झाली का?



www.esahity.com

**मस्तानी** : राणीसरकार, आपण पाहून घ्यावी ना.

**राणी** : मस्तानी, वाळ्याचा पंखा कुठे आहे?

**मस्तानी** : हा इथे, राणीसरकार.

**राणी** : मस्तानी, अग पण, चांदीचा तांब्या कुठे दिसत नाही?

**मस्तानी** : हा काय इथे आहे, राणीसरकार.

**राणी** : बरं. मग, फळं?

**मस्तानी** : ही पाहावीत, राणीसरकार.

**राणी** : पण आणखी काय राहिलं, मस्तानी?

**मस्तानी** : पंचारतीचं तबक.

**राणी** : हो, हो, मस्तानी, पंचारतीचं तबक कुठे आहे?

**मस्तानी** : हे काय, माझ्या हातात आपल्या समोरच आहे ना?

**राणी** : पंचारती घेऊन कशाला उभी आहेस? आम्हाला ओवाळायला? कुणाला ओवाळायचंय ठाऊक आहे ना? अग, गजेंद्राच्या धाव्यासरशी भगवान धावून आले. तसे बाजीरावसाहेब, आपल्या शनवारवाड्याचं काम टाकून आमच्याकडे आले. केवढा तो महंमदखान बंगष! दिल्लीश्वराचा खास सरदार! पन्नास हजार फौज घेऊन आमच्यावर चालून आलेला. त्याला वाटलं, बुंदेलखंड काय बुंदीसारखं खाऊ! पण बाजीरावसाहेबांनी त्याला असा कोंडला की त्याच्या फौजेत तीनतीन रुपये देऊनदेखील शेरभर अन्न दिसेना. शेपूट टाकून पाल पळते तसा शेकडो हत्ती न् हजारो घोडे न् कायकाय सामग्री टाकून मार खात पळाला. ठाऊक आहे का? (इतक्यात मिरवणुकीच्या आवाजाची चाहूल येते म्हणून राणीसकट सगळ्याजणी खिडकीकडे धावतात) अग, मनात आणतील तर दिल्लीतून मिरवत जातील! पण आज ते आमच्याकडेच मिरवत येताहेत! बाकी मस्तानी, तू मुसलमान! बाजीरावसाहेबांच्या विजयाचा आनंद व्हायला हिंदूच असायला हवं!

(मिरवणुकीतील मंगलवाद्यांचा आवाज आता स्पष्ट ऐकू येऊ लागतो. आवाजाबरोबर बायकांची गडबडही वाढत जाते.)

**राणी** : मस्तानी, अग कुंकवाचा करंडा?

**मस्तानी** : लपलाय तो (फुलांखाली.)



www.esahity.com

**राणी** : लपवून कशाला ठेवला आहेस तो? अगं, कुंकमतिलक लावायचाय त्यांना की तुला?

(मिरवणूक जवळ आल्याने वाद्यांचा आवाजही मोठा येऊ लागतो. राणी आणि स्त्रिया घाईने जाऊ लागतात. पाठोपाठ मस्तानीही येऊ लागते.)

**राणी** : तू कशाला येतेस खाली? अग, ते हिंदूंचे सेनापती! आम्हीच ओवाळणार त्यांना.

(राणी डावीकडील दारातून गडबडीने जाते. ललकारी देत दासी मागे धावते. स्त्रिया जातात. मस्तानी खिडकीशी जाऊन बाजूला उभी राहून वाकून पाहते. वाद्यांच्या निनादाची गत वाढत जाते आणि त्या तालावर ती सहजगत्या नृत्य करू लागते. बाजीरावाची ऐट, त्याच्या रूपाचा प्रभाव, त्याच्या विजयाचा आनंद असे कितीतरी भाव तिच्या नृत्यात प्रतिबिंबित होतात. ती मधूनमधून खिडकीतून वाकून पाहत असतेच. मिरवणूक अगदी जवळ येते. वाद्यघोष सर्व वातावरण दुमदुमवून टाकतो. त्वरा करून ती मेजापाशी येते आणि बाजूला लपवून ठेवलेला गेंदेदार लाल गुलाबांच्या फुलांचा लांबसडक हार हातांत घेऊन खिडकीशी उभी राहते. नानाविध रंगांच्या चंद्रज्योती खाली पाजळल्या जात आहेत. पण त्या आकाशात उंच करून पाजळवत असल्याने लाल, हिरवा असे रंग खिडकीतून प्रकाशरूपाने आत येत आहेत. मस्तानी ती पुष्पमाला खिडकीतून खाली टाकते. त्याचवेळी लाल प्रकाशात तिचा चेहरा उजळून निघतो. ती लाजते आणि परत फिरून एक गुलाबाचे मोठे फूल पलंगावरील उशीवर ठेवते. त्याचवेळी तुतारी ऐकू येते आणि मग सर्व आवाज थांबून शांतता पसरते. बायकामंडळी येतात. राणी मस्तानीला म्हणते, 'मस्तानी, आत.' मस्तानी उजवीकडील दाराशी जाऊन थांबते, आणि राणी आणि इतर स्त्रिया डावीकडील दारातून वाकून खाली पाहत राहतात. 'हिंदूपदपादशाहीच्या पेशव्यांचा विजय असो' असा त्रिवार जयजयकार बाहेर होतो. मग 'श्रीमंत सकलगुणालंकरण सदायशवंत धर्मपरायण राजश्री पंतप्रधान बाजीरावसाहेब पेशवेसरकार' अशी ललकारी होते. थोड्याच वेळात 'अग आले ते! चला' असे राणी इतर जणींना म्हणते. सर्वजणी घाईने उजव्या दाराकडे हसत हसत पळतात. मस्तानीला जाण्याची खूण करतात. दारातून बाहेर गेल्यावरही हळूच पडदा बाजूला सारून पाहत राहतात आणि छत्रसाल आणि बाजीराव आत आल्यावरच निघून जातात. नाइलाजाने. छत्रसाल : वय वर्षे ८०. बाजीराव : वय वर्षे ३०, गळ्यात गुलाबाच्या फुलांचा लांबसडक हार मस्तानीने 'वरून' घातलेला आणि भालप्रदेशावर कुंकुमतिलक रेखलेला. बाजीराव येताच प्रथम डाव्या खिडकीकडे



www.esahity.com

आणि नंतर उजव्या दाराकडे साभिप्राय पाहतो. छत्रसाल ते हेरतो.)

**छत्रसाल** : यावं, यावं श्रीमंत!

**बाजीराव** : (येताच) सुंदर! सुंदर!! विलक्षण सुंदर!!!... आपला हा महाल! (डाव्या खिडकीकडे पाहून) अहाहा! ही खिडकी काय सुरेख आहे! (उजव्या दरवाजाजवळ जाऊन) या दरवाजावरील कलाकुसर तरी काय अप्रतिम आहे! अन् या पडद्यावरील भरतकाम तर मनाला वेड लावणारं आहे! (पडदा डाव्या हातात घेऊन निरखून पाहण्याच्या निमित्ताने हळूच दूर करून पलीकडे पाहतो, त्याचवेळी उजव्या हाताने गळ्यातील पुष्पमालेचा सुगंध कळतनकळत घेतो.) सारखं पाहतच राहावंसं वाटतं!

**छत्रसाल** : आपले पाय या महालाला लागले, आमचा जन्म सार्थकी लागला. बसावं, श्रीमंत.

**बाजीराव** : आधी आपण, महाराज. (छत्रसाल बसत नाही हे पाहून) महाराज, आम्ही जयपूरच्या राजाकडे सरळ त्याच्या सिंहासनावरच जाऊन बसलो, कारण त्यानं आपल्या मुली सरळ मोंगलांच्या घरी दिल्या होत्या. आपण मात्र मोंगलांच्या घरात गेलेली विजयश्री परत आणलीत. आपल्या या सुंदर महालात येऊन आम्हीच धन्य झालो.

**छत्रसाल** : (हसून) श्रीमंत, हा महाल आम्ही मुद्दाम बांधला. आपले छत्रपती शिवाजीमहाराज भेटायला येणार होते म्हणून! पण थोरले छत्रपती स्वर्गाकडेच गेले! आमची ती इच्छा आज आपण पूर्ण केलीत! श्रीमंत, फुलाची पाकळी म्हणून झाशीभोवतालचा तीन लाखांचा मुलूख आम्ही आपल्याला अर्पण करतो.

**बाजीराव** : महाराज, फार मोठा गौरव करत आहात आपण आमचा. आम्ही साधेशिपाई गडी! छत्रपती नव्हे! आमची इच्छा एवढीच की थोरल्या छत्रपतींनी औरंगजेबाला दिलेलं राज्य पुनः जिंकून राज्याभिषेक करून घेतला, तसा या छत्रपतींनी परक्यांनी लुबाडलेला सर्वच्या सर्व हिंदुस्थान काबीज करून सार्वभौम पृथ्वीपती म्हणून अभिषेक करून घ्यावा; अन् या कामी आम्हाला तानाजीसारखं मरण यावं! पण वर आकाशात



www.esahity.com

ते सप्तर्षी आणि अढळ ध्रुव; तसेच खाली हे सप्तप्रधान आणि अढळ छत्रपती! थोरले छत्रपती संकटात जातीनं उडी घालून यशाचा मार्ग लोकांना खुला करून देत होते. पण आमचे छत्रपती आमचेच पाय मागे खेचतात. (भासचित्र – छत्रपती आणि प्रतिनिधी.) छत्रपतींची कीर्ती क्षितिजापर्यंत पोचवावी म्हणून आम्ही दूरदूर दौड करीत जातो अन् ही आमची सरदार मंडळी छत्रपतींच्या दरबारात बसून त्यांचे कान फुंकतात. आम्हाला माहीत आहे फक्त तुतारी फुंकणं! त्या आमच्या तुतारीची हाक, महाराज, बुंदेलखंडात आपल्याला ऐकू आली; पण साताऱ्यात? महाराज, परक्या प्रदेशात आपल्यापेक्षा दसपट मातब्बर शत्रूंशी झुंज घेण्यात आम्ही मग्न असताना, साताऱ्यात आमचे छत्रपती अन् त्यांचे सरदार आमच्याविरुद्ध खलबतं करून असले खलिते लिहून आम्हाला विघ्नं आणण्यात समाधान मानतात! (भासचित्र विरते. बाजीराव अंगरख्यातून एक मोठा खलिता काढून छत्रसालाच्या हातात देतो. छत्रसाल ती गुंडाळी उलगडून वाचू लागतो. इतक्यात न राहवून बाजीरावच ते पत्र मोठ्याने बोलू लागतो.)

**बाजीराव** : ‘क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांणी राजमान्य राजश्री बाजीराव पंडितप्रधान यांसी आज्ञा केली असे. तुम्हास हुजूर यावयाविसीची दाहापाच आज्ञापत्रे सादर केली. याउपरी येणे असेल तरी पत्रदर्शनी स्वार होऊन हुजूरदर्शनास येणे.’ पाहिलंत महाराज, यांचीच सेवा करण्यामागे आम्हाला पत्र लिहायला फुरसत नाही, म्हणून हा शेलका आहेर? आमची पत्रंच हवीत तर, तरवारीच्या लेखणीनं रक्ताच्या शाईनं रणमैदानांच्या कागदांवर विजयश्रीखाली लिहिलेली पत्रं वाचायला ते इथेच का येत नाहीत?

(भासचित्र – छत्रपती, प्रतिनिधी आणि कारकून. छत्रपती मजकूर सांगत आहेत. यापुढे छत्रपतींचे शब्द त्यांच्याच आवाजात.)

**छत्रपती** : तिकडील कारभार स्वामी लवकरच कोणी मातब्बर मुत्सद्दी इकडून धाडतील त्यांचे हाती सुपूर्त करणे.



www.esahity.com

**बाजीराव** : छान! आपली वतनं सांभाळावीत हीच ज्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता त्यांच्या हाती आम्ही शत्रूंपासून सोडवून घेतलेला मुलूख सोपवावा?

**छत्रपती** : तुमचे चित्तात उत्तरेकडील भर भरला आहे.

**बाजीराव** : हा आमचा गुन्हा! 'हिंदवी स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा!' ही थोरल्या छत्रपतींची आर्त आठवून काशी, अयोध्या, मथुरा ही सगळी क्षेत्रं मुक्त करायची इच्छा आम्ही धरतो ही आमची चूक!

**छत्रपती** : मोगली मुलूख घेतल्यामुळे हावभरी व्हाल, दिल्लीला धक्का लावाल आणि अरिष्ट ओढवून घ्याल.

**बाजीराव** : आम्ही घाबरून मागे राहिलो म्हणजे अरिष्ट यायचं राहणारच आहे! आणि दिल्लीला धक्का लावायचा तर यांनी धसकाच घेतला आहे. जणू काही यावच्चंद्रदिवाकरौ दिल्लीवर राज्य करावं यवनांनीच! महाराज, गिरधरलालचा सारंगपुरात पुरा पाडाव केला, अन् निजामाला पालखेड मुक्कामी खडे चारले, म्हणून अगडबंब तयारी करून आलेल्या बंगषालाही तुम्हीआम्ही जीव घेऊन पळायला लावलं! एकामागून एक मिळविलेल्या या विजयांच्या उन्मादानं आमची सेना न्हात असताना हाय खाऊन पळालेल्या खानाचा पाठलाग करीत आम्ही दिल्लीच्या मुळावरच घाव घातला असता म्हणजे बाकीच्या फांद्याही आपोआपच खाली पडल्या असत्या! पण आमचे शत्रू आम्हाला आड आले नाहीत, तर आमचे सरदार अन् छत्रपती आम्हाला आड आले! पण एवढ्यावरच पुरे नाही!

**छत्रपती** : तुमची उमेद मोठी पण उमर लहान. एकेच दिवशी सर्व पृथ्वी गोळा करावी ऐसे नाही. बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

(भासचित्र विरते.)

**बाजीराव** : पूर्वी इतर घराण्यांतली माणसं हा उपदेश थोरल्या छत्रपतींना करीत होती. आता आमचे छत्रपतीच हा उपदेश इतर घराण्यांना करताहेत! महाराज, छत्रपतींचा हुकूम आम्ही कधी मोडलेला नाही. त्यांनी आम्हाला हे असलं पत्र लिहायला नको होतं.

**छत्रसाल** : श्रीमंत, छत्रपतींनी आपल्याला सल्लामसलतीसाठीच बोलावलं



www.esahity.com

असेल.

**बाजीराव** : महाराज, ते बोलावत आहेत कानउघाडणीसाठी. ते मोठे, वयोवृद्ध, छत्रपती! अन् आम्ही छोटे, अननुभवी अन् फक्त पेशवे – एक नोकर! पाहा ना हे पत्र. एकेक शब्द म्हणजे विषारी जखम. महाराज, आम्ही बंड करू तर प्रचंड पराक्रम करून दाखवू, पण आमच्यामागे देश शतखंड होऊन जाईल. छे छे! ते होणे नाही. महाराज, हा देश, ही दौलत आमची नाही. ही आहे थोरल्या छत्रपतींची! आमची इमारत थोरल्या महाराजांची आज्ञा! पण महाराज, दिल्लीच्या दुबळ्या बादशहाला मुठीत ठेवण्यासाठी सय्यद बंधूंनी नि निजामानं शर्थ करावी, पण दिल्ली खरी ज्यांच्या मालकीची त्या आम्ही हिंदूंनी ही नामी संधी वाया दवडावी? हा मुहूर्त टळला तर दुष्मन जबरदस्त होतील अन् आपल्यासारखे करंटे आपणच ठरू! मग सांगावं महाराज, साताऱ्याला जाऊन सबुरीचा सल्ला आम्ही कसा घ्यावा? महाराज, आमची सेवा घ्यायला थोरले छत्रपतीच आज असायला हवे होते!

(शिवाजीमहाराजांच्या आठवणीने बाजीराव डोळे मिटून स्तब्ध होतो. छत्रसाल मुजरा करतो. जरा वेळाने...)

**छत्रसाल** : आमची सेवा घ्यायला थोरले छत्रपतीच आज असायला हवे होते! ... तरी छत्रपतींना आपण बघू शकला नाहीत.

**बाजीराव** : थोरल्या छत्रपतींना आपण पाहिलंत? प्रत्यक्ष? आपण त्यांना समोरासमोर भेटलात? कसे दिसले ते? काय बोलले? काय म्हणाले?

**छत्रसाल** : श्रीमंत, आम्ही त्यांना या डोळ्यांनी पाहिलं, या कानांनी त्यांची वाणी श्रवण केली. अन् श्रीमंत... श्रीमंत... हाच आमचा मर्त्य देह थोरल्या महाराजांनी जवळ घेऊन थोपटला! (भावनेच्या आवेगास वाट देऊन) श्रीमंत, साठ वर्षं झाली त्या गोष्टीला; पण थोरल्या महाराजांची मूर्ती आमच्या मनःचक्षूंसमोरून मावळत नाही!... आग्र्याहून सुटून महाराज सुखरूप पोचले पण आम्ही बदाद्दूरखानाबरोबर त्यांच्यावर चालून गेलो! त्यांची भेट घ्यायची इच्छा होती पण आमच्यावर कोणीतरी मुसलमान ठेवलेलाच असे. तो मुसलमान आणि



www.esahity.com

आम्ही एकदा शिकारीला गेलो अन् तो एका सावजामागे लागला आहे असं पाहून उलट्याच दिशेला हाकाटी करीत पळालो. एवढे मोठे शिवाजीमहाराज पण आमच्यासाठी जीव धोक्यात घालून झाडीत दडून बसले होते. (मागे सामोरे शिवाजीमहाराज आणि पाठमोरा तरुण छत्रसाल असे दिसू लागतात.) आम्हाला पाया पडू न देताच त्यांनी उठवलं अन् ते म्हणाले, ...

**शिवाजी** : तुम्ही राजे आहात! आम्हाला आलिंगन देऊन भेटा. राजे, हिंदवी स्वराज्य व्हावे; ही श्रींची इच्छा! श्रींच्याच कृपेनं तुमचं गेलेलं राज्य तुम्हीही मिळवाल.

**छत्रसाल** : इतकं बोलून कडकडून भेटून ते जायला निघाले तेव्हा 'महाराज, आपण आमच्या देशात आलं पाहिजे' एवढेच शब्द आम्ही बोलू शकलो. त्यावर 'जरूर, जरूर' असं म्हणून मोठ्या प्रेमानं त्यांनी आमच्याकडे पाहिलं. अन् 'ही घ्या आमची छोटीशी भेट' म्हणून आपल्या कमरेची तलवार काढून आमच्या हातांत ठेवली! तीच ही तलवार!

(भासचित्र विरते. बाजीराव तलवार पाहण्यासाठी पुढे येतो. छत्रसाल तलवार उंचावर धरून तिला आपले मस्तक लावतो. बाजीराव तलवार हातांत घेऊन असेच तिला मस्तक लावतो.)

**बाजीराव** : (सद्‌गदित होऊन) महाराज! महाराज! महाराज!

**छत्रसाल** : (बाजीरावाला जवळ घेऊन) शांत व्हा, श्रीमंत, शांत व्हा.

**बाजीराव** : महाराज, नागाचा दंश झालेल्या माणसाला मांत्रिकाकडे पाहिलं म्हणजे बरं वाटावं, तसं छत्रपतींच्या पत्रानं संतापलेलं आमचं मन आपल्याकडे पाहिलं की निवतं. महाराज, अशी कोणती दिव्यौषधी आहे की जिच्यामुळं मन निर्लज्ज तर बनत नाही पण संतापाचा तात्पुरता विसर तरी पडतो?

**छत्रसाल** : आहे एक दिव्यौषधी.

**बाजीराव** : अशी दिव्यौषधी असते?

(छत्रसाल हसतो आणि बाजीरावाला मंचकावर बसवीत स्वतः शेजारच्या खुर्चीवर बसतो. छत्रसाल मिष्किल स्मित करीत मोठी टाळी वाजवतो. उजवीकडील दारातून एक सेवक थोडा आत येऊन लवून मुजरा करून उभा राहतो. छत्रसाल त्याला खुणेनेच काहीतरी घेऊन येण्यास सुचवितो. सेवक पाठ न दाखविता



www.esahity.com

निघून जातो. एकदम तबल्याची थाप, सारंगीचे सूर आणि पैंजण बांधून केलेल्या नाचाचा आवाज यांचा मेळ ऐकू येतो. थोड्याच वेळात एक सारंगीवाला - हा तरुण मुसलमान आहे - आता येतो आणि मुजरा करतो. त्याच्यामागून एक उत्तर प्रदेशी तबलजी येतो आणि मुजरा करतो. ते दोघेही उजव्या कोपऱ्यात बसतात. वाद्यसंगीत सुरू करतात. बाजीरावाची उत्सुकता शिगेला पोचली असतानाच नृत्य करीत मस्तानी प्रवेश करते आणि प्रथम सामोरी होऊन नृत्यांतर्गत नमस्कार करते.)

**छत्रसाल** : दिलावर, आजचं नृत्य कुणासाठी आहे, माहीत आहे?

**दिलावर** : (उठून), जी हां, सरकार. आपके सबसे बडे राजेशाही मेहमान, सब हिंदूओंके आँखोके सितारे, दुनियाके सब जादासे जादा शूर लोगोंसेभी जादा महशूर...

**छत्रसाल** : शाब्बास! दिलावर, शाब्बास! बेटी (नाव कळेल म्हणून बाजीराव उत्सुकतेने पाहतो, पण...) तुला कल्पना आहे आज तुझी कला कोण पाहणार आहे?

**मस्तानी** : जी हां, ज्यांचं वर्णन करायला माझ्यापाशी तर शब्दच नाहीत!

**छत्रसाल** : (हसून) पण तुझ्याजवळ एक चीज आहे ती बाकी कोणाजवळ नाही. बेटी, आजच्या नृत्याची तयारी ठीक आहे ना?

**मस्तानी** : जिंदगीभर नाचाची तालीम केली आजच्यासाठी!

**छत्रसाल** : कमाल केलीस, बेटी! आता नाचाचीही कमाल करशील यात आम्हाला शक नाही.

(मस्तानी लवून मुजरा करते, अन् नाच सुरू करते. नाच रंगात आल्यावर अचानक ती गीत सुरू करते.)

**मस्तानी** :

ऐकून नाव तुमचे बेहोष नाचले मी
माझेहि नाव केव्हा ऐकाल काय तुम्ही?
पाहून रूप तुमचे माझी न राहिले मी
ना राहवून मजला पाहाल काय तुम्ही?
तुमच्याशिवाय काही माझ्या मनात नाही
हे वेड खास माझे आवडेल का तुम्हाही?

(मस्तानी नृत्यात गिरक्या घेऊ लागते. तिची गती वाढते. छत्रसाल 'बहोत सुंदर! बहोत सुंदर!' म्हणत राहतो. दिलावर आणि तबलजी 'वाहवा!' म्हणत असतात. शेवटी छत्रसाल 'कमाल केलीस बेटी! कमाल केलीस!' असे म्हणतो त्याचवेळी मस्तानी बाजीरावासमोर कोसळते अन् बेहोष पडते. दिलावर आणि



www.esahity.com

तबलजी पुढे धावतात. छत्रसाल तबलजीला म्हणतो, 'जा. राजवैद्यांना घेऊन या.' आणि मस्तानीला व्यवस्थित करू लागतो. बाजीरावाला खूण करून हात द्यायला बोलावतो. छत्रसाल मस्तानीला मंचकाच्या पायाशीच ठेवणार असतो. पण बाजीराव म्हणतो, 'नाही, नाही महाराज, आराम पाहिजे. वरच ठेवा.' आणि मग तिला मंचकावर ठेवतात. छत्रसाल तिचे हात नीट करतो. दिलावर तिला वारा घालतो. बाजीराव तिला घोटभर पाणी पाजण्याचा प्रयत्न करतो. ती जराशी शुद्धीवर येते अन् बघते तो अगदी जवळच बाजीराव तिच्याकडे पाहत असलेला तिला दिसतो. एक क्षणभर ती दिङ्मूढ होऊन पाहतच राहते आणि मग एकदम उठून बसते आणि पुटपुटते, 'छे, छे, नाही, नाही' आणि मंचकावरून उतरून धावत जाऊ लागते. प्रथम ती डाव्या दाराकडेच जाते आणि मग आपली चूक तिच्या लक्षात येते अन् तशीच धावत उजव्या दारातून निघून जाते. बाजीराव आश्चर्याने पाहत राहतो. छत्रसाल स्वतःशीच हसतो. दिलावर पुढे होऊन मुजरे करतो, आणि दारापाशी जाऊन सारंगी आणि तबला घेऊन जातो.)

**छत्रसाल** : श्रीमंत, आपल्याला थोडीतरी दिव्यौषधी मिळाली असेलच.

**बाजीराव** : द्विव्यौषधी नव्हे, महाराज, संजीवनी!

**छत्रसाल** : (हसून) श्रीमंत, ही संजीवनी घेण्यासाठी एक पथ्य आहे.

**बाजीराव** : कोणतं?

**छत्रसाल** : पूर्ण आराम केला पाहिजे.

**बाजीराव** : (हसून) जशी आपली आज्ञा, महाराज!

(असे म्हणत बाजीराव छत्रसालाबरोबर दारापर्यंत येतो. तेथेच थबकून...)

**बाजीराव** : काहीतरी विचारणार होतो. महाराज, पण विसरलो.

**छत्रसाल** : (मिष्किलपणे) काय बरं? काही दिल्लीची बातमी? की आमच्या – आता आपल्या – बुंदेलखंडाची काही चौकशी?

**बाजीराव** : नाही काहीतरी वेगळंच, महाराज.

**छत्रसाल** : (मुद्दामच) मग काय बरं?

**बाजीराव** : आठवेल केव्हा तरी.

**छत्रसाल** : (त्रयस्थपणाचा आव आणून) या नर्तकीचं नाव तर नव्हे?

**बाजीराव** : अं? हं हं! म्हणजे तसंच काही तरी!

**छत्रसाल** : (हसून) मस्तानी! मस्तानी!

(छत्रसाल दिलखुलासपणे हसून बाजीरावाच्या पाठीवर थाप मारतो आणि मंचकाकडे अंगुलिनिर्देश करतो अन् हसतहसत निघून जातो. बाजीराव 'मस्तानी... मस्तानी...' असे पुटपुटत दाराकडे पाहत उभा राहतो. जरा वेळाने मंचकावर



www.esahity.com

येऊन बसतो. तोच मस्तानीने ठेवलेले गुलाबाचे फूल त्याच्या हाताला लागते. हारातल्या फुलांची अन् याची जात एकच आहे हे त्याला पटते. अन् 'मस्तानी... मस्तानी...' असे म्हणत तो त्या फुलाचा सुगंध मनमुराद लुटतो. लोडाला टेकून कुशीवर आडवा होतो अन् ज्या हातात फूल आहे तो हात फुलाचा वास घेऊन तो लांब करीत असतो. एकदा हात लांब केलेला असताना त्याच्या हातातून फूल गळून पडते ते मंचकाशेजारच्या त्या खुर्चीवर. न पाहताच तो ते फूल घेण्यासाठी चाचपडतो अन् हाताला लागलेली वस्तू उचलतो. ती म्हणजे छत्रपतींचा संतापजनक लखोटा. छत्रसालाने तो तिथेच ठेवलेला असतो. बाजीराव रागाने उठतो अन् फेऱ्या घालतो. क्षणभर खिडकीशी उभा राहतो अन् मस्तानीची आठवण होऊन 'मस्तानी' असे पुटपुटतो. पुनः मंचकाकडे येऊन तसेच करतो. तिने नृत्य केलेल्या ठिकाणी जाऊन तसेच करतो. अन् मग)

**बाजीराव** : मस्तानीच्या संगीतानं आमच्या जिव्हारी झालेल्या जखमेचा आम्हाला विसर पडला. पण ते संगीत विरताच पुनः ठणका सुरू झालाय. छे छे! हा घाव कायमचा बसलाय आमच्या जिवावर. तो कायमचा विसरायला मस्तानीचा सहवास कायमचा लाभेल काय? दिव्यौषधी, संजीवनी, मस्तानी...

(असे बोलत, ज्या दारातून मस्तानी निघून गेली, त्या दाराशी येऊन उभा राहतो अन् दारावरील पडदा सारून पाहू लागतो. तोच –)

**बाजीराव** : कोण? तुम्ही? इथे कशाला उभ्या राहिल्या आहात? आमच्यावर पहारा करायला?

**मस्तानी** : (येत) नाही, नाही रावसाहेब, पहारा कसला? आपला सहारा मागायला.

**बाजीराव** : बाई, बोलण्यात आपण चतुर आहात.

**मस्तानी** : आपल्याला भेटायला आतुर मात्र खास आहे.

**बाजीराव** : ओहो, आपण कवयित्री दिसता.

**मस्तानी** : आपला अंदाज चूक कसा असेल? पण मघाशी मी गायिलेली कविता मी कशी केली होती याचाही अंदाज आपण कराल का?

**बाजीराव** : बाई, तुमच्या ओठांवर हे बोलणं! मग कमरेशी हा खंजीर कशाला?

**मस्तानी** : आपला सहारा मिळाला नाही तर त्याचा घ्यायला.

**बाजीराव** : तुमच्या या बोलण्यानं कोणीही विरघळून जाईल. पण आम्ही



www.esahity.com

म्हणजे कुणीही आहोत असं वाटलं की काय तुम्हाला?

**मस्तानी** : मला काय वाटलं हे मी आपल्याला कसं सांगू?

**बाजीराव** : बाई, तुम्हाला कुणी तरी मुद्दाम पाठवलेलं दिसतंय आमच्या चारित्र्याची परीक्षा पाहण्यासाठी.

**मस्तानी** : आपली परीक्षा पाहणारं या दुनियेत कोण आहे? पण आपण माझी मात्र परीक्षाच पाहत आहात.

**बाजीराव** : ज्यांची बुद्धी बंद पडली आहे असे राजकारणी लोक तुमच्यासारख्या मधुरभाषिणी बायकांच्या जादूनं प्रतिस्पर्ध्याला जायबंदी करायचे डाव खेळत असतात. बाई, त्या जादूनंच तुम्हाला इथपर्यंत प्रवेश मिळालेला दिसतो, पण यापुढे नाही.

**मस्तानी** : रावसाहेब, इथपर्यंत यायचंही मनात नव्हतंच माझ्या. दुरूनच आपलं दर्शन घेऊन निघून जाणार होते मी. माझ्या वेड्या मनाला मी सारखं समजावीत होते की भलताच हट्ट घेऊ नकोस! कुठे रावसाहेब, कुठे तू! ते स्वामी, तू दासी! ते वीर, तू नर्तकी! ते हिंदू, तू मुसलमान! त्यांनी जग जिंकलेलं अन् तू तर ते पाहिलेलंही नाहीस! संभाजीमहाराजांचं नाव घेऊन औरंगजेब बादशहाची मुलगी कुवारीण राहिली तशी मी कुठेतरी राहणार होते. पण आपल्यासमोर येण्याचा गुन्हा मी केला कारण माझ्या नावाचा उच्चार आपण पुनःपुनः करीत होतात तो मी ऐकला.

**बाजीराव** : का?

**मस्तानी** : माझाच उच्चार होता तो म्हणून!

**बाजीराव** : असं चोरून ऐकण्याचा काय अधिकार होता तुम्हाला?

**मस्तानी** : आपण माझ्या हृदयाची चोरी केलीत म्हणून.

**बाजीराव** : मस्तानीचा जप आम्ही करीत होतो, पण तो आमच्या मनातल्या मस्तानीचा. प्रत्यक्षातली मस्तानी आणि आमच्या मनातली मस्तानी यांत कदाचित जमीनअस्मानाचं अंतर असेल!

**मस्तानी** : आपल्या मनातलीच मस्तानी आपल्यासमोर उभी आहे. तिला अस्मानात धाडू नका.

**बाजीराव** : लुटून आणलेल्या सुभेदाराच्या सुनेला माता म्हणून परत पाठविणाऱ्या महाराजांचे आम्ही सेवक आहोत, बाई.



www.esahity.com

**मस्तानी** : ती सून होती, मी कुमारिका आहे. तिला धरून आणलं होतं, मी आपण होऊन आले आहे.

**बाजीराव** : पण हे मोगली विलास नको आहेत आम्हाला. जा.

**मस्तानी** : हा विलास वाटतो तुम्हाला? ठीक आहे. आपल्याला मी नको असेन तर माझी मलाही मी नकोच आहे.

(असे म्हणून मस्तानी खिडकीकडे धावते. बाजीराव क्षणभर तटस्थ राहतो, पण ती जीवावर उदार झाली आहे आणि आता खरोखरच उडी मारील हे जाणवताच अतिशय चपळाईने त्वरा करून पडतापडताच तिला वाचवतो.)

**मस्तानी** : कशाला वाचवलंत मला?

**बाजीराव** : तुला सावरलं नसतं तर आमचाच तोल गेला असता. ती खिडकी आता बंद! चल मस्तानी, फार दमलीस, फार शिणलीस.

**मस्तानी** : तुमच्या युद्धातल्या शिणवट्यापुढे हा कसला शिणवटा?

**बाजीराव** : तुला पाहिलं तेव्हाच सगळा शिणवटा हरपला, मस्तानी. पण मस्तानी, या जगात खऱ्याखुऱ्या माणुसकीचं राज्य केव्हा नांदणार कुणास ठाऊक! आजतरी आम्हाला आधी राजकारणी न् धर्मकारणी म्हणूनच वावरावं लागतं!

**मस्तानी** : पण त्या कारणीच तुमचा पराक्रम प्रगट होत आहे ना?

**बाजीराव** : मस्तानी, मस्तानी, ही अमृतवाणी तू आणलीस कुठून? मस्तानी, तू आम्हाला इतकं प्रेम दिलंस! आम्ही तुला काय देऊ?

**मस्तानी** : (हसून) अंतर देऊ नका म्हणजे झालं!

**बाजीराव** : (आनंदून) मस्तानी, आमच्या बुद्धीशी जुगलबंदी करील असं कोणी आम्हाला भेटलं नव्हतं! ये, मस्तानी ये! (पण ती लाजेने चूर होऊन खाली पाहत उभी राहते. बाजीराव जवळच असलेला गुलाबांच्या फुलांचा हार तिच्या गळ्यात घालतो अन् तिच्या हनुवटीला किंचित स्पर्श करतो न करतो तोच) मस्तानी, हा एवढा रक्तिमा, हा इतका लालिमा आम्ही कधी पाहिला नव्हता! मस्तानी, वेदांनी वाणी शिणेपर्यंत गायिलेली ही उषा, की साऱ्या कवींनी, चित्रकारांनी रंगवून न सरलेली ही संध्या? मस्तानी, तू इतकी कमालीची सुंदर कशी झालीस? गाता गाता गायकाला एखादीच तान अप्रतिम



www.esahity.com

जमून जाते. तशी आधी कधी तो गात नाही, पुन्हा गाऊन गाणार नाही, तशी विश्वकर्म्याच्या हातून तू झालीस काय? तुझं हे सौंदर्य पार्थिव खास नव्हे. त्याचं वर्णन कसं करू? मस्तानी, तुला काय म्हणू? मस्तानी, तू आमची झालीस! तुझं नाव काय ठेवू? तुला हाक काय मारू? (यापुढे मस्तानी वर्णनानुरूप नृत्य करते.) मस्तानी, स्वर्गलोकांतल्या रूपगर्विता पूर्वी भूतलावरील भाग्यवंत राजांना अचानक दिसत तशी तू दिसलीस म्हणून तुला रंभा म्हणू, की उर्वशी म्हणू, की मेनका म्हणू, की नुसतं अप्सराच म्हणू? मस्तानी, तू दिसलीस अन् दिसताक्षणीच आमचं हृदय जिंकलंस म्हणून तुला विजयिनी म्हणू, की स्वामिनी म्हणू, की साम्राज्ञी म्हणू? मस्तानी, तुझे डोळे पाहून तुला सुनयना म्हणू, की तुझा बांधा पाहून तुला सुमध्या म्हणू, की तू सगळीच सुरेख आहेस म्हणून एकदम चारुगात्रीच म्हणू? मस्तानी, तुझी नृत्यातली लय पाहून तुला राजहंसी म्हणू, की तुझी चपल गती पाहून हरिणी म्हणू, की कलोन्मत्तता पाहून मयूरी म्हणू? मस्तानी, पहिल्याच स्वरात हृदयाचा वेध घेणारं तुझं गायन ऐकून तुला रागिणी म्हणू, की तू मूर्तिमंत संगीतच आहेस म्हणून तुला संगीता म्हणू, की सगळ्या कलांचा आनंद तुझ्यापासून मिळतो म्हणून तुला कलावतीच म्हणू? मस्तानी, तुझी बुद्धिमत्ता पाहून तुला विद्या म्हणू, की तुझी लालित्यपूर्ण कविता आठवून तुला शारदा म्हणू, की कलाविद्यांचा संगम तुझ्याठायी झाला आहे म्हणून तुला सरस्वतीच म्हणू? मस्तानी, नादब्रह्म तू आम्हाला ऐकवलंस, रूपब्रह्म तू आम्हाला दाखवलंस, स्पर्शब्रह्म तू आम्हाला दिलंस. मस्तानी, तू आमची प्रेमसमाधीच लावलीस! मस्तानी, तुझ्या या प्रेमानं तुला शंकराची उमा म्हणू, की कृष्णाची रुक्मिणी म्हणू, की रामाची सीता म्हणू? मस्तानी, तुझ्या मोठेपणानं तू आम्हालाही मोठं केलंस! मस्तानी, अशी अबोल का? सांग, तुला नद्यांची नावं आवडतात का? आम्हाला नद्या अन् त्यांची नावंही फार आवडतात. सांग, तुला उत्तर हिंदुस्थानातली यमुना म्हणू, की आमच्या महाराष्ट्रातली कृष्णा म्हणू, की ज्या



www.esahity.com

ठिकाणी आपली गाठ पडली ती मध्यभारतातली संगमरवरी पहाडातून वाहणारी नर्मदा म्हणू?

**मस्तानी** : मला फक्त आपली म्हणा!

**बाजीराव** : (हसून) मस्तानी, तू मस्तानीच आहेस. आम्ही तुला मस्तानीच म्हणणार! मस्तानी, तू दुसऱ्या कोणत्याही स्त्रीत नाहीस. पण बाकी सर्व स्त्रिया तुझ्यात आहेत. म्हणूनच तू इतकी जवळ असतानासुद्धा तुला इतक्या हाका माराव्याशा वाटतात. तू दूर गेलीस तर?

**मस्तानी** : मी कशी दूर जाईन? तुम्हीच जाल मला सोडून, पण मी नाही राहणार तुमच्यामागे. तुमचा देश कसा आहे, तुमचा गाव कसा आहे, तुमचा वाडा कसा आहे, सारं सारं पाहायचंय मला.

**बाजीराव** : मस्तानी, आम्हालाही वाटतं की आमच्या या देशात इतके परदेशी लोक येऊन राहतात, त्यांचे देश एकदा पाहून यावं. ते नाना प्रकारच्या गोष्टी सांगणारे अन् चित्रविचित्र पोशाख करणारे इराणी, तुराणी, दुराणी, अरब; ते समुद्रावरून येऊन चमत्कारिक भाषा बोलणारे अन् घड्याळं, दुर्बिणी न् बंदुका विकणारे फिरंगी, टोपीकर, वलंदेज...

**मस्तानी** : मी येणार तुमच्याबरोबर.

**बाजीराव** : तू?

**मस्तानी** : का?

**बाजीराव** : अग, हे देश काय असेतसे पाहायला मिळणार आहेत? कित्येक वेळा लढाई करावी लागेल. कित्येक वेळा उन्हातान्हात रपेट करावी लागेल. कित्येकदा नुसताच हुरडा न् मिरची खाऊन राहावं लागेल!

**मस्तानी** : मी येईन उन्हातून. मी शिकेन घोड्यावर बसायला. मी राहीन काय हवं ते खाऊन.

**बाजीराव** : अग, तुझ्यासारख्यांनी मेण्यात बसावं, पालखीतून मिरवावं, चालायचंच झालं ततर पायघड्यांवरून मखमली गालिच्यावरून चालावं, अन् द्राक्षं, डाळिंबं, सफरचंदं अशी फळं खावीत!

**मस्तानी** : नाही, नाही. मी नाही तुम्हाला सोडणार!



www.esahity.com

**बाजीराव** : छे, छे, आमच्या मराठी फौजेत बायकांना मुळी बंदीच असते. बायका असल्यावर गनिमी कावा कुठला?

**मस्तानी** : मग मी कुठं राहू? कशी राहू? (रडू लागते.)

**बाजीराव** : (मोठ्याने हसून) खुळी कुठली! तुला सोडून जाऊन देशपरदेश आम्ही कशाला पाहावेत?

**मस्तानी** : खरं?

**बाजीराव** : मग खोटं की काय? पण एक जबरदस्त शंका वाटते आम्हाला!

**मस्तानी** : ती कोणती?

**बाजीराव** : तुझ्याबरोबर जग पाहायला गेलो की जग तुझ्याकडेच पाहत राहील!

**मस्तानी** : मला तुमच्याहूनही जबरदस्त शंका वाटते.

**बाजीराव** : कसली बुवा?

**मस्तानी** : तुमच्याबरोबर मी जग पाहायला आले तरी तुमच्याच गळ्यात आणखी माला पडतील!

**बाजीराव** : (हसून) मस्तानी, तू आमचा गळा मोकळा ठेवला असशील तर ना? मस्तानी, तुझे हात आमच्या गळ्यात असले म्हणजे त्या गळ्यातील हालाहलसुद्धा आम्हाला सह्य वाटेल. मस्तानी, प्रभू रामचंद्रांनी सीतेसाठी युद्ध कसं केलं असेल हे तुला पाहिल्यावर कळलं.

**मस्तानी** : (थोडी पुढे होऊन) पण रामचंद्रांनी सीतेला टाकलं तसं तुम्ही मला टाकणार नाही ना?

**बाजीराव** : तुला टाकू? छे छे, मस्तानी...

(तिचे हात हातांत घेतो. तिच्या लाजण्याचे साश्चर्य कौतुक करीत तटस्थ उभा राहतो. पण दोघांच्या मागील भिंतीवर पडलेल्या मोठ्या पडछाया मात्र एकमेकींत मिसळतात! तेवढ्यात एक मशालजी आणि त्याच्या मागोमाग प्रतिनिधी आत येतात. प्रतिनिधी पोक्त आहे. मशालजी शरमून बाजीराव-मस्तानीकडे पाठ करून उभा राहतो. प्रतिनिधी मात्र थोडा पुढे होतो.)

**प्रतिनिधी** : हर हर! छत्रपतींचे पेशवे यावनी स्त्रीच्या पाशात? मोगली मुलखाकडे आल्यावर मोगली विलास सुचू लागले! मग मागे मोगलाई झाल्याशिवाय कशी राहील?

**मस्तानी** : रावसाहेब, परवानगी असावी. (जाऊ लागते.)

**बाजीराव** : नको, नको. थांब तू.



www.esahity.com

**प्रतिनिधी** : आम्ही दक्षिणेतून साताऱ्याहून आलो. आम्हाला 'या बसा' सुद्धा नाही; अन् आमच्यासमोर एका परस्त्रीला बसायचा हुकूम?

**बाजीराव** : खुर्ची रिकामी आहे.

**प्रतिनिधी** : तुमच्या मंचकाशेजारी? हं! अरेरे! छत्रपती दुर्दैवी खरे! मदिरेच्या अमलाखाली गेल्यामुळे प्रत्यक्ष पिताजी शत्रूच्या ताब्यात सापडून हालहाल होऊन मेल्याचं लहानपणी पाहावं लागलं, अन् आता उत्तर आयुष्यात प्रत्यक्ष पंतप्रधान मदिराक्षीच्या जाळ्यात सापडल्यानं मराठेशाहीही लयाला गेल्याचं त्यांना पाहावं लागणार! तरी आम्ही छत्रपतींना आवर्जून सांगत होतो की राजकारण म्हणजे पोरखेळ नव्हे!

**बाजीराव** : प्रतिनिधी, काय आमच्यावर आरोप करायचे आहेत ते तिकडे दरबारात जाऊन करा ना. इथे कशाला आलात?

**प्रतिनिधी** : छान! छत्रपतींची तातडीची आज्ञा पोचविण्यासाठी लगबगीनं काळवेळ न पाहता आम्ही इथं आलो तर आमची 'कशाला आलात' म्हणून संभावना? छान! आम्हाला काही स्वप्न पडलं नव्हतं की पेशवे जागेपणीसुद्धा स्वप्नातच असतील!

**बाजीराव** : काय पाहिलंत तुम्ही इथे?

**प्रतिनिधी** : चक्षुर्वै सत्यं गोष्टीला वेगळं वर्णन कशाला?

**बाजीराव** : दिव्य चक्षू घेऊनच आलात की नाही?

**प्रतिनिधी** : श्रीमंत, नर्मदा ओलांडलीत आणि मर्यादा ओलांडलीत.

**बाजीराव** : पण आम्ही स्वराज्याची सीमा ओलांडलेली नाही तुमच्यासारखी शत्रूकडून लाच खाण्यासाठी!

**प्रतिनिधी** : अन् आम्ही घराचा उंबरठा ओलांडलेला नाही परस्त्रीचा हात धरण्यासाठी.

**बाजीराव** : प्रतिनिधी, आपल्याला कळत नाही त्यातलं बोलू नये माणसानं.

**प्रतिनिधी** : अन् आमच्या राजकारणाबाबतही बोलू नये तुम्ही मोठ्या तोंडानं.

**बाजीराव** : तुमची राजकारणं तुमच्या खाजगीतली नाहीत, प्रतिनिधी.

**प्रतिनिधी** : तुम्ही आम्हाला समजता कोण! छत्रपतींचे प्रतिनिधी आहोत आम्ही.



www.esahity.com

**बाजीराव** : छत्रपतींचेच पेशवे आहोत आम्ही. तुमची राजकारणं आमच्या अखत्यारीतली आहेत.

**प्रतिनिधी** : कशाला परस्त्रीपुढे हसं करून घेता! तुम्हाला मिळालेल्या मुलुखाचा ताबा घ्यायला आम्हाला पाठवलंय छत्रपतींनी!

**बाजीराव** : आम्ही मिळवायचं आणि तुम्ही खायचं. वडीलकीच्या नात्यानं तुम्ही अधिकार मिरवायचा अन् आम्ही उत्साहाच्या भरात कष्ट उपसायचे अन् कर्जं वाहायची. धन्य तुमची अन् धन्य तुमच्या छत्रपतींची!

**प्रतिनिधी** : उत्तरेकडे आलात अन् उत्तरं करू लागलात, श्रीमंत.

**बाजीराव** : झेपावे उत्तरेकडे म्हणून आम्ही उत्तरेकडे निघालो अन् उत्तरोत्तर प्रगती करू लागलो ही आमची चूक! ठीक आहे. तूर्त तरी तुमच्या हातांत उत्तर सोडून छत्रपतींच्या दर्शनासाठी आम्ही दक्षिणेकडे जातच आहोत.

**प्रतिनिधी** : श्रीमंत, आणखी एक हुकूम आहे छत्रपतींचा.

**बाजीराव** : शिरसावंद्य आहे आम्हाला. द्या.

**प्रतिनिधी** : मराठेशाहीच्या छत्रपतींचा हुकूम हा. यावनी स्त्रीच्या सहवासात नाही मिळणार.

**मस्तानी** : रावसाहेब, नका अडवू मला.

(असे म्हणून जाऊ लागते; पण दाराशीच थबकते. प्रतिनिधी आज्ञापत्र बाजीरावाला देणार इतक्यात हात मागे घेतो; कारण मस्तानी लगेच परतून बाजीरावाच्या मागे जाऊन उभी राहते. प्रतिनिधीचा आरडाओरडा ऐकून दिलावर सारंगीवाला आलेला असतो. केवळ प्रतिनिधी-बाजीरावाचे भांडण असते तर तो आत आलाच नसता; पण तिथे मस्तानी आहे हे पाहून तो विस्मयाने आत येतो.)

**दिलावर** : मस्तानी, ह्या वेळी तू ह्या ठिकाणी? चल वापस. बोलत का नाहीस?

**मस्तानी** : दिलावर, माफ कर मला.

**दिलावर** : का?

**मस्तानी** : वापस येऊ शकणार नाही मी.

**दिलावर** : पण का?

**मस्तानी** : दिलावर, कसं सांगू? माझं मघाचंच गाणं आठव.

**दिलावर** : पागल पोरी, गाणं वेगळं आणि जगणं वेगळं. मागं फिर,



www.esahity.com

मागं फिर. मस्तानी, या हिंदूंची संगत कशाला धरतेस? आपल्या पंगतीला तुला ते कधीच घेणार नाहीत.

(या सर्व गडबडीमुळे राजा छत्रसाल, राणी आणि इतर काही स्त्रिया उजव्या दारातून आत येतात. त्याचवेळी डाव्या दारातून काही शिपाईगडी चोरून आत बघत राहतात.)

**प्रतिनिधी** : श्रीमंत, छत्रपती स्वामींचं आज्ञापत्र की यःकश्चित यावनीचा हात?

**दिलावर** : मस्तानी, कसम खाऊन सांगतो, जहर खाऊन पाहू नकोस!

(मस्तानी बाजीरावाजवळून हलत नाही. मग बाजीराव आपल्या डाव्या हाताने तिचा उजवा हात धरून पुढे येतो.)

**बाजीराव** : मस्तानी बाजीरावाची आहे! (हळूच मस्तानीला) अन् बाजीराव मस्तानीचा!



www.esahity.com

# मस्तानीचा बाजीराव

## अंक दुसरा

(सन १७३९चा सुमार, पुणे मुक्कामी शनिवारवाड्यातील मस्तानीमहाल. समोर मधोमध थोड्या अंतरावर तीन उंच खिडक्या आहेत. या खिडक्यांच्या अलीकडे सुमारे दोन हातांवर ठराविक अंतराने चार नक्षीदार खांब असून वर कलाकुसर केलेली तक्तपोशी आहे. या खांबांच्या अलीकडे उजव्या व डाव्या भिंतींना समोरासमोर एकएक दार आहे. दारांच्या चौकटी प्रेक्षणीय आहेत. डाव्या भिंतीवर सीतास्वयंवराचे आणि उजव्या भिंतीवर रुक्मिणीहरणाचे अशी चित्रे असून समोर खिडक्यांच्यावर ऋद्धिसिद्धींसहित श्रीगजाननाचे चित्र आहे. महालाच्या मागील अंगाला मधोमध झोपाळा टांगलेला आहे. पुढील भागात समोरासमोर थोड्या उंच अशा दोन बैठकी घातलेल्या आहेत. डाव्या बैठकीवर लिहिण्याचे छोटे बैठे उतरते मेज आहे. महालाच्या तक्तपोशीखाली हंड्याझुंबरे टांगलेली आहेत आणि भिंतीवर ढाल-तलवारी, भालेबंदुका इत्यादी शस्त्रे आहेत. सुरुवातीला सकाळ. बाळंभट आणि भिकंभट आत येऊन दाराशीच गुपचुप उभे राहतात आणि चाहूल घेतात. बाळंभट भिकंभटाला 'इथेच उभे राहा' अशी खूण करतो, आणि पाऊल वाजू न देण्याचा प्रयत्न करीत दुसऱ्या दारापर्यंत जाऊन कानोसा घेत उभा राहतो. भिकंभट टकमका महालाची शोभा पाहत असतो. त्याची नजर भालाबंदुकांवर स्थिर होते. बाळंभट परत येऊन 'भिकंभट' अशी हाक मारतो. त्याबरोबर तो दचकतो. भिकंभटाने भीतीने ओरडू नये म्हणून बाळंभट त्याच्या तोंडावर हात ठेवतो.)

**बाळंभट** : भिकंभट, अहो भिकंभट, तुम्ही इतके कसे हो भित्रट? (जरा हळू आवाजात) अहो, बाजीरावाला घाबरायला तुम्ही काय त्याचे शत्रू? तुम्ही तर अस्सल ब्राह्मण. आमच्या कटात वाटा उचला. हे रावसाहेबच घाबरतील तुम्हाला! अन् आज



www.esahity.com

ही पाहा त्यांनी एक पगडी करायला टाकली होती ती घेऊन आलोय.

**भिकंभट** : बाळंभट, इतकी छोटी?

**बाळंभट** : तुमचं डोचकंच छोटं, भिकंभट... उद्या रघुनाथरावाची मुंज ना? (पगडी ठेवतो.) हं तर काय, एका कंचनीसाठी रावसाहेबांनी इतकं नाचावं हे काही उचित नव्हे. आधी स्त्री, त्यातून परस्त्री, त्यातून परधर्मीय स्त्री, त्यातून तरुण! छे छे छे! अन् रावसाहेबांनी तिला बुंदेलखंडातून पुण्यात आणलं, पुण्यातून या शनवारवाड्यात आणलं, अन् आता शनवारवाड्यातूनही घरात अन् घरातूनही धर्मात आणायचं म्हणून हट्टच धरून बसलेत! शिवाजीमहाराजांनी सुरत लुटून आणली अन् सुभेदाराची सून परत केली. पण रावसाहेबांनी घरची लक्ष्मी बाहेर घालवली अन् ही पांढऱ्या पायांची अवदसा घरात आणली!

**भिकंभट** : बाळंभट, अहो बाळंभट... अं... मस्तानी दिसते कशी हो? नाही, म्हणजे पाहायची इच्छा नाही; पण...

**बाळंभट** : भिकंभट, बघाल तर तुमचे डोळे तिच्या वर्णासारखेच होतील – कर्पूरगौर!

**भिकंभट** : म्हणजे कुमारसंभवम् काव्यात कालिदासानं पार्वतीचा वर्णिलेला?

**बाळंभट** : परमेश्वराच्या शृंगाराचं वर्णन नका आठवू. प्रत्यक्ष कालिदासालाही शिक्षा झाली!

**भिकंभट** : चुकलोच.

**बाळंभट** : यांचं आठवा!... हॅ हॅ हॅ... आता यांनाच शिक्षा करायची वेळ आली आहे. अहो, हल्ली म्हणे मस्तानी न् रावसाहेब एका घोड्यावरून फिरत असतात!

**भिकंभट** : म्हणजे घोड्याचं मरणच!

**बाळंभट** : अहो, धर्माचं मरण ओढवलंय. ही मस्तानी म्हणजे विषवल्ली. सगळा भ्रष्टाकार माजवलाय तिनं. म्हणूनच विषावर विषाचाच इलाज करायचा. हं! बाजीरावाची झाली म्हणून काय झालं? रखेली ती रखेलीच. तेव्हा रावसाहेब येथून गेले की नानासाहेबांना इथं बोलवायचं. आलं ध्यानात!



www.esahity.com

भिकंभट : आलं सगळं ध्यानात. पण ना–ना–साहेब म्हणजे कोण कोण?

बाळंभट : ना–ना नव्हेत, नानासाहेब! रावसाहेबांचे थोरले चिरंजीव. हो, आत्तापासूनच त्यांच्याही पुढ्यात असलेलं बरं.

भिकंभट : आत्तापासूनच?

बाळंभट : अहो, हे भट घराणं सगळं रोगट. अप्पासाहेबांचं तुम्ही पाहतच आहात ना? तेच ताईसाहेबांचंही.

भिकंभट : ताईसाहेब कोण?

बाळंभट : रावसाहेबांच्या बाईसाहेब. सतत दुखणेकरी आणि आता तर हे सवतीचं वाढतं दुखणं. तेच काढायचंय आपल्याला. रावसाहेब रोगट नाहीत, पण रागीट. त्यातून व्यसनी. आज ना उद्या... जाऊ द्या. परमेश्वराचं काम परमेश्वर करीलच. आपलं काम आपण करू या. आलं ध्यानात?

भिकंभट : आलं सगळं ध्यानात. पण नानासाहेबांनी रावसाहेबांना बाहेर जाताना बघितलं असलं तर?

बाळंभट : सांगायचं, मस्तानीबाईसाहेबांनी बोलावलंय.

भिकंभट : बाप रे!

बाळंभट : बाईची गोष्ट अन् 'बाप रे' काय? अहो, या मकारीला हे हवंच आहे!

भिकंभट : ही मगरी कोण?

बाळंभट : आहे ती मगरीसारखीच. पण मकारी! म्हणजे 'म' आहे जिच्या प्रारंभी, ती! आलं ध्यानात?

भिकंभट : आलं सगळं ध्यानात,पण...

बाळंभट : अहो, या पीडेनं चंचुप्रवेश केलाच आहे या वाड्यात, हळूहळू सगळं अंग घुसवील. या एका मकारीनं आणखी किती मकार आणलेत! मद्य! मांस! तमाशे! छे छे छे!

भिकंभट : तुम्ही हे सर्व पाहिलंत?

बाळंभट : छे, छे! अब्रह्मण्यम्! पण या या कानांनी ऐकलंय. आता सांगा हे हे हे वाढत चाललं म्हणजे कुठला धर्म न् कुठलं काय? मग तुम्ही कशाला न् आम्ही कशाला? म्हणून वाड्यात तीर्थ, प्रसाद, अंगारा देताना बरोबर याही वार्ता देत चला. म्हणजे लोक भक्तिभावानं घेतील. तुम्ही वाड्यात करा. मी वाड्याबाहेर करतो. सांप्रत कलियुग. स्त्रीमुळे सर्वनाश.



www.esahity.com

दिवसेंदिवस अधर्मच माजणार. पण प्रयत्न करायचा. आलं ध्यानात?

**भिकंभट** : आलं सगळं ध्यानात, पण रावसाहेब, नानासाहेब आणि मस्तानीबाईसाहेब – चुकलो, मकारीबाईसाहेब – या तिघांची सूत्रं एकमेकांत गुंतवायची म्हणजे साक्षात भगवान शंकराच्या त्रिशूळाशीच गाठ आहे. आपल्या छातीत तर आत्ताच डमरू वाजायला लागला आहे!

**बाळंभट** : अहो, सगळा ब्रह्मवृंद, सगळे कारभारी, प्रत्यक्ष छत्रपती तुमच्या पाठीशी आहेत.

**भिकंभट** : पुढे कोणी नाहीत.

**बाळंभट** : अहो, खुद्द अप्पासाहेब, नानासाहेब आणि मुख्य म्हणजे रावसाहेबांच्या मातोश्री या घरातल्या मंडळींनाच ही ब्याद घालवण्याची घाई आहे. आलं ध्यानात?

**भिकंभट** : आलं सगळं ध्यानात. पण अप्पासाहेब म्हणजे दुसरे धर्मराज. ते या कृष्णकारस्थानाला साह्य कसे होणार?

**बाळंभट** : अहो, त्या धर्मराजालादेखील 'नरो वा कुंजरो वा' म्हणायला लावलंच ना कृष्णानं? बाजीरावसाहेबांना मोठी घमेंड आहे आपल्या राजकारणी कारस्थानाची, पण या पुणेरी कारस्थानातून बाहेर पडून दाखव, म्हणावं!

**भिकंभट** : आपण बाहेर पडलो तरी मिळवली.

**बाळंभट** : अहो, तोफेचा गोळा जातो पुढं अन् बत्ती लावणारा राहतो मागं. कृष्णमृत्तिका ठासून भरण्याचं काम झालंच आहे. तुम्ही फक्त तोंड लावा अन् नामानिराळे व्हा. सगळेच लोक बोलू लागले की रावसाहेबांना शंका येणार अन् तेच ही पीडा दूर करणार. नाहीतर ही गोरी मकारीच आपण होऊन काळं करील; किंवा तसा देखावा निर्माण करता येईल! आलं ध्यानात?

**भिकंभट** : आलं सगळं ध्यानात...

**बाळंभट** : 'पण!'

**भिकंभट** : अहो, रावसाहेब एवढे दिल्ली जिंकून आले, त्यांना...

**बाळंभट** : दिल्ली जिंकली म्हणजे स्वर्ग तर नाही जिंकला? पण हे तर स्वर्गावर स्वारी केल्याच्या थाटात ही 'अपसरा' घेऊन आले



www.esahity.com

आहेत! हुं:! अहो, ही मस्तानी म्हणजे मसणाचं साधन. म्हणूनच रावसाहेबांना स्वर्ग मिळावा ही आपली धडपड. एकदा हा वाडा यवनमुक्त केला की गोमूत्रानं धुवायचा अन् गोमयानं सारवायचा. पण केवढा मोठा शनवारवाडा बांधून ठेवलाय हा! तरी छत्रपतींनी आज्ञा करून दगडी बांधकाम थांबवलं. नाहीतर तटाच्या भिंती दुप्पट उंच न् जाडजूड करायच्या होत्या रावसाहेबांना. आता हा सारा महावाडा गोमूत्रानं धुवायचा न् गोमयानं सारवायचा म्हणजे अख्खं गोकुळच आणावं लागेल! अहो, गोकुळ तरी पवित्र का? गोमूत्र आणि गोमय यांमुळेच. आणि गोबरोबर ब्राह्मण. धन्य ते छत्रपती शिवाजीमहाराज. गोब्राह्मणप्रतिपालक! नाहीतर हे पेशवे! खास गणेश दरवाजावरील श्रीमहागजाननाची महापूजा करतो म्हणून थोडंबहुत वतन मागितलं तर 'आज बघू', 'उद्या बघू' चाललंय. पण सगळं राज्य त्या मस्तानीचंच वतन होऊ घातलंय. सगळं राज्य गोमूत्रानं धुतलं पाहिजे. भिकंभट, तुमच्याजवळ आहे का हो? गोमूत्रामृत?

**भिकंभट** : मी नेहमीच जवळ बाळगतो.

**बाळंभट** : हिंदुपदपातशाही तुम्हीच टिकवाल! पण तुम्हाला या यावनीच्या पदन्यासानं अस्पृश्य झालेल्या महालात यावं लागलं! प्या गोमूत्रामृत प्या!

**भिकंभट** : आधी तुम्ही प्या.

**बाळंभट** : आधी तुम्हीच.

**भिकंभट** : प्रथम आपण!

**बाळंभट** : तो मान आपलाच!

(बळेबळेच एकमेकांना गोमूत्र पाजतात. प्यायल्यावर मोठा प्रसन्न चेहरा करतात. इतक्यात बाजीरावाचे शब्द ऐकू येतात, 'हाणा, मारा, तोडा! अरे पाहता काय? दोघेजण दोन्हीकडून आलेत काय? त्यांना भेटूच देऊ नका. दोघे असले म्हणून काय झाले? तुम्ही एकेकटे त्या दोघांना भारी आहात. पकडा आणि रगडा.' दोघे भटजी गडबडतात, धडपडतात आणि पळून जातात. बाजीराव आणि समशेरबहाद्दर लुटुपुटीचे द्वंद्वयुद्ध खेळत प्रवेश करतात. समशेरचे वय सुमारे पाचसहा वर्षे. बाजीराव मागे हटत येतो. समशेर वार करीत येतो.)

**बाजीराव** : अरे, चला जोराने चाल करून. आता हिंदुपदपातशाहीला



www.esahity.com

काय उशीर?

**समशेर** : अरे, चला जोराने चाल करून. आता हिंदुपदपातशाहीला काय उशीर?

(थोडी धावतच मस्तानी येते आणि बापलेकांचे कौतुक पाहत दारात उभी राहते. बाजीराव समशेरला घेऊन झोपाळ्यावर झोके घेतो.)

**बाजीराव** : शाब्बास, समशेर! तू खरा लढवय्या होशील. पण समशेर, तू हिंदुपदपातशाहीसाठी लढशील?

**समशेर** : बाबासाहेब, तुमच्याहून जास्त लढेन.

**बाजीराव** : खरंच लढशील?

**समशेर** : तुम्ही खोटं लढता?

(बाजीराव मोठ्याने हसतो.)

**मस्तानी** : (पुढे येत) जेव्हा बघावं तेव्हा लढाई, लढाई, लढाई. दारी तेच अन् घरीही तेच. दुसरा विषयच नाही का हो सुचत तुम्हाला?

**बाजीराव** : नाही कसा? अगदी लढाईतसुद्धा एकच विषय सुचतो आम्हाला! (मोठ्याने हसतो.)

**मस्तानी** : चला! (लाजून हसते.)

**समशेर** : अन् बाबासाहेब, मग तुम्ही खोटी लढाई करता?

(बाजीराव मनापासून खूप मोठ्याने हसतो.)

**मस्तानी** : समशेर! समशेर, तुझे बाबासाहेब कोण आहेत?

**समशेर** : माझे बाबा!

**मस्तानी** : समशेर!

(बाजीराव पुन्हा हसतो.)

**मस्तानी** : समशेर, तुला एवढंच शिकवलं वाटतं?

**बाजीराव** : अग, तो काय खोटं बोलतोय? समशेर, तू अगदी खरं बोलतोस हं. आम्ही तुमचे बाबा आणि तुम्ही आमचे बेटे. पण समशेर, आम्हाला हळूच कानात सांग, आईनं तुला आमच्यासंबंधी काय सांगितलंय? बघू तरी मायलेकांचा काय कट चालतो आमच्याविरुद्ध?

**समशेर** : (बाजीरावाच्या कानाजवळ तोंड नेतो. पण आवाज मोठाच राहतो.) बाबासाहेब, बाबासाहेब, आई म्हणते की नई की तुम्ही फार फार मोठे आहात. सगळ्या हिंदुस्थानापेक्षा, सगळ्या



www.esahity.com

दुनियेपेक्षा मोठे आहात! पण बाबासाहेब, तुम्ही तर या झोपाळ्यापेक्षादेखील लहान आहात!

**बाजीराव** : समशेर!

(बाजीराव खळखळून हसतो.)

**मस्तानी** : समशेर, तुला कसं रे सांगायचं?

**समशेर** : आई, आम्ही काही खोटं नाही बोलत. हो की नाही हो, बाबा?

**बाजीराव** : खऱ्यापेक्षादेखील खरं!

**समशेर** : बघ आई! बाबासाहेब, आम्हीपण तुमच्यासारखे मोठे होणार! हिंदुस्थानापेक्षा, दुनियेपेक्षा...

**बाजीराव** : अन् झोपाळ्यापेक्षा! (मोठ्याने हसून) जरूर, सवाई बाजीराव होऊन दाखव!

**मस्तानी** : समशेर, तू बाबासाहेबांसारखाच मोठा होणार ना? मग बाबासाहेब काय खोटी लढाई करतात वाटतं?

(बाजीराव पुन्हा हसतो.)

**समशेर** : मग बाबासाहेब का म्हणतात, 'तू खरंच लढशील का' म्हणून? बाबासाहेब लढतात. मी त्यांच्यापेक्षा जास्त लढेन. ते वीर ब्राह्मण आहेत, मी सवाई वीर ब्राह्मण होईन! (मस्तानी आणि बाजीराव विचारात पडतात. झोपाळा थांबवून स्वस्थच बसतात.) आई, मी बाबासाहेबांचाच मुलगा आहे ना? आई, मी खरंच बोलतो ना? मग बाबासाहेब का म्हणतात, 'तू खरंच लढशील का' म्हणून? आई, सांग ना. आई, बोल ना. बाबासाहेब, तुम्हीपण का बोलत नाही? आमच्याशी कुणी बोलत नाही. वाड्यात तर सगळे लोक सारखे कुणाशी ना कुणाशी बोलत बसतात. पण आमच्याशी कोणी बोलत नाही. नानासाहेब म्हणतात, 'मला नाही वेळ तुझ्याशी बोलत बसायला.' रघुनाथदादा म्हणतो, 'आमची मुंज होणार आहे! तुझी नाही! आम्ही नाही खेळणार जा तुझ्याशी.' अन् आजी तर घरातून लांबूनच म्हणतात, 'दूर दूर. तू आपल्या महालात नाच जा.' पण इथं तरी कोण बोलतंय आमच्याशी? बाबासाहेब, मी चुकलो. पुनः नाही म्हणणार, तुम्ही खोटं लढता म्हणून! आई, आता नाही ना तू रागावणार माझ्यावर?



www.esahity.com

नको ना रागावूस, आई...

(मस्तानीच्या पायाला बिलगतो. ती त्याला थोपटू लागते.)

**बाजीराव** : रडू नकोस, राजा. तुझ्यासारख्या गुणी बाळावर कोणते आईबाप रागवतील? बेटा, लोक रागवलेत आमच्यावर, पण तो राग काढताहेत तुझ्यावर. खूप मोठा होशील तू. ते तुझ्या हातांत आहे. ते तुझ्या रक्तात आहे. आमचं ब्राह्मणपणसुद्धा तुझ्या रक्तात आहे रे, पण ब्राह्मण म्हणवून घेणं मात्र तुझ्या हातांत नाही अन् आमच्याही हातांत नाही. ते बाकी सगळ्या ब्राह्मणांच्या हातांत आहे! मस्तानी, कसं ब्राह्मतेज झळकतंय याच्या चेहऱ्यावर! अग, आमचाच चिरंजीव आहे हा! आमच्याच भट वंशाचा अंश आहे याच्यात! अन् मस्तानी, तुझ्या सूर्यवंशीय पिताजींनी – छत्रसालमहाराजांनीही आपलं क्षात्रतेज संचारवलंय याच्या रक्तात! बघ, बघ! ब्राह्मतेज अन् क्षात्रतेज! मस्तानी, आमच्या कुलदैवत परशुरामाचा तर हा नवा अवतार नाही? मस्तानी, तुला हिंदू होणं आवडेल?

**मस्तानी** : तुमच्यावेगळं राहण्यावाचून कुठलीही गोष्ट आवडेल मला. पण तुमचे लोक सौभाग्यवतीचं कुंकू कसं लावू देतील मला?

**बाजीराव** : आम्ही इंद्रप्रस्थावर हिंदुपदपातशाहीचं केशरी निशाण कसं लावलं? मस्तानी, यापुढे वाट पाहायची नाही. उद्या रघुनाथाची मुंज. परवा समशेरची झालीच पाहिजे अन् त्याचं नाव परशुराम ठेवलंच पाहिजे. समशेरसाठी एक पगडीदेखील करायला सांगितली आहे आम्ही.

**समशेर** : बाबासाहेब, बाबासाहेब, ही बघा सापडली. आई, कसा दिसतो मी?

**बाजीराव** : (त्याची पगडी नीट करीत) याला कोण ब्राह्मण म्हणणार नाही? मस्तानी, शत्रूंचा समाचार घेतल्यावाचून आमचं मन राहत नाही; अन् आता तुला 'नर्मदा' अन् समशेरला 'परशुराम' म्हटल्यावाचून आमचं चित्त स्थिर होणार नाही. मस्तानी, हिंदुपदपातशाहीसाठी आम्ही जिवाचं रान केलं पण गवताचं पान मागितलं नाही. आता आमची ही एकच हौस यांनी पुरवावी, हिंदुपदपातशाहीची साऱ्या पूर्वजांची



www.esahity.com

हौस आम्ही पुरवू. मस्तानी, वाड्यातल्या सगळ्या मंडळींना अन् गावातल्या प्रतिष्ठित ब्राह्मणांना बोलावणं धाडलंय आम्ही. इतके दिवस स्वाऱ्यांच्या मागे लागून, अन् नव्यानव्या मोहिमा अंगावर घेऊन, मस्तानी, आम्हीच तुझ्याकडे अन् समशेरकडे दुर्लक्ष केलं. पण यावेळी आम्ही याच कामासाठी पुण्यात मुक्काम ठोकलाय. दिल्लीतली कामं होतात अन् पुण्यातली होऊ नयेत? (चिमाजी येऊन दारात उभा राहतो.) अप्पानं तर आजपर्यंत आमची हरेक योजना आमच्या अपेक्षेपलीकडे यशस्वी करून आम्हाला साथ दिली आहे. याही कामात...

**समशेर** : काकासाहेब आले! काकासाहेऽब! (धावत चिमाजीकडे जातो. चिमाजी त्याला दूर करतो.)

**चिमाजी** : बाळ, मोठी माणसं कामात असली म्हणजे त्यांना त्रास देऊ नये, असं शिकवलंच असेल तुला तुझ्या आईनं! (समशेर हिरमुसला होऊन मस्तानीच्या पायांशी मिठी मारतो अन् मुसमुसतो.)

**मस्तानी** : (आवंढा गिळून समशेरला थोपटत) समशेर, वेड्या, काकासाहेबांनी चुकीचं का सांगितलं काही? जा आत.

(डोळे पुसून समशेर आत जातो.)

**बाजीराव** : अप्पा, शंभर वर्षं आयुष्य तुला. बाकीची मंडळी कुठं आहेत? नाना का नाही आला?

**चिमाजी** : नानासाहेब जरा वेळानं येईल.

**बाजीराव** : अन् तुमच्या वहिनीसाहेब नाही आल्या?

**चिमाजी** : त्यांची तब्येत ठीक नाही.

**बाजीराव** : काल आम्ही आलो तेव्हा तर ठीक होती.

**चिमाजी** : तुम्ही गेलात आणि त्यांची तब्येत बिघडली.

**बाजीराव** : आम्ही इकडे आलो म्हणून?

**चिमाजी** : मला माहीत नाही, रावजी.

**बाजीराव** : मग आम्ही तिकडे येतो.

**चिमाजी** : 'एकटे या' असं सांगणं आहे आईसाहेबांचं.

**बाजीराव** : का?

**चिमाजी** : आईसाहेब देवघरात पूजाअर्चा करीत बसल्या आहेत.

**बाजीराव** : या वेळी?



www.esahity.com

**चिमाजी** : या वाड्यात आता काळवेळ उरली आहे कोठे?

**बाजीराव** : अप्पा, तूही असं बोलावंस? अप्पा, आईसाहेबांना म्हणावं तुमची दुसरी सून तुम्हाला भेटायला येणार आहे. द्वितीय विवाह भट घराण्यात काही अद्वितीय नाही. अन् अप्पा, आपण तिला हिंदू करू या. मग...

**चिमाजी** : बाई हिंदू झाल्या तर...

**बाजीराव** : 'बाई'? तिचं तुमच्याशी काही नातं नाही?

**चिमाजी** : त्या हिंदू झाल्या तर बघता येईल. तोपर्यंत...

(मस्तानी दुःखाने निघून जाते.)

**बाजीराव** : आम्ही एकट्यानंच यावं, असंच ना?

**चिमाजी** : रावजी, यापुढे स्वारीवरही तुम्हाला एकट्यानंच जायला पाहिजे.

**बाजीराव** : का?

**चिमाजी** : रावजी, तुम्ही सांगायचं आणि मी ऐकायचं. पण या एका विषयात मात्र...

**बाजीराव** : नाही, नाही अप्पा, नाही.

**चिमाजी** : रावजी, राजकारणंही लांबणीवर पडून चालायचं नाही. लोकरीतीप्रमाणं...

**बाजीराव** : अप्पा, लोकांना नीतीचे पाठ देणारा पंतोजी आम्ही नव्हे.

**चिमाजी** : पण लोक ते तुमच्यापासूनच घेणार. लोकांना दूरान्वयानंदेखील दोष दाखवता येऊ नये म्हणून रामचंद्रांनी प्रत्यक्ष धर्मपत्नीचादेखील त्याग केला होता.

**बाजीराव** : अप्पा!

**चिमाजी** : मोठेपणाची दुःखंदेखील मोठीच असतात, रावजी.

**बाजीराव** : नाही, अप्पा, नाही. आमचं मन तिच्याशिवाय आमचं राहत नाही.

**चिमाजी** : बरोबर बोललात, रावजी. हा सारा तुमच्या मनाचा खेळ आहे. तुमच्या बाहूंतलं सामर्थ्य खास तुमचं आहे. रावजी, ते असं दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या हाती देऊ नका! बाईंची अन् तुमची गाठ पडलीच नसती तर...?

**बाजीराव** : तर... तर...?

**चिमाजी** : तर रावजी, छत्रपतींची गैरमर्जी झाली नसती, अन् तुमचं मन



www.esahity.com

निचिंत राहून तुमच्या हातून अजून मोठी कार्यं घडली असती. बाईंची गाठ पडण्यापूर्वीच तुम्ही दिल्लीपर्यंत मजल गाठली होती.

**बाजीराव** : तिची गाठ पडण्यापूर्वी.

**चिमाजी** : अगदी खरं आहे आता तुम्हाला शंका वाटणं. पण रावजी, तुमचा सरळ स्वभाव, आपल्या घरचं वळण, हिंदुपदपातशाहीची तुमच्या मनातली ओढ हे सारं लक्षात घेतलं म्हणजे खात्रीनं वाटतं की या प्रकरणातलं पहिलं पाऊल टाकलेलं असलं पाहिजे बाईंनीच.

**बाजीराव** : म्हणजे गुन्हेगार ती आहे! मग फर्मावा काय सजा आहे ती. भोगू आम्ही.

**चिमाजी** : मनस्ताप करून घेऊ नका, रावजी. राजकारणी माणसानं भावनावश होऊन कसं चालेल?

**बाजीराव** : म्हणजे तिच्याविषयीच्या सगळ्या भावना आम्ही मनातून मारून टाकाव्यात? मग आम्ही हे सगळं करायचं ते कशासाठी? अप्पा, तिच्याशिवाय आम्ही दिल्लीपर्यंत मजल गाठली, पण आता आम्हाला फार पुढला टप्पा गाठला पाहिजे, अन् तो तिच्याशिवाय शक्य नाही. ती बरोबर असल्यावर आम्हाला कोणतीही चिंता नाही.

**चिमाजी** : पण आम्हाला आहे ना!

**बाजीराव** : ती बरोबर असल्यावर आम्ही कोणत्याही संकटांवर मात करू. अप्पा, आमच्या मोहिमा आम्ही सांगूनसवरून पार पाडून दाखविलेल्या आहेत ना? संकटं चोहीकडून कोसळणार हे ध्यानात धरूनच, ती जमा होऊ लागण्यापूर्वीच आम्ही त्यांना छेद देतो. एकाच वेळी आम्ही निजाम, दाभाडे, सिद्दी, बंगष अशा अनेकांशी सामना दिलाच की नाही? दिल्लीच्या बादशहानं निजाम, खानडौरान, मुजफ्फरखान, मीरहुसेन खानकोका, शिवसिंग, कमरुद्दीनखान, सादतखान असे एकाहून एक बलाढ्य सरदार आमच्यावर धाडले असतानाही आम्ही दिल्ली जिंकून आलोच की नाही?

**चिमाजी** : रावजी, तुमच्या योजकतेविषयी अन् तुमच्या सामर्थ्याविषयी तिळमात्र शंका आमच्या मनात नाही. पण राजकारणाच्या



www.esahity.com

वेळी बाकीचे मायापाश दूरच ठेवायला पाहिजेत. रावजी, राजनीती म्हणजे योगसमाधी!

**बाजीराव** : अप्पा, ही योगसमाधी साधण्याच्या प्रयत्नात कायमची समाधी घेण्याचाच योग येईल.

**चिमाजी** : रावजी, हिंदुपदपातशाहीच्या उद्धारासाठी, तुमच्या कल्याणासाठी आणि बाईंच्याही भल्यासाठीच त्यांना पुण्याला ठेवूनच तुम्हाला प्रयाण केलं पाहिजे.

**बाजीराव** : आमच्याबरोबर आल्याशिवाय ती राहणार नाही अन् तिला घेतल्याशिवाय आम्हीही जाणार नाही.

**चिमाजी** : रावजी, बाईंच्यापासून एक क्षणभरही दूर होणं तुम्हाला इतकं भयंकर अवघड वाटतं. युद्धाच्या मामल्यात बाई कायमच्या दूर गेल्या तर?

(बाजीराव सुन्न होतो.)

**चिमाजी** : रावजी, येतो आम्ही. (जातो.)

**बाजीराव** : (स्वतःशीच) मस्तानी... मस्तानी... मस्तानी...

(धोंडोशास्त्री, बाळंभट आणि भिकंभट प्रवेश करतात)

**धोंडोशास्त्री** : गोविंद! गोविंद! गोविंदनामाचा जप करावा.

**बाळंभट आणि भिकंभट** : अहाहा! गोविंद! गोविंद!

**बाळंभट** : भिकंभट, गोविंदनामात कोणता आनंद आहे?

**भिकंभट** : बाळंभट, नाम हाच आनंद! गोविंद! गोविंद!

**बाळंभट** : छे छे छे! भिकंभट, गोब्राह्मणात गो आहे, गोमूत्रात गो आहे, अन् गोविंदातही गो आहे! गो!

**भिकंभट** : गोविंद! गोविंद!

**बाजीराव** : यावं, यावं शास्त्रीबुवा, फार फार आनंद वाटला.

**बाळंभट** : रावसाहेब, धोंडोशास्त्र्यांचं कीर्तन ऐकाल तर आनंदानं नाचाल. रुक्मिणीहरणाचं आख्यान काय सुंदर लावतात शास्त्रीबुवा! रुक्मिणीहरण म्हणजे धोंडोशास्त्री आणि धोंडोशास्त्री म्हणजे रुक्मिणीहरण! ती रुक्मिणी अन् तो कृष्ण प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभे करतात ते! हा हा हा कृष्ण आला अन् रुक्मिणीला उचलून रथ दौडवीत निघाला! अहाहा! रुक्मिणीस्वयंवर वाचल्यानं लग्न लवकर होतं म्हणतात. पण शास्त्रीबुवांचं रुक्मिणीस्वयंवर ऐकावं न् डोळे मिटून बोहल्यावर चढावं!



www.esahity.com

तसंच सीतास्वयंवर. असं समोर दिसतं की ही अशी सीता सुकोमल फुलांचा हार त्यांहून सुकोमल हातांनी घेऊन इकडून येत आहे अन् तिकडून धनुर्भंग करून श्रीरावसाहेब... हं म्हणजे... श्रीरामचंद्रप्रभू येत आहेत. अहाहा! प्रभू!

**बाजीराव** : उद्या सकाळी रघुनाथाची मुंज. संध्याकाळी शास्त्रीबुवांचं कीर्तन ठेवू. युद्धाच्या घोषणांनी किटलेले आमचे कान भगवन्नामाच्या श्रवणानं पावन होऊ देत.

**बाळंभट** : प्राणही पावन होतील.

**धोंडोशास्त्री** : गोविंद! गोविंद!

**बाळंभट आणि भिकंभट** : गोविंद! गोविंद!

**धोंडोशास्त्री** : पण या काळी आणि या स्थळी आम्हाला पाचारण करण्याचं कारण?

**बाजीराव** : सहकुटुंब सहपरिवार आपल्या चरणी लागून आपला आशीर्वाद घ्यावा, एवढीच आर्त आहे.

(बाजीराव आतील दाराशी जाऊन हलकेच हाक मारतो. 'मस्तानी... मस्तानी' काही क्षण शांतता. मग बाजीराव एकदम आश्चर्यचकित झालेला दिसतो.)

**बाजीराव** : (हळू आवाजात) मस्तानी, तुला आता मस्तानी कोण म्हणेल? (पुटपुटत) नर्मदा... नर्मदा...

(सर्वांगसुंदर हिंदू सुवासिनीच्या पोषाखात मस्तानी भारदस्तपणे पदार्पण करते. तिच्यामागून हिंदू पोषाखात समशेर येतो. बाजीराव त्याच्या डोक्यावर छोटी पगडी ठेवतो. बाजीराव शास्त्रीबुवांना वाकून वंदन करतो. मस्तानी लवून कृतानेक नमस्कार करते. समशेर साष्टांग नमस्कार घालतो. मस्तानी खाली पाहत बसते. बाजीराव आणि समशेर मागे उभे राहतात.)

**भिकंभट** : अष्टपुत्रा सौ...

(बाळंभट भिकंभटाला जोरात चिमटा काढतो.)

**धोंडोशास्त्री** : (गंभीरपणे) चारित्र्यवती भव!

**बाजीराव** : शास्त्रीबुवा...

**धोंडोशास्त्री** : (समशेरला) बाळ, सुखी हो. सर्वेऽत्र सुखिनः सन्तु। जा.

(समशेर बावरून आईवडिलांकडे पाहतो अन् मागे वळून पाहत जातो. सर्व लोक चित्रासारखे दिसतात. तो झोपाळ्याला अडतो. झोपाळ्यावर पडतो. त्याची पगडी झोपाळ्यावर पडते. तो तसाच निघून जातो. रिकामा झोपाळा पगडीला



www.esahity.com

आंदोलनं देत राहतो.)

**बाजीराव** : शास्त्रीबुवा...

**धोंडोशास्त्री** : रावसाहेब, धर्मरूढीप्रमाणं आम्ही तर कंचनीचं मुखावलोकनही करावयाचं नाही! आणि शास्त्रार्थाप्रमाणं परधर्मीय स्त्रीशी संग करून संतती निर्माण करणाऱ्या मोहांध धर्मच्युताला बहिष्कृत करण्यावाचून शिक्षा नाही. पण हिंदूंची काशीमथुरादी क्षेत्रं मुक्त करण्याचा यत्न आपण करीत आहात म्हणून आम्हाला वाटतं की धर्माचं खरं स्वरूप आपण आमच्याकडून समजावून घ्याल.

**बाजीराव** : आपल्याकडून धर्माची दीक्षा घेण्यासाठीच आम्ही सपत्नीक आपल्या चरणांपाशी उभे आहोत.

**धोंडोशास्त्री** : या आपल्या पत्नी?

**बाजीराव** : हो.

**धोंडोशास्त्री** : आपला शुभविवाह केव्हा झाला?

**बाजीराव** : मोंगलांच्या पराभवाच्या मुहूर्तावर हिंदुपदपातशाहीच्या वाढत्या विजयाच्या घडीला आम्ही हिच्याशी गांधर्व विवाह केला, शास्त्रीबुवा.

**धोंडोशास्त्री** : गांधर्व विवाह?

**बाजीराव** : दुष्यंतानं शकुंतलेशी केला तसा.

**धोंडोशास्त्री** : दुष्यंत क्षत्रिय होता.

**बाजीराव** : पण शकुंतलेची जात? ती तर रानात टाकून दिलेली पोर. अशीच शेतातली सीता रामानं नाही स्वीकारली? तिची जात?

**धोंडोशास्त्री** : पण यांची तर माहीत आहे?

**बाजीराव** : खऱ्याखऱ्या हिंदू राजाची मुलगी आहे ही.

**धोंडोशास्त्री** : या तर एका मुसलमान दासीची कन्यका.

**बाजीराव** : पण आज ती अंतर्बाह्य हिंदू झाली आहे. तुम्हाला नाही वाटत की पूर्वी यवनांनी पळवून नेलेल्या मुळीबाळींतली एखादी असहाय अबलाच हिची पूर्वज असेल म्हणून? आमच्या अगणित आयाबहिणी तेव्हा पळविल्या गेल्या. त्यांना, त्यांच्या मुलीबाळींना परत आणणं हे आमचं कर्तव्यच नाही का? नरकासुराच्या तावडीतून कृष्णानं हजारो कुमारिकांना



www.esahity.com

मुक्त केल्याच्या गोष्टी कशाला सांगायच्या? रामानं सीतेला युद्ध करून परत आणलं म्हणून त्याचं महत्त्व तरी कशाला गायचं?

**धोंडोशास्त्री** : अहो, पतितपावन देव ते. आपण पापी माणसं. तरीदेखील रामचंद्रांनी सीतेचा त्याग केलाच ना? तिनं आधी अग्निदिव्य केलं असूनसुद्धा? अन् रामानंसुद्धा जे केलं नाही ते आमच्यासारख्या पामरांनी कसं करावं?

**बाजीराव** : तुम्ही हिला हिंदू करणार नाही?

**धोंडोशास्त्री** : हा प्रश्नच उपस्थित होत नाही.

**बाजीराव** : आमच्या नावानं लावलेलं कुंकू हिनं पुसून टाकावं?

**धोंडोशास्त्री** : आमच्या परवानगीनं लावलं नव्हतंत.

(कुंकू पुसून टाकावं लागेल, या कल्पनेची भीती वाटून, 'नाही, नाही, असं होता कामा नये' अशा अर्थानं आवेगानं मान हलवीत आणि बाहेर येणारा हुंदका पदराने अडवीत मस्तानी धावत आत निघून जाते.)

**बाजीराव** : दगडाच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा आणि पंचप्राणांच्या माणसांची मात्र चेष्टा! पण धर्मातून गेलेली माणसं परत घ्यायची नसतील तर मोडलेली क्षेत्रं तरी पुनः मांडायचा हव्यास कशाला? अन् आपल्याखेरीज साऱ्या जगाला झिडकारून टाकायचं हीच काय वसुधैवकुटुंबकं वृत्ती? भूमी म्हणजे माणसं. भूमी मुक्त करायची म्हणजे माणसंही संकुचित धर्मातून विशाल धर्मात आणायची. हे करायचं नसेल तर आम्ही लढायचं तरी कशासाठी?

**धोंडोशास्त्री** : रावसाहेब, धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्। त्यात अवगाहन करण्याचं सामर्थ्य आजन्म ब्रह्मचर्य पाळणाऱ्या, वेदशास्त्रपुराणादिकात पारंगत झालेल्या आणि परमेश्वराचा साक्षात्कार झालेल्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, सात्त्विक महापुरुषालाच प्राप्त होत असतं. अहोरात्र ऐहिक गोष्टींचाच विचार करणाऱ्या, सुखी संसारानंही हौस न भागून वासना शमविण्याचे नवनवीन मार्ग शोधीत असलेल्या, धर्माचं आचरण करायला सवड नसलेल्या तरुण राजस पुरुषानं धर्माच्या कामी बोलता कामाच नये.

**बाजीराव** : धर्मासाठी आम्ही कामास मात्र आलंच पाहिजे! शास्त्रीबुवा,



www.esahity.com

मग संध्येच्या पळीऐवजी हातात तलवार घेऊन क्षत्रियाची कामगिरी करतो म्हणून आमचा गौरव का करता?

**धोंडोशास्त्री** : तो आपद्धर्म.

**बाजीराव** : मग आपद्धर्म म्हणून तरी आमच्या पत्नीला आपण सौभाग्यवती का करीत नाही? अन् आमच्याच चिरंजीवाला आमचं नाव का देत नाही?

**धोंडोशास्त्री** : रावसाहेब, संध्येची पळी ठेवून आपण हातात तलवार घेतलीत म्हणून आपल्या हातांतलं रक्त बदलत नाही. पण ती तलवारही ठेवून आपण त्या हातांत परकीय स्त्रीचा हात धरलात म्हणजे मात्र संततीचं रक्त अशुद्ध झाल्यावाचून राहत नाही. छे छे! स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।

**बाजीराव** : नाही, नाही, काय वाटेल ते करायला सांगा, पण शास्त्रीबुवा, उद्या रघुनाथाची मुंज आहे तशी परवा या समशेरची, नव्हे परशुरामाची, झालीच पाहिजे.

**धोंडोशास्त्री** : रावसाहेब, ज्याच्या त्याच्या पूर्वसंचिताप्रमाणं देव ज्याला त्याला जन्म देत असतो. देव फार दयाळू आहे.

**बाजीराव** : आपण भूदेव आहात, शास्त्रीबुवा. त्या देवानं आम्हाला हा मुलगा दिला. त्या या आमच्याच मुलाला आमचा म्हणण्याचा अधिकार आपण आम्हाला द्या.

**धोंडोशास्त्री** : दैवाच्या मनात असतं तर याच बाई एखाद्या उच्च हिंदू ब्राह्मण कुळात जन्माला आल्या असत्या आणि आपल्या धर्मपत्नी झाल्या असत्या. मग आम्ही आपल्या सुपुत्राची मुंज मोठ्या आनंदानं केली असती. पण दैवाची लीला अगाध आहे!

**बाजीराव** : माणूस मेल्यावर सांगायच्या दैवाच्या गोष्टी आमच्या मुलाला द्विज करायच्या वेळी बोलता?

**धोंडोशास्त्री** : दैवाचा राग आमच्यावर काढू नका, रावसाहेब. रामकृष्णदेखील दैवाधीन होते. या जन्मात धर्माचं आचरण यापुढे तरी करा म्हणजे परमेश्वरकृपेनं पुढचा जन्म सुखाचा येईल.

**बाजीराव** : धर्माचंच काम आम्ही करतो आहोत. तेव्हा ती वेळ लवकरच येईल!

**धोंडोशास्त्री** : गोविंद! गोविंद!



www.esahity.com

**बाळंभट आणि**
**भिकंभट** : गोविंद! गोविंद!

**बाजीराव** : आमच्या मुलाची माती हिंदूची आहे एवढं तरी मान्य करा. आम्हीही मातीतून सेनापती घडविले आहेत. आम्ही शूद्राचाही इंद्र करून दाखवू. पण स्वधर्माच्या सेवेविना कोणताही विचार आमच्या चित्ताला कधी शिवला नाही त्या आम्हीच परधर्माला पोसलं असं होऊ देऊ नका.

**धोंडोशास्त्री** : म्हणजे तेच – धर्मांतर.

**बाजीराव** : थोरल्या छत्रपतींनी धर्मांतरं केली नव्हती?

**धोंडोशास्त्री** : ते अवतारी पुरुष.

**बाजीराव** : पण अवतारी पुरुषसुद्धा तुम्हीआम्ही काय करावं हेच दाखवतात ना?

**धोंडोशास्त्री** : छे, छे. आपण मार्गाधारे वर्तावं. कमीजास्त करण्याची वेळ आलीच तर अवतारी पुरुष जन्म घेतातच! संभवामि युगे युगे!

(धोंडोशास्त्री आणि दोघे भटजी हात जोडतात.)

**बाजीराव** : म्हणजे आम्ही जे केलं ते करायला नको होतं?

**धोंडोशास्त्री** : आपण जाणते आहात, रावसाहेब.

**बाजीराव** : म्हणजे शत्रूंचा बंदोबस्त आम्ही करायला नको होता? यवनांना यमुनेपार लोटायला नको होतं? हिंदुपदपातशाहीची विजयपताका दिल्लीवर रोवायला नको होती?

**धोंडोशास्त्री** : गोविंद! गोविंद! असं कोणी म्हटलं?

**बाजीराव** : शास्त्रीबुवा, यवनांच्याकडून आम्ही विजयश्री हरण करून आणली तेव्हाच ही यवन स्त्री आमच्याबरोबर आली. या दोघींची फारकत कशी होईल? शास्त्रीबुवा, आम्ही हे काम न करतो तर धर्म तरी राहिला असता का?

**धोंडोशास्त्री** : कोण हा अहंकार! अशा प्रकारची भाषा करणं म्हणजे अविश्वास व्यक्त करणं आहे प्रत्यक्ष परमेश्वराविषयी. सगळा देश यवनमय झाला असेल आणि पाचसात शतकं झाला असेल! पण आम्ही जगलोच आहोत की नाही? रावसाहेब, आपलं म्हणणं आम्हाला मान्य नाही आणि कोणत्याही हरिभक्ताला ते मान्य होणार नाही.



www.esahity.com

**बाजीराव** : आपल्याला मान्य नाही म्हणजे कुणालाही मान्य नाही, असं कसं?

**धोंडोशास्त्री** : आमच्यावरही अविश्वास? छान! ओंकारेश्वराच्या मंदिरात पुण्यातील समस्त ब्राह्मणगण आता जमणारच आहे. ऐकवा त्यांना ही आपली मनःपूत वाणी!

**बाजीराव** : अवश्य! हिंदुस्थानचा रंग आम्ही पालटू शकतो तर पुण्याचा का नाही?

**धोंडोशास्त्री** : चला ओंकारेश्वरावर. होऊ द्या प्रज्वलित अग्नी आपला वाग्यज्ञाचा!

**बाजीराव** : आनंदानं. (आत जातो.)

**धोंडोशास्त्री** : काय चमत्कार! फिरंगी युवती हातात आली असताना धाकटा भाऊ सन्मानानं परत पाठवतो अन् थोरला भाऊ यावनीला हात धरून घरात आणतो! गोविंद! गोविंद!

**बाळंभट आणि**
**भिकंभट** : गोविंद! गोविंद!

(धोंडोशास्त्री भिंतीवरील चित्राकडे हात जोडून पाहत उभा राहतो.)

**बाळंभट** : (बाजूला हळूच) भिकंभट, आता तुमची कामगिरी! ध्यानात आहे ना?

**भिकंभट** : आहे सगळं ध्यानात, पण...

**बाळंभट** : बाजीरावासारख्या लढवय्यावर मात करायची अन् रडतराऊत काय बनता? तुम्ही ही पिछाडी संभाळा. मी तिकडे आघाडी संभाळतो. आज सोक्षमोक्ष झालाच पाहिजे.

(असे बोलून हावभाव करीत त्याच्या कानात कुजबुजत काही योजना समजावून देऊ लागतो. इतक्यात बाजीराव पगडी घालून बाहेर जाण्याच्या तयारीने येतो. तो दाराशी येताच...)

**मस्तानी** : (आतूनच हळू आवाजात) अहो, जेवून नाही तर थोडं खाऊन तरी घ्यायचं होतं?

**बाजीराव** : (दाराशीच थबकून) वाट पाहू नकोस आमची.

**मस्तानी** : (दारात येत) तुमच्याशिवाय समशेर...

**बाजीराव** : अंहं– परशुराम!

**मस्तानी** : हो, परशुरामदेखील नाही जेवायचा.

**बाजीराव** : नर्मदा, तू परशुरामाला जेवू घाल. तोपर्यंत येतोच, हं?



www.esahity.com

(गणपतीच्या चित्रासमोर उभा राहतो. नमस्कार करतो. मस्तानीही तसेच करते. 'गोविंद! गोविंद!' करीत धोंडोशास्त्री जातात. 'गोविंद! गोविंद!' करीत बाळंभट भिकंभटाला कोपरखळी मारतो आणि मस्तानीकडे चोरून पाहत निघून जातो. पाठोपाठ बाजीराव जातो. मस्तानी खिडकीशी जाऊन बाहेर पाहत पाठमोरी उभी राहते. दारातून नाना प्रवेश करतो. गुपचूप. बाहेर कुणाला तरी 'थांबा, बाजूला उभे राहा' अशी खूण करतो.)

**नाना** : बाईसाहेब!

**मस्तानी** : (चमकून) अगबाई! कोण? नानासाहेब? एवढ्या मोठ्या वाड्यात जिवाला एकाकी वाटतं. तुम्ही आलात, जिवात जीव आला माझ्या! किती वेडी मी. माझंच गाणं गात बसले आहे. या ना. बसा ना. सूर्य आज पश्चिमेला कसा उगवला?

**नाना** : तुमचं गाणं ऐकायलाच. म्हणजे तुम्ही आता गात होता ना तेच... 'एवढ्या मोठ्या वाड्यात, जिवाला एकाकी वाटतं...' (हसून) मागे तुम्हाला ठेवून बाबासाहेब मोहिमेवर गेले तेव्हा तुमच्या सारख्या चिठ्ठ्या येत, निरोप येत भेटायला येण्यासंबंधी. पण बाबासाहेब बाहेर गेले म्हणजे घराकडे अन् दरबाराकडे आम्हालाच पाहावं लागतं. म्हणून म्हटलं, आता यावं अन् तेव्हाची कसूर भरून काढावी.

**मस्तानी** : नानासाहेब, अगदी तुमच्या पिताजींसारखे आहात तुम्ही – दिलदार! नानासाहेब, तुम्हाला आमचा हा महाल चालला. मग माझ्या हातचं काही खायला चालेल?

**नाना** : का नाही? तुम्ही काय स्त्री नाही? का तुमचा आमचा काही संबंध नाही?

**मस्तानी** : किती बरं वाटलं तुमचं बोलणं ऐकून. अहो, मी इतकं मनापासून करते, पण हे कधी चवीनं खातील तर शपथ. यांना चव फक्त राजकारणांची. अहो, या राजकारणांपायी आपण काय जेवलो याचंदेखील भान राहत नाही त्यांना. कुणास ठाऊक एकटे मोहिमेवर जातात तेव्हा जेवतात की नाही!

**नाना** : भरपूर जेवतात.

**मस्तानी** : कशावरून?

**नाना** : सुखरूप परत येतात त्यावरून! (हसतो. मग मस्तानीही हसते.)

**मस्तानी** : पण आजचंच पाहा ना. न जेवताच गेले.



www.esahity.com

**नाना** : कुठे?

**मस्तानी** : कुठल्या त्या मंदिरात.

**नाना** : निश्चित काहीतरी खाऊन येतील. अहो, आमचे सगळे देव मोठे भोजनप्रिय. प्रत्येकाचा काही ना काही प्रसाद असतो. अन् दुपारी तर भक्तांच्या आधी भरपूर जेवून चांगली वामकुक्षी करतात. अन् मग भक्तगणही त्यांचंच अनुकरण करतात.

**मस्तानी** : मग तुम्हाला आणू ना काहीतरी?

**नाना** : मला देव समजलात की काय, बाईसाहेब?

**मस्तानी** : आलांत देवासारखेच.

**नाना** : त्या जेवलेल्या देवासारखेच आलो आहोत आम्ही.

**मस्तानी** : पण थोडं घ्याना काहीतरी.

**नाना** : अहो, उद्या रघुनाथाची मुंज ना? तेव्हा कुठे काय शिजतंय, कोण काय बनवतंय, वास लागतच असेल तुम्हाला इकडे?

**मस्तानी** : आता तुम्ही आलात म्हणून जे काय कळेल तेवढंच.

**नाना** : अहो, ते सगळं माझ्या पोटात इतकं ठासून भरलं आहे म्हणून सांगू – अगदी मुलखमैदान तोफ!

**मस्तानी** : केवढी निराशा केलीत तुम्ही माझी!

**नाना** : परिस्थितीच तशी आली त्याला आम्ही काय करणार? बरं बुवा, पुनः येऊ केव्हातरी. खास तेवढ्याचसाठी.

**मस्तानी** : खरं?

**नाना** : अगदी खरं. पुनः तुम्हाला एकाकी वाटलं की बोलावणं पाठवा आम्हाला.

**मस्तानी** : मग आता काय करू मी तुमच्यासाठी?

**नाना** : ते गाणं म्हणा – 'एवढ्या मोठ्या वाड्यात जिवाला एकाकी वाटतं.' (हसतो.)

**मस्तानी** : (हसून) तुम्ही आलात अन् ते गाणं विसरलं.

**नाना** : खरं?

**मस्तानी** : अगदी खरं.

**नाना** : मग बाबासाहेब पुढल्या मोहिमेत एकटेच गेले तरी चालेल.

**मस्तानी** : (एकदम गंभीर होऊन) नाही, नाही नानासाहेब, त्यांच्याबरोबर मीही स्वारीवर जाईन म्हणते ती काय माझ्यासाठी? नानासाहेब, इथे घरी असतानाही धड जेवतखात नाहीत की



www.esahity.com

धड झोपतनिजत नाहीत. स्वारीत तर दिवसांमागून दिवस अन् रात्रीमागून रात्री नुसती दौड चालू असते. अन् मनातलं कुणाला सांगायचे नाहीत. ताप आला तरी बोलायचे नाहीत. यांची आता चाळीशी आली. त्यांची अहोरात्र काळजी घेतली पाहिजे. नानासाहेब, त्यांच्याबरोबर गेलंच पाहिजे मला.

**नाना** : बाईसाहेब, वैद्यराज असतात त्यांच्याबरोबर.

**मस्तानी** : नुसत्या औषधानं का बरं वाटतं माणसाला?

**नाना** : अहो आम्ही काही अडवीत नाही तुम्हाला. सहज म्हटलं पण तुम्ही आपलं गाणं सुरू केलंत. (हसतो.)

**मस्तानी** : (हळूच डोळे पुसते.) खरंच की...

**नाना** : अहो ते गाणं म्हणायचं परमेश्वरापाशी.

**मस्तानी** : मग कोणतं म्हणू?

**नाना** : उद्या मुंजीनिमित्त रात्री तुम्ही नृत्यगायन करणार आहात.

**मस्तानी** : तेवढ्यापुरती तरी मी चालते लोकांना.

**नाना** : त्यामुळेच तुम्ही आवडता लोकांना.

**मस्तानी** : खरं?

**नाना** : अहो, तुमच्या गळ्यातलं दर्दभरं गाणं म्हणजे आमच्या गळ्यातलं भरदार लेणं आहे! लोकांनी पाहण्याआधी ते पाहायला मिळेल का आम्हाला?

**मस्तानी** : तुमचं भूषण तुम्हालाच दाखवायचं नाही?

(घरात जाते. नाना बाहेरच्या दाराशी येऊन खूण करून कुणाला तरी बोलावतो. भिकंभट पाऊल न वाजविता आत येतो आणि मस्तानी किंवा कुणी येणार तर नाही म्हणून साशंकतेने पाहत राहतो.)

**नाना** : (दबलेल्या आवाजात) आपला डाव शंभर टक्के यशस्वी होणार, भिकंभट! तुम्ही मात्र पाव टक्कादेखील घोटाळा करू नका. पण ही छोटी पगडी रघुनाथरावाची दिसते. मग इथे कशी? नेऊन ठेवा वाड्यात.

**भिकंभट** : त्या यावनीपुत्राची मुंज करायची म्हणतात ना रावसाहेब? त्याच्यासाठी आणलीय ती. आता त्याला ते समशेर म्हणत नाहीत, परशुराम म्हणतात.

**नाना** : यवनाची सुंता की मुंज? अन् समशेर की परशुराम? एक म्लेंच्छ नि इतका उच्च? हुं! आम्ही थोरले चिरंजीव अन्



www.esahity.com

आमच्यावर राग अन् या मुसलमान रखेलीच्या अनौरस पोराचं हे कौतुक? (पगडी फेकतो ती पुढे डाव्या व्यासपीठावर पडते.) भिकंभट, आता इथं बाईचा नाच सुरू झाला, म्हणजे? चोरून ताल धरू नका बाहेरून! आधी कुठे जाल? आधी ओंकारेश्वरावर नका जाऊ नाहीतर आमचीही रवानगी कराल तिकडेच. आधी वाड्यात काकासाहेबांना खबर द्या. म्हणावं की नाच सुरू झालाय, तयार राहा. बाबासाहेब इकडे आले की दोनचार कारभारी, अधिकारी घेऊन इथं बाहेर या. बाई आमच्यासाठी नाचगाणं करीत आहे असं पाहिलं की बाबासाहेब खवळतील. घाबरू नका. आम्हाला इथं पाहिल्यावर त्यांना वाटेल आम्हीच बाईंना फूस लावतो. तेव्हा अप्पासाहेब आणि इतर मंडळी बाबासाहेबांची खातरजमा करून देतील की बाईच आमच्या मागे लागतात, बाईंनीच बोलावलं आम्हाला निरोप पाठवून, तुम्हीच निरोप आणलात; समजलं? ओंकारेश्वरावरही लवकरच जा. अहो, बाबासाहेबांचं बोलणं ते. एखादेवेळी सगळे ब्राह्मण भारावून जायचे फौजेतल्या शिपायांसारखे. असं काही होण्यापूर्वीच बाबासाहेबांना सांगा – काय सांगाल? आम्ही इथे आलो आहोत म्हणून? नाही, नाही. सांगा, बाईचा नाच अगदी रंगात आलाय अन् कुणीतरी पुरुषमाणूस आत बसलंय. मोठ्यानं नका बोलू. हळूच बोला. पण भाव मोठा आणा. चला, पळा. एकदाची हिच्या नावानं आंघोळ करून टाकली पाहिजे. आली! आली! पळा! पळा!

(भिकंभट जातो. मस्तानी येते.)

**मस्तानी** : (पूजेचे नृत्य करीत)

ईश्वरा, आले तव मंदिरा
तुझ्या पदांविण अन्य न चिंतन
तुझेच दर्शन तुझेच पूजन
दयाळा, देइ पदी आसरा
तूच जगाचा प्रभू म्हणविसी
सेवेची पण इथे मिराशी
लोटिशी दूर कसे लेकरा



www.esahity.com

जगी हो न हो सुफलित जीवन
तुझ्याच पायी सर्व समर्पण
मनाला लोभ नसे दुसरा

(नाच चालू असताना नाना झोपाळ्यावर झोके घेत असतो आणि शंकेने सारखे दाराकडे पाहत असतो. इतक्यात पहारेकरी येतो. नाना दचकून झोपाळा एकदम थांबवतो. पहारेकरी अपराधी भावनेने उभा राहतो. नाना उपरण्याने कपाळावरचा घाम टिपतो, ओठ पुसतो. पहारेकरी मुजरा करून 'बाईसाहेब' अशी हाक मारतो. मस्तानी उभी राहते. थोडेच क्षण गूढ शांतता.)

**पहारेकरी** : बाईसाहेब, कोणीतरी भेटायला आलंय आपल्याला.

**मस्तानी** : येऊ दे त्यांना आत.

(पहारेकरी मुजरा करून जातो.)

**नाना** : (मनातला संशय लपवून) बाईसाहेब, समशेर कुठं आहे? आतच ना? राज्यकारभारापायी वेळच होत नाही पाहा त्याच्याशी बोलायला. पण आजचा दिवस खास तुम्हा दोघांसाठी राखून ठेवलाय आम्ही. जाऊ आत?

**मस्तानी** : नानासाहेब, सगळा वाडा तुमचाच आहे. मालकानं का दासीची परवानगी मागायची?

**नाना** : अहो, तुमचं नाव आहे या महालाला.

**मस्तानी** : नावालाच आहे मी.

**नाना** : छे, आज सगळीकडे तुमचंच नाव गाजतंय!

(मस्तानी बाहेरच्या दाराकडे येते. दिलावर येतो. नाना संशयाने चोरून बघतो आणि आड होतो.)

**दिलावर** : माफ करा हं बाईसाहेब, तंद्री मोडल्याबद्दल. आहे का परवानगी आम्हाला? नाही, आपण वाड्याच्या मालकीणबाई आहात, म्हणून विचारलं पाहिजे.

**मस्तानी** : दिलावर, इतक्या दिवसांनी भेटलास अन् असं का बोलतोस?

**दिलावर** : मग कसं बोलू? मला न विचारता, माझं न ऐकता खुशाल दुसऱ्याचा हात धरून निघून आलीस! अन् या राजवाड्याची मालकीण झालीस!

**मस्तानी** : दगडांच्या वाड्याची मालकीण व्हायला नाही आले मी.

**दिलावर** : खरं आहे. दगडांनी सुरू केलेलं काम सोडून विटांनीच वर बांधलं आहे. का कोण जाणे!



www.esahity.com

**मस्तानी** : दगडविटांशिवाय बोलायला तुला दुसरा विषयच नाही का रे, दिलावर?

**दिलावर** : दगडविटा कशा? अग, हे तुझं सत्तेचं घर. हा तुझा राजवाडा. हा तुझा रंगमहाल! मस्तानी, हा वाडा दाखवशील का एकदा तरी मला? वाड्यातल्या सगळ्या जागा तुला तुझ्या 'त्यांनी' दाखविल्या असतीलच!

**मस्तानी** : त्यांच्याच परवानगीशिवाय मला नाही दाखवता यायचं नाही.

**दिलावर** : अग, त्यांना तरी परवानगी आहे का?

**मस्तानी** : दिलावर, कुठून कुठून काय काय गोष्टी काढतोस?

**दिलावर** : याहून खूप खूप गोष्टी घडताहेत. दोनचार सुनवायच्या तरी चांगलाच दम घ्यायला पाहिजे. (डाव्या बैठकीकडे जात) बसू का इथं? अरेच्या, ही छोटी पगडी कुणाची? हां! उद्या वाड्यात मुंज आहे ना! पण मग ही तुझ्या महालात कशी? तू भेट देणार आहेस की काय तुझ्या लेकाला – म्हणजे सावत्र हं!

**मस्तानी** : माझा मुलगा काय त्यांचा नाही? त्यांनीच आणली आहे ती माझ्या मुलासाठी. मुंजही करायची म्हणतात त्याची.

**दिलावर** : मुंज? मस्तानी, तुझ्या मुलाची मुंज? समशेरची मुंज? (मोठ्याने हसतो.) अग, समशेरची मुंज लावायला काझीच पाहिजे अन् ती मशिदीतच लागायला पाहिजे. हे बघ, त्या न होणाऱ्या समारंभाची भेट म्हणून ही काळ्या गोंड्याची लालटोपी तुझ्या बेट्याला मी देतो. (रुमालात झाकून आणलेली टोपी बाहेर काढतो.)

**मस्तानी** : नको, नको दिलावर, त्यांना नाही हे आवडायचं.

**दिलावर** : अग डोक्यावर टोपी तर पाहिजे! अन् हीच टोपी तुझ्या मुलाचं सर सलामत राखील. बघ कशी छान दिसतेय ती. अग खास तुझ्याच छोकऱ्यासाठी बनवून आणली आहे मी. घे, घे. ऐक माझं. उगीच मृगजळामागे धावू नकोस, अन् तोंडघशी पडू नकोस. मस्तानी, हेच सांगायला आलोय मी तुला. सांग, बसू काय इथं? (उजव्या बैठकीकडे जात) नाही, म्हणजे माझा स्पर्श चालेल का या जागेला? मोठमोठे पवित्र लोक बसत असतील इथं! तुझा चालतो ना? बोल.



www.esahity.com

(लालटोपी उजव्या बैठकीवर ठेवतो. डाव्या बैठकीवर पगडी अन् उजव्या बैठकीवर लालटोपी समोरासमोर दिसत राहतात.) तू हा हिंदू सुवासिनीचा पोषाख पहेनला आहेस! मग तर... अरे वा, ही कांकणं, हे कुंकू, अन् मंगळसूत्र ग?

**मस्तानी** : दिलावर, तुझा प्रवास कसा झाला? महाराजांच्या मागे दरबारात तुझी वास्तपुस्त कशी होते? सारंगीवर कोणती नवीन धून बसवली आहेस? तुला येऊन इतका वेळ झाला पण तुझ्या खाण्यापिण्याची काहीच चौकशी केली नाही मी. बैस रे. काहीतरी घेऊन येते.

**दिलावर** : नको. नको. छावणीतलं जेवण घरात करण्याची कोणत्या हिंदूची छाती आहे?

**मस्तानी** : सगळ्यांना आवडेल ते नको करायला?

**दिलावर** : आपलं मन मारून? अग हे हिंदू लोक थडगी बांधीत नाहीत. तू आपलं मन मारलंस तरी हे लोक त्याला जपणार नाहीत, जाळून टाकतील. अग सांग, तू ह्या लोकांसाठी आहार बदललास, पेहराव पालटलास, पण तुला ह्यांनी आपलंसं म्हटलंय? अजून तुझी हौस फिटली नाही?

**मस्तानी** : तुझी बोलण्याची हौस मात्र तू पुरती फेडून घे.

**दिलावर** : अग, बोलायला नाही आलो मी. तुझे डोळे उघडायला आलोय. प्रीतीनं आंधळी झाली आहेस तू. अन् त्यामुळेच जीवनातला राजरस्ता चुकून या काट्याकुट्यांच्या आडवाटेवर येऊन पडली आहेस. कशाला रक्तबंबाळ होतेस, मस्तानी? अग, तुझ्या नाजूक पावलांनी तबल्याच्या तालावर नुसतं नाचत जावं अन् त्या पावलांखाली संगमरवरी फरशीदेखील रुतू नये म्हणून सारंगीच्या सुरांच्या मखमली पायघड्या मी घालीत जावं! मस्तानी, तू गेलीस अन् माझ्या सारंगीची रंगतच गेली. इथं तुझ्या कलेचं काय मोल आहे, मस्तानी? सोडून दे हे वेड अन् चल माझ्याबरोबर.

**मस्तानी** : बकवास बंद कर, दिलावर. बाहेरच्या चार गोष्टी ठाऊक असतील तुला कदाचित. पण त्यांच्यामाझ्या अंतःकरणांतली गोष्ट तुला कधीच कळायची नाही. अरे, ज्या एकाच गोष्टीवाचून जीवन व्यर्थ होतं तीच गोष्ट मला इतकी मिळाली



www.esahity.com

आहे की माझ्या मिठीत मावत नाही, दिठीत सामावत नाही. पूर्वी मी नाचूनही नाचले नव्हते, अन् आता न नाचताही नाचाच्या पलीकडे गेले आहे. अरे, पूर्वी नाचताना कितीक वेळा पायांना रक्त आलं तरी कळायचं नाही. पण आता ते जवळ असले म्हणजे हृदयात जो नाच सुरू होतो त्यात जीव गेला तरी कळायचं नाही.

**दिलावर** : पण मला कळतंय ना! मस्तानी, फांद्यांवर घाव घालून फायदा होत नाही म्हणून मूळच तोडायला पाहिजे, हे तुझ्या साहेबांचं धोरण त्यांच्यावरच उलटवत आहेत इथले लोक! त्यांना लागलेल्या तुझ्या वेडावर इतर सर्व उपाय खुंटले म्हणून मस्तानी...

**मस्तानी** : आई ग!

**दिलावर** : घाबरलीस?

**मस्तानी** : मी नाहीशी झाले तर त्यांचं कसं होईल?

**दिलावर** : तुला त्यांची काळजी वाटते ना?

**मस्तानी** : म्हणजे काय?

**दिलावर** : एक उपाय आहे, करशील?

**मस्तानी** : 'करशील' काय?

**दिलावर** : जन्मापासूनचा इस्लाम धर्म तुझ्यामागे आहे पण तू त्याच्याकडे पाठ फिरवते आहेस, अन् हिंदू धर्म तुझी सावलीदेखील जवळ पडू देत नाही, पण लोचटपणानं तू त्याच्या पुढंपुढं करीत आहेस! बोल, कोणत्या धर्मानं जगणार तू?

**मस्तानी** : रावसाहेब सांगतील त्या.

**दिलावर** : रावसाहेब काय सांगणार? अग तुझे साहेब हुकूम देतील फौजेतील शिपायांना, पण तुझ्या साहेबांनाच शास्त्र्यांचा हुकूम मानावा लागेल फौजेतल्या शिपुर्ड्यांप्रमाणं.

**मस्तानी** : पण मी त्यांचा हुकूम मानेन ना. त्यांना माझी लाज आहे, मग का होऊ नये मी हिंदू?

**दिलावर** : हिंदू होण्याचं हे कसलं वेड घेतलं आहेस, मस्तानी? एक दिवस सती जावं लागेल!

**मस्तानी** : (मुसमुसत) दिलावर, दिलावर, कसं बोलवतं तुला हे?

**दिलावर** : असल्या लोकांच्या धर्मात तुला जावंसं वाटतं? आणि ते



www.esahity.com

तुला आनंदानं हिंदू करतील असं तुला दिसतं? हं! चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यांतून फिरून आल्यावर हिंदूच्या घरात जन्म झाला तरच शक्य आहे ते. हिंदू धर्माला तुझ्यासारखी गुणी, लावण्यखनी माणसंदेखील नको आहेत! मस्तानी, मस्तानी, जगाची नाडी आज रावसाहेबांच्या हातांत आहे, पण त्यांचीच नाडी तुझ्या हातांत आहे. मस्तानी, तू रावसाहेबांनाच मुसलमान कर! नाही म्हणून नकोस. मस्तानी, तुला अल्लाची कसम आहे. मस्तानी, तू एवढी एकच चीज कर. अल्लाची तुझ्यावर खैर होईल. अग, मुसलमान बादशहा हा अस्सल बादशहा असतो. असा भिक्षुकांपुढे भिक्षा मागणारा नव्हे. मुसलमान होण्यातच तुमचा मोक्ष आहे, मस्तानी! रावसाहेब मुसलमान होतील तर तुमच्या प्रीतीची कथा रूपमतीबाजबहाद्दरसारखी, मुमताजमहलशाहजहानसाररखी आम्ही गाऊ. हिंदूंनी कधी कुणा माणसांच्या प्रेमाची गाणी गायिली आहेत? अग, इष्क आणि मुहब्बत यांची चव या हिंदू मुमुक्षूंना सांगून काय उपयोग? जगावं तर मुसलमान म्हणून जगावं न् अलम दुनियेची मजा लुटावी!

**मस्तानी** : स्वधर्माला ते सोडणार नाहीत. छत्रपतींची आज्ञा ते मोडणार नाहीत. अन् माझं नातंपण ते तोडणार नाहीत.

**दिलावर** : मस्तानी, तुझ्यावर केलेल्या प्रेमाचं पापक्षालन तुझा हा प्रियकर तिकडे प्रायश्चित्त घेऊन करीत आहे.

**मस्तानी** : झूट बोलू नकोस, दिलावर.

**दिलावर** : मस्तानी, प्रायश्चित्त घेतल्याशिवाय मुलाची मुंज करणार नाही असा पक्का निकाल दिला ब्राह्मणांनी, म्हणून तुझा हा लाडका प्रियकर तिकडे गाईचं मूत पीत आहे, शेण खात आहे...

**मस्तानी** : जबान बंद कर, दिलावर.

**दिलावर** : जरूर रागव. पण त्यांच्यावर – ज्यांनी रावसाहेबांना एकच सवाल टाकला, 'तुम्हाला आपला हट्टच चालवायचा आहे की मुलाची मुंज करायची आहे?'

**मस्तानी** : मग काय म्हणाले हे?

**दिलावर** : 'मुलाची मुंज तर व्हायलाच पाहिजे.'

**मस्तानी** : मुलाची मुंज?



www.esahity.com

**दिलावर** : वेडे, तुझ्या मुलाची नव्हे. त्यांच्या, त्यांच्या बायकोच्या, काशीबाईच्या. तू काही त्यांची बायको नव्हेस, धर्मपत्नी नव्हेस!... मस्तानी, तुझी खरी लायकी एखाद्या सार्वभौम बादशहाला अर्ध्या वचनात वागवून त्याच्या अर्ध्या सिंहासनावर बसून राज्य करायची अन् ताजमहालाहूनही अधिक दिमाखदार इमारत स्वतःच्या नावानं उठवून घ्यायची, ती तू या नसत्या नादाला लागून कुठल्यातरी कोपऱ्यातल्या काळोखात कुजत काळ काढीत आहेस! मस्तानी, निदान पुढचं पाऊल पुढेच टाकून या वाड्याच्या बाहेर पड अन् रावसाहेबांबरोबर स्वतंत्र संसार थाटून तुला पाण्यात पाहणाऱ्या सगळ्यांना खाली पाहायला लाव.

**मस्तानी** : दिलावर, तुला माझी एवढी किंमत वाटत असती तर माझ्या घरात येऊन मला असले बोल लावण्याऐवजी माझ्यासाठी सारंगीचे बोल काढीत आला असतास.

**दिलावर** : जीव जायची वेळ आली तरी तुला सारंगी सुचते? मस्तानी, इथं तू आहेस फक्त एक वेश्या, रखेली, ठेवलेली!

**मस्तानी** : दिलावर!

(त्याचक्षणी बाजीराव प्रवेश करतो.)

**बाजीराव** : आमच्याच घरात आमचीच बदनामी? या गुन्ह्याची सजा ठाऊक आहे?

**दिलावर** : गुन्ह्याची सजा जरूर द्यावी सरकार, पण गुन्हेगार आहेत तुमचेच घरवाले अन् तुमचेच जातभाई...

**बाजीराव** : बस्स! एक शब्द बोलू नका पुढे! अन् जा निघून येथून ताबडतोब. जन्मात पुनः तोंड दाखवू नका. (दिलावर गेल्यावर) मस्तानी, तू आमची पत्नी आहेस. तू आमची राणी आहेस. तू आमची स्वामिनी आहेस, पण मस्तानी, मस्तानी... आम्ही तुझे गुन्हेगार आहोत, मस्तानी. मस्तानी, तू आमच्यासाठी तुझा देश सोडलास, तुझा वेश बदललास, पण आमचे लोक तुझ्यासाठी रेसभरदेखील सवलत द्यायला तयार नाहीत. मस्तानी, काशीबाई आमची धर्मपत्नी आहे अन् तिचं राज्य या वाड्यावरती आहे. पण मस्तानी, तू आमच्या जिवाची मालकीण आहेस अन् तुझं साम्राज्य



www.esahity.com

सगळ्या बाजीरावावर आहे. जिथं आम्ही तिथं तू. पण मस्तानी, तू आमचं हृदय पूर्णपणे व्यापलंस तरी आम्हीच बांधलेल्या या शनवारवाड्यात तुझ्या वाट्याला फक्त एक कोपरा आला! आणि मस्तानी, रणांगणांत कधी आम्ही माघार घेतली नाही ती आज घरात घेतली अन् तुझ्यावर अन्याय केला! मस्तानी, आम्ही प्रायश्चित्त घेतल्याशिवाय शत्रुपराजयार्थ करायचं अनुष्ठानदेखील ब्राह्मणांनी करायचं नाकारलं तेव्हा आम्हाला ते घेणं भागच पडलं. मस्तानी, मोंगलांसारख्या बलाढ्य शत्रूलादेखील आपलं म्हणणं सुनावणं सोपं आहे, पण या शिष्ट शास्त्र्यांची अन् प्रकांड पंडितांची समजूत काढणं प्रत्यक्ष बृहस्पतीलादेखील साधेलसं वाटत नाही. मस्तानी, आम्हाला पर्वा नाही या जगाची त्यानं तुला नर्मदा नाही म्हटलं म्हणून. मस्तानी, जग तुला मस्तानीच म्हणेल अन् ते रास्तच आहे. मस्तानी, तू मस्तानीच आहेस. मस्तानी, तू मुसलमान म्हणून आम्ही तुला जवळ घ्यायचं ठेवलं नाही अन् तू हिंदू नाहीस म्हणून आम्ही तुला अव्हेरणार नाही. मस्तानी, तू हिंदू नाहीस पण तू मुसलमानही नाहीस. तू फक्त मस्तानी आहेस मस्तानी! पण... पण मस्तानी... मस्तानी, काशीबाईच्या मुलाची मुंज होणार पण तुझ्या मुलाची नाही. रघुनाथाची भिक्षावळ वाजतगाजत मिरवणार अन् समशेर फक्त आशाळभूतपणानं ती दुरून न्याहाळणार! मस्तानी, आपला... आपला समशेर... आपला समशेर... केवढ्या आशेनं ही सुंदर पगडी आम्ही आणवली होती त्याच्यासाठी! त्याच्याच डोक्यावरून आम्ही आता ही हिसकावून घ्यायची? त्याला आवडलेली ही सोनेरी पगडी आम्ही त्याला द्यायची नाही? मस्तानी, किती सुंदर, किती तेजःपुंज दिसत होता तो या पगडीमध्ये! आम्ही ते रुपडं पुनः पाहायचं नाही? (आवेगाने तोंड फिरवून बाजूला होतो तोच काळ्या गोंड्याची लाल टोपी त्याला दिसते.) ही गोंड्याची टोपी कुणी आणली इथे? आमच्या घरात ही टोपी? समशेरकडे आलेला कुणी मुसलमान मुलगा विसरून गेला की काय? (मस्तानी काहीच बोलत नाही हे पाहून) समशेरसाठी तर कुणी आणलेली



www.esahity.com

नाही ही? समशेरला ही टोपी घालायची? समशेरचा मुखचंद्र या काळ्या गोंड्याच्या लाल टोपीखाली बघायचा? (दोन्ही टोप्या टाकून देऊन आतल्या दाराकडे जात) समशेर... समशेर... समशेर राजा... (दाराशी थबकून) कोण? नाना? तुमचं इथे काय काम होतं, नानासाहेब?

**नाना** : (प्रवेश करीत) बाबासाहेब, तुमच्या पश्चात सगळा कारभार आम्हालाच पाहावा लागतो.

**बाजीराव** : इथलासुद्धा?

**नाना** : बाबासाहेब, निरोप मिळालाच असेल तुम्हाला.

**बाजीराव** : हो.

**नाना** : बाईंचा नाच चाललाय म्हणून?

**बाजीराव** : हो.

**नाना** : अन् कुणीतरी पुरुषमाणूस आत बसलंय म्हणून?

**बाजीराव** : हो.

**नाना** : अन् आत्ताच एक मुसलमान इथं पाहिलात आपण? त्यानं वापरलेली भाषाही ऐकलीत? मुलानं पित्याला आणखी काय सांगावं?

**बाजीराव** : नानासाहेब, ही त्या माणसासाठी नाचली असेल तर नाच चांगलाच रंगला असेल!

**नाना** : होय बाबासाहेब.

**बाजीराव** : तो तिचा दोस्त बालपणीचा बुंदेलखंडातला.

**नाना** : तरीच!

**बाजीराव** : नानासाहेब, तो तिचा सारंगीवाला छत्रसाल महाराजांच्या दरबारातला. त्याच्याच साथीनं ती पूर्वी नाचत होती. पण नानासाहेब, आज ती त्याच्यासाठी नाचत नव्हती.

**नाना** : (धक्का बसून) बाबासाहेब! प्रत्यक्ष...

**बाजीराव** : प्रत्यक्ष पोरानं बापाविरुद्ध कट करावा?

**नाना** : बाबासाहेब, कट त्यांचा चालला होता, तुम्हाला घराबाहेर काढण्याचा, तुम्हाला मुसलमान बनविण्याचा...

**बाजीराव** : अन् तुमचं काय चाललं होतं? कट तुम्ही करता आणि खोटं बोलता? कुणासाठी ही हेरगिरी? नानासाहेब, राजकारणाची धुळाक्षरं तुम्ही आत्ता गिरवीत आहात म्हणून आम्हाला ती



www.esahity.com

शिकवू जाता?

**नाना** : पण बाईंनी बोलावलं म्हणूनच आलो आम्ही इथं. विचारा हवं तर कुणालाही आणि ही पत्रं, या चिठ्ठ्या...

**बाजीराव** : एवढी जय्यत तयारी करून यायचं कारण? नानासाहेब, ही बाई कोण आहे? गप्प का? घ्या तोंडसुख! जपा संध्येसारखी नामावली – यावनी, कंचनी, पापिणी, वेश्या, रखेली, ठेवलेली...

**नाना** : (ओरडून) बाबासाहेब!

**बाजीराव** : (दुःखाने थकून) नानासाहेब, ही तुमची द्वितीय मातोश्री आहे! या मातोश्रींची ही नको ती काळजी करण्याऐवजी आपल्या जन्मदात्या मातोश्रींच्या तब्येतीची पाहिजे ती काळजी आधी करा. जा. (नाना जाऊ लागतो तोच–) नानासाहेब, बातमीचे राऊत नुकतेच आलेत. त्यांची गाठ घेतलीत?

**नाना** : नाही.

**बाजीराव** : तुम्हाला सवडच सापडली नसेल! मग नादीरशाहाला कोणते शह द्यायचे याची काही शहानिशा केलीत?

**नाना** : (मानेनेच 'नाही' म्हणतो.)

**बाजीराव** : मग, कोणती निशा करून इथे आलात?

**मस्तानी** : असं बोलू नये. आमचे पुत्र आहेत हे. आपणच म्हटलंत ना, आम्ही त्यांच्या मातोश्री आहोत म्हणून? आई मुलाला पोटात घालते. पित्यानं त्याचा अपराध पोटात घालावा.

**बाजीराव** : मस्तानी, तू मुसलमान तरी तुझा पुत्र समशेर हिंदूहून हिंदू आहे. पण आमचे हे सुपुत्र हिंदू आईच्या पोटी जन्माला येऊनही मुसलमान घराण्यातल्यासारखे निपजलेत बापाविरुद्ध कारस्थानं करणारे!

**मस्तानी** : हे काळंबेरं त्यांच्या मनात मोठ्या माणसांनीच भरवलं असलं पाहिजे.

**बाजीराव** : आमच्याविरुद्ध कारस्थानं करायची होती तर अक्कल तरी स्वतःची वापरायची होती? जा. तिला विश्रांती द्या.

(नाना जातो. बाजीराव थकून मोकळी हवा घेण्यासाठी समोरील खिडकीपाशी जाऊन उभा राहतो. तोच वाऱ्याच्या झोताबरोबर ब्राह्मणांच्या मंत्रघोषांचे चढते आवाज कानांवर येऊन आदळतात.)



www.esahity.com

**बाजीराव** : ऐक, ऐक मस्तानी, ही पवित्र ब्राह्मणांची पुरातन वेदवाणी! या लोकांचं ब्राह्मण्य आम्ही रक्षण केलं म्हणून आमच्यावर हे ग्रामण्य! हिंदवी साम्राज्याचं भविष्य आम्ही निश्चित केलं म्हणून आम्हाला हे प्रायश्चित्त! उद्या या वाड्यात मुंज व्हायची आहे ना? म्हणून या वाड्याची शुद्धी चालली आहे, शांती चालली आहे! आम्ही हा वाडा बांधला नाही, आम्ही फक्त तो विटाळला! आम्ही दिल्ली दरवाजा उभा केला नाही, फक्त पापाला वाट करून दिली! आम्ही धर्माची स्थापना इथं केली नाही, फक्त विषयांची वासना धरली! मस्तानी, घरी, दारी, दरबारी फक्त अन्याय, अन्याय आणि अन्याय! हे मस्तक कसं व्यस्त होऊन गेलं आहे, मस्तानी. आता नाही हे सहन होतं. मस्तानी, आम्ही परक्यांविरुद्ध लढतो ते ते अन्यायी आहेत म्हणून. पण इथे आमचेच लोक आमच्यावर अन्याय करताहेत. ते जगायलाच पाहिजेत, वाढायलाच पाहिजेत. आम्हीच नाहीसं व्हायला पाहिजे, मस्तानी. मस्तानी, हे मस्तक आता फुटून जाईल असं वाटतंय. (खांबावर डोके आपटू लागतो.)

**मस्तानी** : नका असं बोलू. नका असं करू. बसा. मी पाणी घेऊन येते.

**बाजीराव** : पाणी नको, मस्तानी. तू इथून क्षणभरदेखील जाऊ नकोस. मस्तानी, तुला अगदी प्रथम पाहिलं तेव्हाच तुला हिंदू करावं म्हणून मन व्याकूळ झालं! पण आजपर्यंत आम्ही मुद्दामच थांबलो. मस्तानी, आधी आम्ही दिल्ली जिंकून दाखवली आणि मगच लोकांची मनं जिंकायची आशा बाळगली. थोरल्या छत्रपतींनी धडाडीनं धर्मांतरं केली. त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकावं एवढीच आमची साधी इच्छा. पण ज्यांच्या सुखाशिवाय दुसऱ्या कोणत्याही विचाराला आम्ही आमच्या मनात थारा दिला नाही त्या आमच्याच लोकांनी आम्हाला न्याय दिला नाही. आम्हाला न्याय द्यायला थोरले छत्रपतीच हवे होते! महाराज, आम्ही कमनशिबी म्हणून आपल्या काळात जन्मलो नाही, पण आपण आपला अवतार लवकर का संपविलात? (क्षणभर थांबून) मस्तानी,



www.esahity.com

थोरल्या छत्रपतींच्या पायाशी बसायची आमची लायकी नाही. पण त्यांचेच सेवक आहोत आम्ही. आम्हीही काहीतरी असं अद्‌भुत करून दाखवू की सगळी भुतं नाचायची थांबतील! चल मस्तानी, आता इथं पाणीदेखील नको. आमच्या अंगातलं पाणी आमच्या तरवारीला देऊन आता आम्ही ती अशी तळपवू की तिच्या तेजानं सगळ्यांनी डोळे मिटलेच पाहिजेत. तेव्हाच या पुण्यात परत येऊ. चल मस्तानी. लवकर तयारी कर. आता इथून दूरदूर निघून जाऊ. (मस्तानी गेल्यावर) रामाजीऽ

(पहारेकरी येतो आणि मुजरा करून उभा राहतो. तोच–)

**बाजीराव** : कोणी आलंय आमच्याकडे?

**रामाजी** : जी सरकार. सरदार शिंदेसाहेब अन् सरदार होळकरसाहेब आलेत.

**बाजीराव** : आम्ही त्यांना तातडीनं बोलावलंच होतं. मग रामाजी, इतका वेळ वर्दी का नाही दिलीस?

**रामाजी** : सरकार... सरकार

**बाजीराव** : आम्ही बाईंच्याबरोबर बोलत होतो म्हणून त्यांना बाहेर तिष्ठत ठेवलंस?

**रामाजी** : जी.

**बाजीराव** : रामाजी, आमचा हुकूम नव्हता कामाच्या माणसांना केव्हाही आत धाडण्याचा?

(शिंदे आणि होळकर प्रवेश करून मुजरे करतात.)

**शिंदे** : सरकार, कसूर आमची आहे.

**होळकर** : आम्हाला वाटलं सरकार, उद्या वाड्यात मंगल कार्य आहे त्याबाबत बोलणी चालली असतील. मग..

(रामाजी जातो.)

**बाजीराव** : राणोजी, मल्हारराव, आपलं मंगल कार्य एकच आहे – हिंदुपदपातशाहीचा विस्तार करणं! बोला मल्हारराव, तुम्हाला आम्ही कशाकरता बोलावलं असेल?

**होळकर** : सरकार, सार्वभौम पृथ्वीपती म्हणून शेकडो वर्षं गाजलेल्या मोंगल बादशाहीची शान आपण हिरावून आणलीत. आता दिल्ली आणि आग्रा, सातारा आणि पुण्यात येणार!



www.esahity.com

**बाजीराव** : राणोजी, तुमचा कयास?

**शिंदे** : नव्या स्वारीचा बेत आखलेला दिसतोय सरकारांनी.

**बाजीराव** : शाब्बास शिंदे! मल्हारराव, दिल्ली आणि आग्रा सातारा आणि पुण्यात आल्यावर दिल्लीआग्य्रावरील आघातही अंगावर घ्यायला आपण तयार असलंच पाहिजे. म्हणूनच आम्ही दिल्लीवर जाऊन नादीरशाहाशी मुकाबला करायचं ठरवलंय!

**शिंदे आणि होळकर** : (एकदम) नादीरशाहा?

**होळकर** : सरकार, नादीरशाहाजवळ ऐंशी हजार घोडेस्वार, चार लाख पायदळ आणि प्रचंड तोफखाना आहे. सरकार, नादीरशाहानं बादशहाचे एकूणएक सरदार मारले तरी नाहीतर पकडले तरी. अवघ्या दिल्लीची कत्तल झाली. कितीकांनी विषं खाल्ली आणि चुकून उरलेली माणसं अन्नपाण्याविना रोगराईनं मेली. सरकार, सहा कोटींचं रत्नजडित मयूर सिंहासन, कोहिनूर हिरा, पंधरा कोट रुपये रोख आणि पन्नास कोटींचा ऐवज, खेरीज कित्येक कारागीर घेऊन तो माघारा फिरलाय! ताजमहाल तेवढा ठेवलाय त्यानं चोरून नेता येत नाही म्हणून! सरकार, त्या नादीरशाहाला चूड दाखवून झुंज घ्यायचं?

**शिंदे** : अन् सरकार, बर्वे, हिंगणे, दीक्षित अशा आपल्या सगळ्या वकिलांनी पुढे न येण्याचीच सल्ला दिली आहे ना?

**बाजीराव** : (हसून) मल्हारराव, नादीरशाहानं सगळी लूट एकत्र केलीच आहे. तिचा ताबा आपण घेतला म्हणजे झालं! आपली सगळी कर्जं आपण एकरकमी फेडू शकू की नाही? राणोजी, शिल्लक किती राहील याचा हिशोब करा! आणि मल्हारराव, दिल्ली आणि आग्रा सातारा आणि पुण्यात आलं. पण नुसते पेटारेच आले की. खजिना पळवणाऱ्या चोराला अद्दल घडवून मुद्देमाल मिळवायला नको? (गंभीर होऊन) राणोजी, नादीरशाहा काही देव नाही की पृथ्वीस कापून काढील. तोही शहाणा आहे. जबरदस्ताशी सलूख करील. आम्हाला आमची जरब दाखवलीच पाहिजे. मल्हारराव, नादीरशाहा दिल्लीवर का आला? आम्ही दिल्लीवर आमचा अंमल गाजवून



www.esahity.com

दाखवला म्हणून! दिल्लीचा मान आम्ही मिळवला पण शान मात्र त्यानंच मिळवली. तीही आम्ही आणलीच पाहिजे.

**होळकर** : सरकार, पण आपली तयारी? छत्रपती स्वामी तोफांचा कारखाना काढायचा म्हणतात. पण आपले लोक तर लोखंडाची मोडदेखील गोळा करू शकत नाहीत.

**बाजीराव** : मल्हारराव, तुमच्या तोफा तयार होईपर्यंत नादीरशाहा वाट पाहणार आहे? नादीरशाहाचा हल्ला महंमदशाहावर नव्हता. आमच्यावर होता. 'पाहा, आम्ही हिंदुस्थानची लूट राजरोस घेऊन जातो,' असंच तो आमच्या कानात ओरडत होता. गझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्यांपासून आमच्यावर सारख्या स्वाऱ्याच चालू आहेत. राणोजी, मल्हारराव, आजपर्यंत आमची किती संपत्ती गेली आणि किती माणसं मेली? आज आम्ही जिवंत असताना तीच गोष्ट पुन्हा व्हावी?

**शिंदे** : सरकार, आपण हुकूम करावा, आम्ही कूच करावं. पण आमच्या बालबुद्धीला वाटतं, हा सामना वेगळाच आहे!

**बाजीराव** : राणोजी, आजपर्यंत आपणजे सामने खेळळी ते आपण पाहिलेले होते काय? आयुष्यभर ज्या काळाची वाट पाहत होतो तो प्राप्त झाला आहे. त्या काळाच्या तोंडात जाऊन त्याचा बंदोबस्त करून परत येऊ. मल्हारराव, आत्ताच जासूदानं येऊन आम्हाला सांगितलं की नादीरशाहाला निमंत्रण दिलं निजामानंच!

**होळकर** : म्हणजे सरकार, उत्तरेकडून नादीरशाहा...

**शिंदे** : आणि दक्षिणेकडून निजाम!

**बाजीराव** : निजामाला नामोहरम केल्यावर तो नादीरशाहाचे पाय धरणार नाही तर काय नमाज पढत बसणार?

**शिंदे** : आता?

**बाजीराव** : आम्ही येत आहोत अशी नुसती हूल उठविल्याबरोबर नादीरशाहा माघारा वळला! सगळंच गमवायची वेळ येईल म्हणून पदरात पडलंय तेवढंच घेऊन तो पळायला लागलाय. पण जादा तयारी करून पुनः परतल्याशिवाय तो राहायचा नाही. व्यसनाची चटक मेल्याशिवाय जात नाही अन् या यवनांना सगळ्यांना हिंदुस्थानाच्या लुटीचं व्यसन चिकटलंय.



www.esahity.com

आम्हाला नादीरशाहाचा पाठलाग केलाच पाहिजे. त्याच्या हातून आमची लक्ष्मी सोडवून त्याच्या इराणात जाऊन त्याला हैराण केलंच पाहिजे.

**शिंदे** : सरकार, करू पण कसं?

**बाजीराव** : जसं आजवर केलं तसं! राणोजी, मल्हारराव, कामाला लागा, काम होऊन जाईल आणि काम होणार नसेल तर मेलेलं काय वाईट? चला, फौज तयार करा आणि हुकूम मिळताच कूच करा.

**शिंदे** : आज?

**बाजीराव** : होय, आज.

**होळकर** : आत्ता?

**बाजीराव** : होय, आत्ता! बोला, जय छत्रपती शिवाजीमहाराज!

**शिंदे व होळकर** : जय छत्रपती शिवाजीमहाराज!

(मुजरे करून शिंदे, होळकर त्वरेने जातात.)

**बाजीराव** : रामाजीऽऽ

(पहारेकरी येतो.)

**बाजीराव** : बाईंची तयारी झाली आहे की नाही पाहा. म्हणावं, लवकर निघा आणि ब्रह्मेंद्रस्वामींनी आम्हाला आशीर्वाद म्हणून पाठविलेलं वज्रकवच द्या. (रामाजी आत गेल्यावर) स्वामींच्या प्रसादानं, छत्रपतींच्या प्रभावानं, वडिलांच्या प्रतापानं आजपर्यंत यश मिळालं. आता त्याची सीमा करू द्या.

**रामाजी** : (येऊन) सरकार, बाईसाहेब तयार आहेत. पण थोडं थांबायला सांगितलंय. (बाजीराव युद्धावर जाण्याची तयारी करू लागतो. अंगावर वज्रकवच घालतो. शस्त्रे अडकवू लागतो. रामाजी त्याला साह्य करतो.)

**बाजीराव** : (आत पाहत) किती उशीर? येते आहे की नाही?

(बाजीराव मस्तानीसाठी आतल्या दाराकडे पाहत असतो. त्याचवेळी बाहेरून प्रतिनिधी येतो.)

**प्रतिनिधी** : नमस्कार, श्रीमंत.

**बाजीराव** : कोण? तुम्ही? नमस्कार! वेळेवर आलात. आम्ही निघालो. तुम्ही बसा. काही हुकूम?

**प्रतिनिधी** : होय.



www.esahity.com

**बाजीराव** : (मोठ्याने) काय?

**प्रतिनिधी** : छत्रपतींचं आज्ञापत्र!

**बाजीराव** : ठेवा डोक्यावर आमच्या. आमचे हात गुंतलेत ना? सांगा मतलब. म्हणजे ते स्वीकारायला वेळ लागेल तोही लागायला नको.

**प्रतिनिधी** : ठीक आहे. करा तयारी. मराठी रिवाज लक्षात घेऊन, दौलतीचं हित डोळ्यांसमोर ठेवून, श्रीमंतांच्या आणि त्यांच्या माणसांच्या कल्याणाकडे पाहून..

**बाजीराव** : लवकर बोला.

**प्रतिनिधी** : छत्रपती स्वामींनी आज्ञा केली आहे, 'मराठी फौजेतील कोणाही इसमाने मोहिमेवर जाताना शस्त्रसामुग्रीशिवाय कोणतीही चीज नेणे नाही.'

**बाजीराव** : सरळ बोला. स्पष्ट बोला.

**प्रतिनिधी** : 'स्वारीवर असताना कोणाही मराठ्याने स्त्री बाळगणे नाही.'

**बाजीराव** : काय?

**प्रतिनिधी** : लेखी हुकूम आहे छत्रपतींचा. अन् आपल्याला अंमलबजावणी करायला सांगितली आहे त्यांनी.

**बाजीराव** : आम्ही शिपाईगडी. हुकुमाखातर प्राण द्यायची तयारी आहेच आमची. (आतल्या दाराकडे एकच क्षण पाहून) आता आम्हाला अडवू नका. (जाऊ लागतो.)

**प्रतिनिधी** : छत्रपतींच्या पत्राला आपलं उत्तर?

**बाजीराव** : कळवा 'चक्षुर्वे सत्यं' हकीगत.

**प्रतिनिधी** : आणि उद्याची मुंज कोण करणार?

**बाजीराव** : का? भटजी आहेत ना? आणि आपणही कुठे जात नाही ना? बसा. बसा. बसा. (दाराकडे जातो.)

**मस्तानी** : (पुरुषी लढाऊ पोषाख घालून, कमरेला तलवार अडकवून आणि हातांत भोजनाचे ताट घेऊन येत) राव, उभ्याउभ्या दोन घास तरी खायचे होते. सकाळपासून...

(बाजीराव वेगाने निघून जातो. जाताच प्रकाश मंदावतो.)

**मस्तानी** : राव, राव, मी येते. मला येऊ द्या, राव, राव...

(ताट झोपाळ्यावर ठेवून दाराशी जाते. एकदम पुतळ्यासारखी उभी राहते. दारातून पुढे भाला येतो. तिचा हात आपल्या तलवारीवर जातो पण थांबतो. ती



www.esahity.com

खिडकीकडे वळते. मोठ्याने हाका मारते, ‘राव, राव, राव.’ त्याचवेळी भालाईत आत येतो. त्याच्यामागून हातात लोखंडी बेड्या घेऊन चिमाजीअप्पा आणि बांधायचे दोरखंड घेऊन नाना प्रवेश करतात. मस्तानी मटकन खाली बसते. खिडकीच्या कठड्यावर हात आणि हातावर डोके ठेवून आवेगाने येणारे हुंदके आवरण्याचा व्यर्थ प्रयत्न करते. त्याचवेळी ‘हरहर महादेव’ अशी गर्जना ऐकू येते. घोड्यांच्या टापा जोरात भूमीला तुडवीत दूर गेल्याचेही समजते. संध्याकाळ झाल्याने काळोख दाटून येतो. बसलेली हुंदके देत असलेली मस्तानी, भाला उगारलेला भालाईत, बेड्या हातात घेऊन उभा राहिलेला चिमाजीअप्पा, दोराची वलये घेतलेला नाना आणि छत्रपतींच्या आज्ञापत्राची सुरळी हातात घेतलेला प्रतिनिधी यांच्या काळ्या छाया खिडक्यांमधून येणाऱ्या संधिप्रकाशाच्या लालसर पार्श्वभूमीवर दिसतात. पाठमोरा प्रतिनिधी डावा हात उंच करून आज्ञापत्राची सुरळी मोकळी करतो.)



www.esahity.com

# मस्तानीचा बाजीराव

## अंक तिसरा

(दि. २५ एप्रिल, १७४०. नर्मदेच्या तीरावर रावेर छावणी. आकाश अंधारून आलेले असल्यामुळे फारसा उजेड नाही. सोसाट्याचे वादळ चालू असल्याने मधूनमधून विजांचा चकचकाट. दोन खांबी तंबूच्या आतला भाग दिसतो. समोरासमोर दोन दारे आहेत. दारांवरचे पडदे वादळामुळे फडफडत आहेत. मागील भागात एक साधा मंचक आहे. उजव्या हाताला मेज आहे. त्याच्यापुढे थोडी उंच बैठक असून तिच्यावर लिहिण्याचे छोटे उतरते मेज, त्यावर शाईची दौत, लेखण्या वगैरे सरंजाम आहे. मंचकाच्या डाव्या हाताला तीनचार बडी माणसे बसू शकतील असा कोरीवकाम केलेला एक नक्षीदार बाक आहे. तंबूच्या मागील भागावर नाना प्रकारची शस्त्रे आणि चिलखत, टोप वगैरे लढाईची सामुग्री अडकविलेली आहे. मंचकाच्या मागेच तीन बंदुका आणि तीन भाले एकमेकांना लागून उभे ठेवलेले आहेत. एकदा खूप जोराचा वारा येतो. त्या वाऱ्याचा आवाजही कर्कश वाटतो, त्याच वेळी वीज चमकते, तंबू फडफडतो आणि बंदुका आणि भाले खाली आडवे पडतात. मग वादळ शांत होते. एका हातात छोटा दिवा आणि दुसऱ्यात काही मुळ्या घेऊन उजव्या दारातून एक वृद्ध प्रवेश करतो.)

**वैद्य** : (मोकळ्या बिछान्याकडे बघत) हे काय, श्रीमंत गेले? विठोबा, ए विठोबा, अरे विठोबाऽ

**विठोबा** : (हातात जोडे घेऊन प्रवेश करीत) वैद्यबुवा, कोणत्या विठोबाला हाका मारतायसा – देवडीतल्या की देवळातल्या?

**वैद्य** : विठोबा, श्रीमंत कुठे आहेत?

**विठोबा** : गंगेच्या पाण्यात.

**वैद्य** : नर्मदेवर?



www.esahity.com

**विठोबा** : जी.

**वैद्य** : अरे कशाला?

**विठोबा** : दोन हात करायला!

**वैद्य** : पोहायला?

**विठोबा** : कसं बोललात?

**वैद्य** : अंगात चटका बसण्याइतका ज्वर असताना?

**विठोबा** : जाळ होता म्हणूनच गेल्याती.

**वैद्य** : म्हणजे?

**विठोबा** : म्या बसलो होतो त्यांच्या डोक्यावर पाण्याच्या घड्या ठिवीत. ते म्हणाले, 'विठोबा, सगळं अंग जळतंय अन् डोस्कं त्याहून जळतंय. ते एवढ्याशा पाण्यानं न्हाई थंड व्हायचं. त्याला आख्खी नर्मदा ठेवायला पाहिजे डोक्यावर शंकरानं गंगा ठेवली तशी.' मग जी सणक येऊन म्हणाले, 'नर्मदा कशी येईल माझ्याकडं? मलाच गेलं पाहिजे तिच्याकडं!'

**वैद्य** : अन् तू इथं नुसते जोडे सांभाळत बसला आहेस?

**विठोबा** : वैद्यबुवा, हे काय जोडे हायती? लोकांच्या पायताणाला जोडे म्हनत्यात. सरकारांच्या पायातल्याला पादुका म्हनत्यात. सरकारांच्या पायांना पदकमळं म्हनत्यात अन् बाकीच्यांच्या पायांना लाथा म्हनत्यात. सरकारांच्या पायांवर माथा ठिवत्यात अन् बाकीच्यांच्या माथ्यांवर...

**वैद्य** : अरे विठोबा, जोडे का कुठे जाणार होते?

**विठोबा** : कसे जातील? म्या छाताडावर हात आडवा ठिवूनशानी सांगतो, माझा जीव जाईल पर हा जोडा जाणार न्हाई. अहो वैद्यबुवा, आम्हीन्तुम्ही सारखेच की! आम्ही जोडे सांभाळतो. तुम्ही जोड्यांचे मालक सांभाळता. पर तुम्ही सांगतासा का, 'माझा जीव जाईल पण रोग्याचा जीव जाणार नाई?'

**वैद्य** : वेड्या, नुसते जोडे सांभाळून काय उपयोग?

**विठोबा** : जोडं सांभाळून साध्या शागीर्दाचा सरदार शिंद्या व्हईल पण ह्यो तुमचा बटवा सांभाळून मुडद्याचा जिंदा व्हईल काय?

**वैद्य** : विठोबा, अरे जोडे सांभाळायचे की...

**विठोबा** : हां वैद्यबुवा, आता मलाच त्यांना सांभाळायला सांगाल तर त्यांना सांभाळणाऱ्यांस्नी त्यांचं जोडं सांभाळाया सांगावं



www.esahity.com

लागेल!

**वैद्य** : सगळ्यांचंच चुकलं विठोबा. श्रीमंतांच्या फक्त जोड्यांची काळजी घेतली गेली. पण त्यांची स्वतःची? छे, छे, विठोबा, आतापर्यंत श्रीमंतांना कधी ज्वर आला नाही. पण आज त्यानं मागचं उट्टं काढलं. ते काढायला खास मुळ्यांचा काढा पाहिजे म्हणून त्यांचा डोळा लागलायसं पाहून मी रानात गेलो. पण इकडे रोगाचं मूळच आपल्या हातून निसटलं!

**विठोबा** : आता हो वैद्यबुवा?

**वैद्य** : आता वैद्यो नारायणो हरिः। अरे विठोबा, हा ज्वर भरल्यावर मोकळी हवादेखील अंगाला लागता कामा नये. पण श्रीमंत तर या वाऱ्यावादळात पावसापाण्यात नर्मदेच्या पुरात पोहायला गेले.

**विठोबा** : वैद्यबुवा, शिरीमंत कुणाचं ऐकत्यात का?

**वैद्य** : पण विठोबा, आता इथं धन्वंतरी आला तरी काय मन्वंतर करणार? विठोबा, त्यांच्या मागोमाग कुणी गेलेत का?

**विठोबा** : रामाजी अन् तुळाजी सांगाती गेलेत ना.

**वैद्य** : बरं, या मुळ्या चांगल्या कूट पाहू. कुटल्यावर उकळून काढा कर.

**विठोबा** : आणा हिकडं, पर वैद्यबुवा, एक पुसू का?

**वैद्य** : (बटव्यातून आणखी वस्तू चाळीत) विचार की.

**विठोबा** : आता अप्पासाहेब इक्ते पुण्यवान पर सारखे रोग्यावाणी कसे? शिरीमंतदेखील बाईला पुण्याला ठिवूनच आले की. मग त्यांना पुण्य लागू नये का? असा कसा हो देवाघरचा न्याव?

**वैद्य** : अरे विठोबा, ज्याचा उभा जन्म कपटात आणि पातकात गेला त्या धर्मच्छेदक औरंगझेबाला नव्वद वर्षं आयुष्य आणि धर्मावतार थोरल्या छत्रपतींना पन्नाशीदेखील पुरती लाभू नये? अरे, दैव प्रसन्न असेल तर सातासमुद्रावरून येणाराजाणारा म्हातारा फिरंगी मजेत राहील. पण दैवच फिरलं म्हणजे जेमतेम गुडघाभर पाण्यातसुद्धा एखाद्या तरुणाचा जीव जाईल! कालाय तस्मै नमः।

(रामाजी अन् तुळाजी यांचा आधार घेत बाजीराव प्रवेश करतो.)

**बाजीराव** : नमस्कार, वैद्यबुवा! आपल्याला पाहिलं अन् आमच्या जिवात



www.esahity.com

जीव आला. रामाजी, तुळाजी, अरे या बाजीरावाला निजामानंच काय नादीरशाहानंसुद्धा कैद केलं नाही. पण तुम्ही मात्र कैद्यासारखं पकडून ठेवलंय आम्हाला! (हसून) सोडा, सोडा. आणखी किती वेळ पकडून ठेवाल आम्हाला?

(रामाजी अन् तुळाजी बाजीरावाचे हात सोडतात. बाजीराव हसून पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न करतो. पण कोसळतो. कोसळताना समोरच्या खांबांचा आधार घेण्याचा प्रयत्न करतो. पण व्यर्थ. त्याची शुद्धच हरपते. बाकीचे चौघेजण त्याला उचलून मंचकावर लोडाला टेकून निजवतात.)

**वैद्य** : विठोबा, तो काढा चांगला उकळून आण लवकर. (विठोबा जातो. बाजीरावाच्या अंगावर पांघरुणे घालीत) तुळाजी, त्या बटव्यातली पुडी आणि मधाची शिशी काढ जलदीनं अन् चटकन चाटण कर त्या फुलपात्रात. रामाजी, ताबडतोब सरकारकुनांच्याकडे जा. म्हणावं, चपळ घोडेस्वार पुनः पुण्याला पाठवा आणि श्रीमंतांची माणसं त्वरेनं बोलावून घ्या. (रामाजी 'जी' म्हणून घाई करून डाव्या दाराने जातो. तुळाजीने आणलेले चाटण वैद्यबुवा बाजीरावाला चाटवतो.) तुळाजी, दारावर उभा राहा. लोक यांच्याकडे कामास येतील तर न जाणो हेच... नाही, नाही. तू जा. (तुळाजी जातो.) विठ्ठला! विठ्ठला! (बाजीरावाकडे निरखून पाहत एकदम बटव्यातून एक मात्रा काढतो आणि सहाणेवर दुधात उगाळून बोटानेच बाजीरावाला चाटवतो.) हर हर! (उजव्या दाराकडे येऊन) विठोबा, अरे काढा आणशील की नाही? (लगबगीने डाव्या दाराकडे जाऊन) तुळाजी, अरे अजून रामाजी आला नाही? त्याला म्हणावं, 'इथेच थांब.'

**बाजीराव** : (सुषुप्तीत) मस्तानी, ये. ये, मस्तानी. रागावू नकोस आम्ही इकडे आलो म्हणून. तूही रागावलीस तर...? नाही, नाही. तू रागवायची नाहीस. मग का येत नाहीस? अग, हुकुमाचे बांधील आम्ही. तुला काय? तू येऊन जवळ असायचं होतंस. मस्तानी, ये ना. नाहीतर आम्हीच येऊ तिकडे. एकदम. असेच. मस्तानी... मस्तानी...

(बेहोषीतच बिछान्यावर उठून बसतो. पण उजवा हात कपाळावर दाबून तसाच मागे लोडावर पडतो आणि कण्हू लागतो. वैद्यबुवा धावतच जवळ



www.esahity.com

जातो.)

**वैद्य** : शांत व्हा, श्रीमंत. शांत व्हा.

**बाजीराव** : (अर्धवट जागा होऊन) ती का नाही आली अजून?

**वैद्य** : श्रीमंत, पुनः बोलावणं पाठवलंय.

**बाजीराव** : बोलावणं पाठवलंय?

**वैद्य** : अगदी जलदीनं घोड्यावरून राऊत पाठवलेत.

**बाजीराव** : मग आम्हालाही जलदीनं बरं करा, वैद्यबुवा. आ! अगाई!

(पुनः बेहोष पडतो. वैद्यबुवा पळत उजव्या दाराकडे 'विठोबा, विठोबा' अशा हाका मारीत जातो. विठोबा धावत येतो. त्याच्या हातात काढ्याचे पातेले असते. विठोबा जातो. वैद्यबुवा पातेले घेतो आणि बाजीरावाकडे येऊन छोट्या पळीने घोटघोट त्याच्या तोंडात घालतो. थोड्याच वेळात बाजीराव डोळे किलकिले करून पाहू लागतो.)

**वैद्य** : श्रीमंत... श्रीमंत...

**बाजीराव** : वैद्यबुवा, कधी लढाईच्या घाईतदेखील वाटला नाही इतका थकवा वाटतोय.

**वैद्य** : श्रीमंत, आजपर्यंत कधी विसावा घेतला नाहीत. तो सगळा शिणवटा साचून राहलाय.

**बाजीराव** : वैद्यबुवा, आम्ही बरे होऊ ना?

**वैद्य** : जरूर बरे व्हाल आपण. पण...

**बाजीराव** : पण काय?

**वैद्य** : दिवसगत लागेल.

**बाजीराव** : वैद्यबुवा, उशीर होऊन कसं चालेल?

**वैद्य** : श्रीमंत, आजपर्यंत आपण दौलतीची एवढी काळजी वाहिलीत पण स्वतःची मुळीच नाही पाहिलीत. सारखा मिरच्या अन् हुरडा खाऊन पचावा कसा? अन् सारखी जागरणं अन् दौडणं करून अंगी लागावं कसं? श्रीमंत, पूर्ण विश्रांती घ्यायला हवी आपल्याला.

**बाजीराव** : विश्रांती घेऊन कसं चालेल, वैद्यबुवा?

**वैद्य** : श्रीमंत, परवानगी असेल तर सांगतो...

**बाजीराव** : वैद्यबुवा, तुमचा अधिकार आहे आमच्यावर.

**वैद्य** : बरं झाल्यावरसुद्धा बैठी कामंच केली पाहिजेत आपल्याला.

**बाजीराव** : वैद्यबुवा, असा गुरूसारखा उपदेश करू नका.



www.esahity.com

अश्विनीकुमारांसारखं औषध द्या.

**वैद्य** : श्रीमंत, चित्तक्षोभानं, सुधारत आलेली प्रकृतीसुद्धा एकाएकी ढासळेल.

**बाजीराव** : नाही, नाही वैद्यबुवा. तुम्ही सांगाल ते पथ्य करू. पण आमची प्रकृती पूर्ववत झाली पाहिजे. वैद्यबुवा, मागाल ती जाहागीर देऊ. पण एकतरी एकमेवाद्वितीय स्वारी आम्हाला उत्तरेत करू द्या. वीसपंचवीस हजारांनिशी आम्ही गेलो तरी आवाई लक्षाची पडते. मग लक्षलक्ष फौजा घेऊन गेलो तर? त्या नादीरशाहाचा त्याची तयारी व्हायच्या आतच निकाल लावला पाहिजे. समस्त सरदारांना आम्ही एकत्र बोलावलं आहे. त्यांची मनं दुखावू नयेत म्हणूनच आम्ही आमच्या स्त्रीचं मन दुखावून एकटेच आलो. वैद्यबुवा, सारे मराठे, सारे रजपूत, सारे हिंदू आता एक होणार अन् हिंदवी साम्राज्याचा कीर्तिघोष दिगंती नेणार! या घडीला आम्ही स्वस्थ पडावं म्हणता? वैद्यबुवा, नादीरशाहाला बुडवला म्हणजे सूर्य बुडाल्यावर प्रकाश मावळतो तसे बाकीचे मोंगल, निजाम वगैरे यवनही मावळतील. वैद्यबुवा, उत्तरेकडील ही एकच स्वारी आणि मग पुण्याची वारी. मग आमचं पुणं आमचं होईल. वैद्यबुवा, जिनं आमच्यावर जिवापलीकडे प्रेम केलं, साऱ्या सुखांकडे दुर्लक्ष केलं, आमच्या पोराच्या प्रसूतीचं दुःख सहन केलं, आणि स्वतःच्या, नवऱ्याच्या आणि नवजात अर्भकाच्या – तान्ह्याच्या – निंदेचंही जहर आसवांबरोबर गिळलं त्या आमच्या स्त्रीला सत्तेचा, सुखाचा, समाधानाचा एक क्षण तरी देऊ द्या.

(ग्लानी येते म्हणून बाजीराव लोडावर मागे पडतो.)

**वैद्य** : शांत व्हा, श्रीमंत. (बाजीरावाला व्यवस्थित करून उजव्या दाराकडे येऊन) विठोबा, अरे किती उशीर?

**बाजीराव** : मस्तानी... मस्तानी... मस्तानी...

(इतक्यात डाव्या दाराच्या बाहेर गलबला होतो, 'बाईसाहेब आल्या! बाईसाहेब आल्या!' बाजीराव खाडकन जागा होतो. उठून बसतो. त्याचवेळी विठोबा काढा घेऊन येतो. वैद्यबुवा तो घेऊन बाजीरावाकडे जातो.)

**वैद्य** : हे काय श्रीमंत? आराम करावा. हा काढा घ्यावा.



www.esahity.com

**बाजीराव** : ऐकलंत? ती आली! आमच्या मनाची हाक तिला समजली, इतक्या लांबून आली. हिमतीनं आली. (उभा राहत) अहो, तो काढा राहू दे. आम्हाला काय झालंय? ती आली ना! पुन्हा एकदा नर्मदा पोहून जायची ताकद आलीय आमच्या अंगात! वैद्यबुवा, आधी ती सगळी औषधं इथून हलवा. पाहून बेचैन होईल ती. अहो, आम्हाला काय झालंय? लवकर! विठोबा, आमचं उपरणं घे. आमचं तोंड चांगलं पुसू दे, अन् या बिछान्यावर चांगली नवीकोरी चादर अंथर. आमचा आजार तर गेलाच आहे. पण त्याची ही सगळी चिन्हंही जाऊ देत. अन् जा. तिला घेऊन ये जा. अरे जा ना, आमच्यापाशी कुणी नकोय. आम्हाला काय झालंय?

(नाइलाजाने औषधे घेऊन उजवीकडील दारातून वैद्यबुवा आणि तंबूतील सामानाची टापटीप करून डावीकडील दारातून विठोबा बाहेर जातात. बाजीराव मस्तानीच्या नावाचा जप करीत पुढे येतो. दारापाशी येऊन उभा राहतो. मग–)

**बाजीराव** : कोण? तुम्ही? तुम्ही आलात?

(काशीबाईच येते! बाजीराव मागे होऊन पाठीने खांबाचा आधार घेतो.)

**बाजीराव** : या. फार कष्ट पडले तुम्हाला आमच्यासाठी. आधीच तुमची प्रकृती नाजूक. त्यात नित्याचं आजारपण. अन् वर हा दूरवरचा प्रवासाचा ताण!

**काशीबाई** : आई! आई! मला चक्कर येतेय हो!

**बाजीराव** : काय दैवाचा त्रास आहे तुमच्यामागे. चला. बसा. (आधार देत बाकावर बसवतो.) पाणी प्या. आता बरं वाटतंय ना?

**काशीबाई** : इकडचं दुखणं काढायला आले पण माझंच दुखणं घेऊन आले.

**बाजीराव** : अहो, आमचंच दुखणं तुम्ही काढून घेतलंत. आता तुम्ही बऱ्या व्हा म्हणजे आम्हीही बरे होऊ.

**काशीबाई** : बाकी स्वभावाला औषध नाही. उगीचच ताप करून घ्यायचा सारखा.

**बाजीराव** : उगीचच?

**काशीबाई** : नर्मदेत पोहायला कशाला जायचं होतं?

**बाजीराव** : तुम्हाला बरं नसतानाही तुम्ही इथं येण्याचे श्रम घेतलेच ना?

**काशीबाई** : आता दुखणं वाढलं म्हणजे कोण काढील?



www.esahity.com

**बाजीराव** : आम्हाला आपल्या सगळ्या माणसांचं क्षेमकुशल सांगा म्हणजे आमचंही क्षेमकुशल होईल. अप्पाची तब्येत काय म्हणते?

**काशीबाई** : भावजींनी वसईवर ताबा मिळवला अन् त्यांची तब्येत चांगली झाली.

**बाजीराव** : छान! नानाचं कसं चाललंय?

**काशीबाई** : साताऱ्याला गेलाय तो. छत्रपतींचा अगदी जीव जडलाय त्याच्यावर.

**बाजीराव** : आम्हाला जमली नाही ती गोष्ट त्यानं करून दाखविली. रघूला आठवण येते का आमची?

**काशीबाई** : अहो, सगळे वडीलवेडा म्हणून चिडवतात त्याला. सारखा माझ्यामागे लागतो 'मला लढाईवर पाठव' म्हणून. म्हणतो, 'मी खरंच लढेन. बाबासाहेब लढतात. मी त्यांच्यापेक्षा जास्त लढेन. ते वीर ब्राह्मण आहेत. मी सवाई वीर ब्राह्मण होईन! आई, मी बाबासाहेबांचाच मुलगा आहे ना? का नाही पाठवत मला?'

**बाजीराव** : राजा... राजा... राजा... आमचाच मुलगा आहेस तू. आमच्यापेक्षाही मोठा होशील तू. आम्ही फक्त आमच्या धर्माची सेवा केली; पण तू? तुला आम्ही दूर ठेवलं तरी... सांगा, सांगा. आणखी खुशाली सांगा पुण्याची.

**काशीबाई** : आणखी काय?

**बाजीराव** : सगळं ठीक आहे?

**काशीबाई** : नाही. आपल्या लाडक्या गुणसागर घोडीला मध्ये बरं नव्हतं. पर्वतीपासच्या नाल्यावरून उडी मारताना तिचा पाय दुखावला होता. पण पुनः दौडते पहिल्यासारखी.

**बाजीराव** : आणखी काही खबरबात?

**काशीबाई** : हो, आपल्या शनिवारवाड्यातल्या उत्सवाच्या दिवाणखान्याचं काम पुरं झालं. परत गेल्यावर तिथेच जोडीनं देवतापूजन करू या.

**बाजीराव** : आणखी काही विशेष?

**काशीबाई** : आणखी काय बाई?

**बाजीराव** : संपलं बाकी सारं? अहो, मुळामुठेत पाणी वाहत आहे ना? तिथल्या झाडांची पानं हिरवीच आहेत ना? अन्



www.esahity.com

सकाळसंध्याकाळ सूर्य उगवतो-मावळतो आहे ना?... अहो, समशेर कसा आहे? त्याची आई कशी आहे? तुम्हीही आई आहात ना? स्त्री आहात ना? अहो, इथे येण्याचे एवढे श्रम घेतलेत तसे थोडे तिच्या महालात जाण्याचे घेतले असते तर?

**काशीबाई** : तुमचा जीव तिच्यासाठी तुटतो.

**बाजीराव** : तुम्ही तिच्याशी तुटक वागता.

**काशीबाई** : छत्रपतींनीच हुकूम काढला बाईमाणसांनी लढाईत जायचं नाही म्हणून. तो मोडून पुरुषासारखा पोषाख करून ती चालली होती पळून.

**बाजीराव** : ती पळून येत होती? ती वाड्यातून निसटली होती? कुणी अडवलं तिला? का?

**काशीबाई** : नानानं तिचा डाव उलटवून तिलाच ठेवलंय कैद करून नजरबंदीत.

**बाजीराव** : नानानं?

**काशीबाई** : हो.

**बाजीराव** : का?

**काशीबाई** : पहाऱ्यात पडावं लागलं तर स्वस्थ बसावं की नाही? रोज नवीन ढोंग. कधी बोलतच नाही. कधी जेवतच नाही.

**बाजीराव** : जेवत नाही? आणि हे ढोंग? तिच्याबरोबर कोण आहे?

**काशीबाई** : कोणी नाही.

**बाजीराव** : समशेर?

**काशीबाई** : त्याला मुद्दामच वेगळं ठेवलंय तिच्यापासून, तिनं काही वाईटसाईट पढवू नये म्हणून.

**बाजीराव** : त्याची पढाई?

**काशीबाई** : येतो एक मौलवी.

**बाजीराव** : का? शास्त्रीपंडित पुण्यात कमी होते? अहो, त्याला हिंदू करणं राहिलं निदान हिंदू शिक्षण तरी द्यायचं होतं? अहो, त्याला त्याच्या आईजवळ ठेवलं असतं म्हणजे तिनंदेखील ते दिलं असतं. (उठून बाजूला वळून) तिच्याजवळ ना आम्ही, ना आमचा पुत्र! तिच्याजवळ आहे फक्त वंचना आणि वेदना! आमच्या भरंवशावर तिनं नदीत उडी घेतली



www.esahity.com

पलीकडील तीर गाठावा म्हणून. पण ना पहिला किनारा ना दुसरा. आता कुठे जाईल ती? बुडून तर जाणार नाही? नाहीतर बुडवून तर घेणार नाही आमच्या मार्गात धोंड नको म्हणून? मस्तानी... मस्तानी, असं काही तू करू नकोस. आम्हाला लढाईच्या घाईत वेळ होत नाही म्हणून आपल्या मुलाला तूच मोठं करणार आहेस... आमच्यादेखत आमच्या लेकराचं क्षेम आम्हाला कुणी सांगत नाही. आमच्यामागे या पुत्राचं कसं होईल? परकी सत्तेचं मूळ पुरतं उपटू न दिल्याबद्दल छत्रपतींच्यावर आम्ही नाराज झालो होतो. त्याच परकी धर्माचं मूळ आमच्याच हातून आमच्याच घरात रोवलं गेलं! स्वधर्माच्या वृक्षाला पाणी घालता घालता आम्ही परधर्माचंही रोप जोपासलं! हिंदवी साम्राज्य वाढविणाऱ्या आम्ही मुस्लीम वंश वाढविला! या दोहोंचं कलम करावं अशी आमची इच्छा होती. पण हे रोप आता वेगळंच वाढवायला पाहिजे. आम्हालाच त्याची काळजी घ्यायला पाहिजे. आमच्याच लोकांपासून ते वाचवायला पाहिजे. पण अजून आम्ही सगळं बळ एकवटून धडक दिली तर तडक आमचा ध्वज साऱ्या हिंदुस्थानभर फडकवू! अन् मस्तानी, तुला न् समशेरला हिंदू करून आमच्या जमातीत आमच्या जवळ घेऊ. मस्तानी, थोडा धीर धर! आलोच आम्ही! (पुढे येत) विठोबा, तुळाजी, रामाजी, अरे कुठे गेलात सारे? तुम्हीही आमचं ऐकत नाही? विठोबाऽ (विठोबा येतो) तुळाजीऽ (तुळाजी येतो) रामाजीऽ (रामाजी येतो) बोलावल्याबरोबर का नाही आलात? आजारी पडलात की...

**काशीबाई** : (उठून येत) अहो, किती उगीच त्रास करून घ्यायचा? अशी काय कामाची घाई आहे? आराम करावा. अगाईऽ मला चक्कर येतेय हो ऽ आई. (बाजीराव त्वरित जाऊन सावरतो अन् बिछान्यावर निजवतो.)

**बाजीराव** : विठोबा, वैद्यबुवा कुठे आहेत?

**वैद्य** : (येऊन) श्रीमंत, ज्वर चढलाय बाईसाहेबांच्या अंगात. विठोबा, मघाचाच संजीवनी काढा आण.

**विठोबा** : शिरीमंतांसाठी केलेला?



www.esahity.com

**वैद्य** : हो, हो, तोच. श्रीमंत, आपणही आराम करावा.

(विठोबा जातो. बाजीराव काशीबाईजवळ बसतो.)

**वैद्य** : तुळाजी, मला आता आधी बाईसाहेबांच्याकडेच ध्यान द्यावं लागेल. बाहेर कुणी गडीमाणूस आहे का?

**तुळाजी** : काळू है की उभा बाहीर.

**वैद्य** : त्याला म्हणावं, घोड्यावरून गावात जा. तिथं वैद्यपंचानन जोशीबुवा राहतात. त्यांना म्हणावं, याच घोड्यावरून बटवा घेऊन पटकन या. जा. (तुळाजी जातो.) रामाजी, तुळाजी आला म्हणजे त्याला म्हणावं या दारावर पक्का उभा राहा. कुणालाही आत सोडू नकोस. विठोबा आल्यावर त्याला त्या दारावर खडा कर. आणि तू इथं श्रीमंतांपाशी उभा राहा. निघायचे पुन्हा नर्मदेवर जायला! कुठेही जाऊ देऊ नकोस. ही पुडी मधातून दे म्हणजे गाढ निद्रा लागेल त्यांना. पण ज्वर भरू लागला तर मात्र ताबडतोब मला बोलावून घे. लक्षात ठेव, प्रसंग कठीण आहे. काळाला दयामाया नाही.

(विठोबा काढा घेऊन येतो. वैद्यबुवा तो काशीबाईला घोटघोट पाजतो. ती शुद्धीवर येते.)

**काशीबाई** : हे काय? मी पडलेय अन् इकडे आराम नाही? (उठते.)

**वैद्य** : बाईसाहेब, आपण पलीकडल्या तंबूत चलावं म्हणजे आपला हेतू साध्य होईल.

**बाजीराव** : खरं आहे.

**काशीबाई** : पण इकडे स्वस्थ राहणं होईल ना?

**बाजीराव** : त्याबाबत तुम्ही अगदी स्वस्थ राहा.

(बाजीराव आणि वैद्यबुवा काशीबाईला धरून दारापर्यंत नेतात. बाजीराव तिथेच थांबतो. काशीबाई वळून त्याच्याकडे पाहते आणि निघून जाते. तिच्याबरोबर वैद्यबुवा जातो.)

**बाजीराव** : तुळाजीऽ तुळाजी कुठं आहे?

**रामाजी** : सरकार, कामाला गेलाय.

**बाजीराव** : आम्ही सांगितलं नव्हतं?

**रामाजी** : वैद्यबुवांनी सांगितलंय, सरकार. दुसऱ्या वैद्यांना निरोप द्यायला.

**बाजीराव** : आणखी वैद्य कशाला? विठोबा, ताबडतोब सरकारकुनांना बोलावून आण. तातडीची गुप्त पत्रं धाडायची आहेत म्हणावं



www.esahity.com

दूरदूरच्या ठाण्यांना, सगळ्या रजपूत राण्यांना, सगळ्या हिंदू राजांना. जा लवकर. घोड्यावरून जा. वाटल्यास आमचाच घोडा घेऊन जा. नाही, तोच घेऊन जा. जा. (विठोबा जातो.) मस्त कल्पना डोकावू लागल्या आहेत आमच्या मस्तकात. गर्दी मांडली आहे त्यांनी. लगेच टिपल्या नाहीत तर उडून जातील त्या. (तुळाजी येतो तोच) जा तुळाजी, सरचिटणिसांना घेऊन ये. जा. आमची कर्जं किती आहेत आम्हाला एकदा पाहू दे. पुढच्या मोहिमेच्या खर्चाचा नेमका अंदाजही आम्हाला घेतला पाहिजे अन् पैसाअडका जमवायची तजवीजही केली पाहिजे. जा. हिशोबांच्या सगळ्या वह्या घेऊन या म्हणावं. उशीर नको. पळ लवकर (तुळाजी जातो.) रामाजी, तुझ्याकडे सर्वांत जास्त महत्त्वाची कामगिरी आहे. आमच्या सगळ्या सरदारांना सांगायचं, असाल तसे या. शिंदे, होळकर, पवार, बुंदेले सगळे. पण इथं खलबतं चालली आहेत हे अजिबात कुणाला समजता कामा नये. तूही निघ. आहेस तसाच. झटकन. थांबलास का? पाहतोस काय?

**रामाजी** : सरकार... सरकार... वैद्यबुवांनी सांगितलंय, ही पुडी...

**बाजीराव** : कसली?

**रामाजी** : आरामाची, विश्रांतीची, झोपेची.

**बाजीराव** : दे. काम झालं की घेऊच. आता का थांबला आहेस?

**रामाजी** : सरकार, वैद्यबुवांनी कायम आपल्या सेवेत राहायला सांगितलंय.

**बाजीराव** : आमचा हुकूम मानायचा नाही ही आमची सेवा? तुझा मालक कोण? वैद्यबुवा? जा. आम्ही तापानं पडलो आहोत म्हणणाऱ्यांना सांग, पुरानं बेफाम झालेल्या नर्मदेत उडी मारून पलीकडला तीर गाठून परत आलो आहोत आम्ही. जा. आमच्या तंबूवर पहाऱ्याला कुणी नसलं तरी बेहत्तर. चित्ता चालून आला तरी त्याला लोळवायची ताकद आहे आमच्या या बाहूंत. आजारी बाजीराव जे करून दाखवील ते निरोगी कोणीही करून दाखवणार नाही! जा. (रामाजी जातो.) आम्ही आजारी झालो! आम्ही तापानं पडलो! आम्ही वैद्यांचे दास बनलो! का? वाटेल तसली माणसं वाटेल ते करतात



www.esahity.com

अन् वाटेल तितकी जगतात. आम्ही आमच्या कर्तव्यासाठी, आमच्या वचनपूर्तीसाठी, आमच्या देवाधर्माच्या काजासाठी जरूर तेवढंदेखील जगू नये? देवा, जगाच्या दरबारात आम्ही धर्माचे गुन्हेगार ठरलो तरी तूच न्याय देशील मला अन् तुझ्याच लेकीला... तुझ्याच लेकीला... मस्तानी, मस्तानी, सगळ्या लोकांना निरोप पाठपाठवून बोलावून घेतो आहोत आम्ही. पण तुला? मस्तानी, दाभाडे, गायकवाड, बांडे यांनी घोड्यांना सोन्याचे नाल बसविले, पण आमच्या कपाळाला मात्र सावकारांपुढे नाक घासता घासता घट्टे पडले. तरी मस्तानी, पुढच्या एकाच मोहिमेत आम्ही सारी कर्जं सव्याज फेडू. पण मस्तानी, तुझं ऋण कसं फेडू? तुला दिलेल्या दुःखाची भरपाई कशी करू? मस्तानी, मागे एकदा तू पळून यायचा प्रयत्न केलास. तसा पुनः एकदाच कर. (बाहेर घोड्यांच्या टापा वाजतात. आवाज जवळजवळ येत जातो.) मस्तानी, मस्तानी, तू आलीस? नको फसवूस आता. ये मस्तानी.. मस्तानी.. मस्तानी..

(दाराजवळच्या खांबापाशी येऊन अधीरतेने वाट पाहतो. येतो तो प्रतिनिधी.)

**बाजीराव** : काय पाहायला आलात? कोणता नवीन हुकूम घेऊन आलात? आपल्या हुकुमानुसार आम्ही शनिवारवाड्याचं काम थांबवलं. आपल्या हुकुमानुसार आम्ही एकटे– अगदी एकटेच इकडे आलो. आता आणखी आम्ही काय करावं?

**प्रतिनिधी** : आराम करावा, श्रीमंत. छत्रपती स्वामींच्या सगळ्या इच्छा पूर्ण केल्यात आपण. म्हणूनच आपल्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आलो आहोत आम्ही छत्रपतींच्या आज्ञेवरून.

**बाजीराव** : आमच्या प्रकृतीची आठवण आता झाली? आमच्या पश्चात पेशवा कोणाला करायचं हे ठरवायचं असेल! पण आम्ही अजून मेलो नाही, प्रतिनिधी.

**प्रतिनिधी** : आपण उगीचच गैरसमज करून घेत आहात, श्रीमंत. आपल्याला दीर्घायुरारोग्य चिंतिलंय छत्रपतींनी, आणि आम्हीदेखील.

**बाजीराव** : आमचा जन्म गेला शत्रूला तलवारीच्या धारेचं पाणी पाजण्यात आणि तुमचा जन्म गेला आम्हाला पाण्यात पाहण्यात!



www.esahity.com

आमच्या जिवाची तहान भागवणं तुम्हाला रुचत नव्हतं. आता आमच्या तोंडात घालायला गंगा मागवा ना.

**प्रतिनिधी** : शिव शिव! श्रीमंत, आम्ही तुम्हाला स्फूर्ती द्यायला आलो आहोत.

**बाजीराव** : परकी शत्रूंचे हल्लेच आम्हाला स्फूर्ती देत होते. पण घरचे आहेर आमची शक्ती खात होते. आमची ती शक्ती वाया गेली नसती तर? आमचे सरदार आम्हीच घडवले. आमचा निम्मा जन्म यातच गेला. ते आम्हाला तयार मिळते तर?

**प्रतिनिधी** : आता मिळतील ना ते. श्रीमंत, झालं गेलं विसरून जावं. उगीच जिवाला लावून घेऊ नये आपण.

**बाजीराव** : अगदी खरं की हिंदवी साम्राज्याचं दुःख आम्ही आमच्या जिवाला उगीचच जडवून घेतलं! हे राज्य न वाढवता घरात बसून आम्ही नुसतं पोटच वाढवलं असतं तरी आमचेही केस पांढरे झालेच असते अन् दुसऱ्याला उपदेश करण्याचा अधिकार आम्हालाही आलाच असता!

**प्रतिनिधी** : आपण नंतर बोलू, श्रीमंत. आधी आपल्या प्रकृतीला आराम पडू द्या.

**बाजीराव** : आमच्या प्रकृतीला आराम पाडणारा इलाज नाकारायचा तर आमच्या प्रकृतीची चौकशी करायचं सोंग कशाला?

**प्रतिनिधी** : आपण आज इतकं बोलण्याच्या स्थितीत आहात त्या अर्थी आपली प्रकृती निश्चितच चांगली आहे! आम्ही भलतंच ऐकलं होतं. अन् मन चिंती ते वैरी न चिंती! असो. उदंड आयुष्य आपल्याला! येतो आम्ही. हो, पण ताईसाहेबांची प्रकृती कशी आहे?

**बाजीराव** : आपणच पाहा ना. चक्षुर्वै सत्यम्।

**प्रतिनिधी** : त्यांचा समाचार घेऊन येतो. छत्रपतींनी आवर्जून सांगितलं आहे त्यांचीही भेट घ्यायला अन् संपूर्ण विश्रांतीचा सल्लाही दिलाय.

**बाजीराव** : घ्या. आमचा घेतलात आता त्यांचाही समाचार घ्या. (प्रतिनिधीला उजव्या दारापाशी पोचवून) पण मस्तानीचा समाचार कोणी घेऊ नका! वैरीण आहे ना ती तुमची! कारण ती तुमच्या देवतांच्या मूर्तींपुढे नाचू पाहत होती! तुमच्या संतांची गीतं गाऊ



www.esahity.com

इच्छीत होती! तुमच्या धर्माच्या सेवेत झिजू लागत होती! हं! जिनं अजिबात चालायला नको तिला जगाची यात्रा अन् जिनं सावलीसारखं आमच्याबरोबर सतत राहायला हवं तिला सक्त कैद! जिचं दुःख औषधानं बरं होईल तिला वर दिलासा अन् जिच्या मनाला भरून न येणारी जखम झाली आहे तिच्या नशिबी मात्र उपेक्षा! काय न्याय आहे हा! या जगात आम्हाला कोणी न्याय दिला नाही. अन्याय! अन्याय! अन्याय! फक्त अन्याय आणि अन्याय! महाराज, थोरले महाराज, तुमच्या जगात आम्ही असतो तर आमच्यावर अन्याय झाला नसता. न्याय मागायला आम्हाला तुमच्याकडेच यायला पाहिजे, महाराज! (उजव्या दारापासून वळून जवळच्याच खांबावर दुःखावेगाने डोके आपटू लागतो.) मस्तानी, आम्ही स्वतःला दूरदर्शी समजत होतो. पुढे येणाऱ्या संकटांना आधीपासूनच तोंड दिलं पाहिजे म्हणत होतो. पण मस्तानी, तुझ्यावर येणाऱ्या संकटांची कल्पना आम्हाला आली नाही. आम्ही तुला संकटांत टाकलं. त्यांतून तुला बाहेर काढू शकलो नाही! मस्तानी, आमच्यामुळे तुझ्यावर सगळ्यांचा रोष झाला. आमच्याशिवाय याच लोकांनी तुझं तोंड भरून कौतुक केलं असतं! मस्तानी, तू आमच्यासाठी बाकी सगळं सोडून दिलंस. आता आम्हीही सगळंसगळं सोडून तुझ्याकडेच येतो, मस्तानी! मस्तानी... (असे म्हणून त्या खांबापासून पुढे जाऊ लागतो. इतक्यात चक्कर आल्याने खांबाला धरून कसाबसा तोल सावरून उभा राहतो. – भासचित्र : ‘हे वेड खास माझे आवडेल का तुम्हाही?’ मग सगळी शक्ती एकवटून पुढे जाता जाता) आमच्यासाठी वेडी झालीस तू मस्तानी. पण आम्ही? मस्तानी, प्रीतीच्या पूर्तीसाठी बादशहांनी ताजमहाल बांधले! अन् मस्तानी, आम्ही तुझे फक्त हाल केले! मस्तानी, तू आम्हाला पंख दिलेस अन् आम्ही तुझ्या पायांत बेड्या ठोकल्या! स्वर्गीय सुखाच्या साम्राज्याची नवी क्षितिजं तू आम्हाला दाखविलीस अन् आम्ही तुला चार भिंतींच्या आत कैद करून ठेवलं! आपलं संगीत, आपलं सौंदर्य तू आमच्यावर कुरबान केलंस अन् आम्हीच तुला गिरफदार केलं, तुला दूर लोटलं अन् बांधून, जखडून, अडकवून ठेवलं! (भासचित्र : ‘राव, मग मी



www.esahity.com

कुठं राहू? कशी राहू?') पण मस्तानी, आकाशात वीज चमकली अन् तुझ्या प्रीतीची याद आली. आकाश भरून आलं अन् गडगडू लागलं तसं आम्हालाही गदगदून आलं! मस्तानी, पिसाट सुटलेल्या वाऱ्यासारखे आम्ही नर्मदेवर गेलो. ज्या नर्मदेच्या तीरावर तू भेटली होतीस, ज्या नर्मदेच्या पाण्यात तुझं प्रतिबिंब पाहिलं होतं, ती नर्मदा... ती नर्मदा खळाळत, उफाळत, फेसाळत वाहत होती. केवढा वेग! केवढं वैभव! सर्वस्वानं वाहत होती. मस्तानी, त्या नर्मदेत आमच्या नजरेला तू दिसलीस अन् आम्ही त्या नर्मदेत उडी घेतली! (भासचित्र : 'राव, मी येते. मी येते. मला येऊ द्या. राव...') मस्तानी, कशाला या कमनशिबी पेशव्याच्या नादी लागलीस? मस्तानी, बाजीराव जेता नाही, बाजीराव पेशवा नाही, दिल्ली जिंकूनही दिल्लीश्वर नाहीच नाही! हा एक साधा शिपाई गडी! हुकुमाचा बंदा! धर्माचा अपराधी! मस्तानी, या दुसऱ्याच्या पदरच्या तिसऱ्याला वाहिलेल्या जळणाऱ्या ज्योतीवर झेप घालून तू काय मिळवलंस? कशाला तुझी न् आमची गाठ पडली? ती कोणी पाडली अन् का? आमची गाठ पडली नसती तर गायिका, नर्तिका म्हणून तुझी कीर्ती किती पसरली असती! कशाला ते सारं सारं आमच्या या दुर्दैवी हाती सोपवलंस? पण मस्तानी, तू दिसली नसतीस तर आम्हाला आम्ही कोण आहोत हे तरी कळलं असतं का? मस्तानी, तू आम्हाला इतकं दिलंस अन् त्याहूनही इतकं दाखविलंस, पण आम्ही तुला काय दिलं? (भासचित्र : मस्तानी कैदेत, बेडीत. 'राव.. राव..' अशा आर्त हाका) नको, नको, असे जिवाचे हाल करून घेऊ नकोस. अन्नपाणी सोडून आमच्या वाटेकडे असं केविलवाणं पाहू नकोस. मस्तानी, हा बाजीराव कोणी कोणी नव्हता, पण जो होता तो तुझाच होता मस्तानी, (भासचित्र : मस्तानी सुरी उगारून स्वतःवर वार करणार) मस्तानी... मस्तानी... मस्तानी...!

(डाव्या खांबापासून हात सोडून पुढे जाण्यासाठी पाऊल टाकतो. त्याच वेळी सूर्य मावळतो. गडद काळोख होतो. अन् काळोखात काहीतरी धाडकन् पडल्याचा आवाज तेवढा ऐकू येतो!)



www.esahity.com

# काही अभिप्राय

## ‘पराभवाची रहस्ये’

(समीक्षा)

मला फार आनंद झाला. समाधान वाटले. (महानुभाव पंथ आणि कवी केशवसुत) या दोन्ही विषयासंबंधी श्री. जावडेकर यांनी रूढ मतांहून अगदी निराळे मत मांडले आहे.

**– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे** (प्रस्तावना)

लेखकाने नवी दृष्टि स्वीकारली, कोणी मांडला नव्हता असा नवा मुद्दा सप्रमाण अभ्यासकांपुढे ठेवला आणि प्रमाणेही कोणीही तपासून पाहावीत अशा स्वरूपात घासूनपुसून लोकांपुढे ठेवली याबद्दल धन्यवाद द्यावेत असे वाटते.

**– महामहोपाध्याय चित्रावशास्त्री**

केशवसुतांच्या कवितेतून भारतीय ‘अमृत’ परंपरेचा प्रवाह कसा वाहत आहे हे साधार दाखवून आपण केशवसुतांवरील एकांगी आंग्लपुष्टतेचा भार दूर करण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे, असे मला वाटते. महानुभावांच्या पराभवाची आपण केलेली मीमांसा नावीन्यपूर्ण, साधार आणि समतोल आहे.

**– श्री. डॉ. रा. चिं. ढेरे**

महानुभावांच्या मतांबद्दलची माहिती परिश्रमपूर्वक सादर केली आहे. त्यामुळे ते विवेचन फार उद्‌बोधक झाले आहे. केशवसुतांची काव्ये वैदिक संस्कृतीतून स्रवलेली आहेत हे आपले मत मला ग्राह्य वाटते... केशवसुतप्रभृती दामलेबंधू हे माझे सख्खे आतेभाऊ.

**– श्री. शि. ल. करंदीकर**

वरील दोन्ही लेखांवरून दिसून येणारी अभ्यासू वृत्ती व प्रचलिताविरुद्ध जाऊन स्वतंत्र विचारसरणी मांडण्याइतका निर्भय दृष्टिकोन या गोष्टी लेखकाच्या उज्ज्वल भविष्यकालाची साक्ष पटविण्यास पुरेशा आहेत.

**‘वसंत’ मासिक**

प्रा. जावडेकरांची दृष्टी व विचारप्रणाली या सर्वांहून वेगळी व स्वतंत्र असल्याने लक्ष वेधून घेणारी आहे.

**‘प्रसाद’ मासिक**

स्वतंत्र विचार व त्याचे साधार विवेचन पाहून संतोष वाटला.

**– डॉ. प्र. न. जोशी**



www.esahity.com

विचारांना चालना देणाऱ्या, रूढ कल्पनांचाच केवळ आंधळा पुनरुच्चार न करता, स्वतंत्र प्रज्ञेने पुनर्विचार करून महानुभाव व केशवसुत ह्यांच्याविषयी नवी प्रमेये साधार मांडणाऱ्या अशा समर्पक शैलीने नटलेल्या नवविचारप्रेरक ग्रंथाची भर महाराष्ट्रशारदेच्या रत्नभांडारात घातल्याबद्दल प्रा. जावडेकरांना द्यावे तितके धन्यवाद थोडेच होतील!

**– प्रा. मधुकर वाबगावकर**

या पुस्तकात विचारांचा व लेखणीचा काही विलोभनीय असा रंगदारपणा दिसला.

**– श्री. वि. उ. वैद्य**

प्रस्तुत पुस्तक निःसंशय विचारप्रवर्तक झाले आहे.

**– डॉ. के. ना. वाटवे**

## मस्तानीचा बाजीराव

(नाटक)

... महाराष्ट्राचा दुसरा शिवाजी अन्धकारमय स्थितीत अन्तर्धान पावत असल्याचे चित्र मनावर खोल जखम करते.

**– म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव**

... बाजीरावाची कथा व मस्तानीची व्यथा प्रा. मुरलीधर जावडेकर यांनी आपल्या समर्थ लेखणीने एक अमर कलाकृती म्हणून या नाटकाच्या रूपाने मराठी वाचकांसमोर मांडली आहे.

**'सागर', चिपळूण**

... नाट्याच्या पानोपानी बाजीरावाची मनोव्यथा त्याच्या हृदय पिळवटून निघालेल्या शब्दांत व्यक्त होते.

**'बलवंत', रत्नागिरी**

छत्रपतींच्या दरबारी बाजीरावाबद्दल किल्मिष ओतणारे स्वर्थलंपट मुत्सद्दी, त्यांचे विचार आणि बाजीरावाची धडाडी यांतील भेद उत्कृष्टपणे उकलून दाखविला आहे.

**'रविवार सकाळ', पुणे**

... मराठ्यांच्या इतिहासातील एक उत्कट भावमधुर पण अंती करुण अशा बाजीराव व मस्तानी यांच्या नितांत सुंदर प्रेमकथेवर आधारलेले पण त्या कथेचे



www.esahity.com

शृंगार, शौर्य, त्यात यांचे पापुद्रे अलगद बाजूस करून आतील करुण, दाहक मनोव्यथेचे असंख्य थर नाजुकपणे उकलून एका शोकांतिकेच्या मुळाशी जाऊन ते कौशल्याने वाचकांसमोर लेखकाने नाटकाच्या रुपाने ठेवले आहे.

**'वाङ्मयशोभा', पुणे**

'नाट्यलेखन उत्तम असून नाट्यवाचनही उत्तम झाले. सिरिअल काढण्यासाठी याचा जरूर विचार व्हावा', असे उद्गार प्रसिद्ध नाट्यसमीक्षक प्रा. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी, लेखकाने केलेल्या रंगावृत्तीच्या वाचनानंतर काढले. श्री. बाजीराव पेशवा प्रथम स्मारक समितीने दि. १९.६.९७ रोजी हा कार्यक्रम आयोजित केला होता.



www.esahity.com

# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**अ काव्य**

१. नव्या युगाच्या कविता
२. ‘नवरा नको ग बाई’ आणि इतर पथनाट्ये

**ष्ट कथा**

३. ‘नको हे पुरुषी मन’ आणि इतर लघुकथा
४. शुभ मंगल! विज्ञान!! (विज्ञान कथा)
५. ‘अवतार’ आणि इतर कथा

**पै नाटक**

६. मस्तानीचा बाजीराव
७. सत्तेचा विजय असो!
८. प्रीती मिळेल का हो?
९. गजराज आणि वनराज
१०. आग लागो या सगळ्याला
११. चल ये, चल ये, चल ये, बयेऽ
१२. ‘निम्मी माझी, निम्मी तुझी’ आणि इतर एकांकिका

**लू पटकथा**

१३. स्वातंत्र्यवीर

**सा कादंबरी**

१४. त्सुनामीची सुवर्णसंधी
१५ किलर इन्स्टिंक्ट
१६. अंतिम सत्य

**हि विज्ञान**

१७. विज्ञानाचा कल्पतरू

**त्यि समीक्षा**

१८. साहित्यातील प्रीती आणि भक्ती
१९. महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती
२०. केशवसुतःवैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता
२१. केशवसुत गातचि बसले!
२२. वैज्ञानिक समीक्षा

**क संकीर्ण**

२३. हिंदू समाजाचा छेदाभ्यास
२४. इंग्रजीत नापास? अशक्य!!!
२५. To Be, or Not To Be



www.esahity.com

# प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार

## मुरलीधर जावडेकर यांची कला

**कथाकथन** : १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रहप्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुनः भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार.

**नाट्यवाचन** : 'मस्तानीचा बाजीराव' या स्वतःच्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. त्यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि. भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन.

**काव्यप्रस्तुती** : साहित्य संमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रहप्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले.

**एकपात्री नाट्यप्रयोग** : 'स्वातंत्र्यवीर' (वि. दा. सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा. ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला.

**व्याख्यान, मुलाखत इत्यादी** : धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुनः पुनः प्रसारित केल्या.

**डॉ. मुरलीधर जावडेकर**

**जन्म** : २० मे, १९३६, शिक्षण : एम.ए. (पुणे), पीएच.डी. (मुंबई)

**व्यवसाय** : मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य.

म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत, इमारत क्र. १,
गाळा क्र. ९, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८
(महाराष्ट्र राज्य–भारत)

**दूरध्वनी** : ०२०–२७४२१६८३

**मोबाईल** : ९८९०१६९१५६



www.esahity.com

मस्तानीचा बाजीराव हे नाटक कसं वाटलं? मराठ्यांचा इतिहास म्हणजे रोमारोमात नवीन शक्तीचा संचार! छत्रपती म्हणजे स्वराज्यासाठी दुनियेतील मोठ्यात मोठ्या शत्रूशी लोहा घेणारी शक्ती. पंतप्रधान बाजीराव म्हणजे इराणवर चालून जायचं स्वप्न पहाणारा मराठी माणूस. लाखांच्या फ़ौजांना भिडण्याची ताकद. थोडी ढील मिळाली असती, थोडा एकोपा असता, थोडं बळ लाभतं तर तुर्कस्थान आणि युरोपावर सुद्धा मराठी झेंडा फ़डकला असता. असा जोशच घेऊन छत्रपतींनी हे राज्य स्थापन केलं होतं. त्यामुळे महाराजांच्या मृत्युनंतरही औरंग्याला त्याची वीटही हलवता आली नाही. पण...

पण काय ही आज मराठीची दूरवस्था! आज महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून “खळळ खट्टाक” करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मराठी शाळा ओस आणि बंद पडत आहेत. पुस्तकांचं वाचन करायच्या वयात मुलं पाण्यासाठी वणवण करताहेत.

अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे

प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. म्हणून आम्ही  बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी आम्ही झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दीड लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन लेखक पुढे येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. आणि आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com  या पत्त्यावर कळवा आणि या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू.



**डॉ. मुरलीधर जावडेकर**

बाजीराव आणि मस्तानी यांची प्रेमकहाणी जगातल्या सर्वश्रेष्ठ प्रेमकहाण्यांतसुद्धा उठून दिसणारीच आहे. हिंदवी साम्राज्याचा हिंदुस्थानभर विस्तार करणाऱ्या जगातल्या श्रेष्ठ सेनापतींपैकी एक बाजीरावसाहेबांना यासाठी समाजाबरोबर फार मोठा जीवघेणा संघर्ष करावा लागला. काळाच्या पुढे गेलेल्या नेत्याला काळात मागेच असलेल्यांशी तीव्र झगडा करावा लागला. त्यांतच या प्रेमी जीवांचा अत्यंत करुण अंत झाला.
अशी ही उत्कट हृदयस्पर्शी प्रेमकहाणी तितक्याच प्रभावीपणे या नाटकात रंगवलेली आहे.

www.esahity.com